॥ श्री ॥

११ ब्रह्मानन्दे योगानन्दः

-इष्ट देवतातत्त्वानुसंधानरूप मंगलाचरण करणारे ग्रंथकार या प्रकरणांत श्रोत्यांची प्रवृत्ति व्हावी म्हणून विषय व प्रयोजन सांगून प्रकरणाच्या आरंभाची प्रतिज्ञा करितात-

ब्रह्मानन्दं प्रवक्ष्यामि ज्ञाते तस्मिन्नशेषत: ।
ऐहिकामुष्मिकानर्थव्रातं हित्वा सुखायते ॥१

अन्वयार्थ - [ब्रह्मानन्दं प्रवक्ष्यामि-] ब्रह्मानन्दाचें व्याख्यान करितों. [तस्मिन् ज्ञाते सति-] त्याचें ज्ञान झालें असतां [ऐहिकामुष्मिकानर्थव्रातं अशेषत: हित्वा सुखायते-] ऐहिक व पारलौकिक अनर्थसमूहाचा नि:शेष त्याग करून साधक सुखी होतो.

प्रकाश:- या पुढील पांचहि प्रकरणांस ब्रह्मानंद ही संज्ञा आहे. व त्यांतील योगानन्दसंज्ञक हें प्रकरण त्याच्या प्रथमाध्यायासारखें आहे. 'ब्रह्मानन्दाचें वर्णन करितों' असें प्रथमत:च म्हणून ग्रंथकारांनीं विषयाची प्रतिज्ञा व ब्रह्म या पदार्थाचें उच्चारणरूप मंगल हीं दोन्ही येथें केलीं आहेत. पण, जोंपर्यंत कोणत्याहि कामाचें फल समजत नाहीं तोंपर्यंत प्राण्याची त्यांत प्रवृत्तिहि होत नाहीं, असा नियम असल्यामुळें ब्रह्मानन्दाच्या ज्ञानापासून कोणता लाभ होणार; हेंहि येथें स्पष्टपणें सांगितलें आहे. **ऐहिका०**- पुत्र, स्त्री इत्यादि पदार्थांच्या ठायीं अभिमान ठेविल्यामुळें प्राप्त होणाऱ्या अनर्थास ऐहिक व परलोकीं गेल्यावर तेथें पापकर्मामुळें भोगाव्या लागणाऱ्या दु:खांस पारलौकिक अनर्थ म्हणतात. पण, ब्रह्मानन्दाच्या ज्ञानानें या सर्वांचा नाश होत असल्यामुळें प्रत्येक मनुष्यानें त्याचें ज्ञान करून घ्यावें. ॥१॥

-ब्रह्मज्ञान इष्टप्राप्ति व अनिष्टनिवृत्ति करणारें आहे. याविषयीं अनेक श्रुतिस्मृतिवाक्यें प्रमाण आहेत, असें सुचविण्यासाठीं पुढील श्लोकांत दोन वचनांचा अर्थत: उल्लेख करितात -

ब्रह्मवित्परमाप्नोति शोकं तरति चात्मवित् ।
रसो ब्रह्मरसं लब्ध्वाऽऽनंदीभवति नान्यथा ॥२

अन्वयार्थ -[ब्रह्मवित् परं आप्नोति-] ब्रह्मज्ञानी आनंदरूप ब्रह्मास प्राप्त होतो [च आत्मवित् शोकं तरति-] व आत्मज्ञानी दु:खांना तरुन जातो. [असौ रस:-] हा आत्मा रस आहे. [ब्रह्मरसं लब्ध्वा आनंदी भवति न अन्यथा-] आनंदरूप ब्रह्माला प्राप्त होऊन तो आनंदित होतो. दुसऱ्या कोणत्याहि प्रकारें होत नाहीं.

प्रकाश:- ब्रह्मास जो जाणतो तो ब्रह्मवित् अर्थात् ज्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला आहे असा पुरुष अति श्रेष्ठ जें ब्रह्म, तद्रूपच होऊन जातो - हें तैत्तिरीयोपनिषदांतील वाक्य आहे, 'देश, काल व वस्तु यांच्या योगानें मर्यादित न होणारें भूमसंज्ञक ब्रह्म मी आहें, अशा रीतीनें आत्म्यास जो जाणतो त्याचा तमोमूलक संसार नष्ट होतो.' हें छान्दोग्यांतील वाक्य आहे. तैत्तिरीयांत तर पुढें असेंहि म्हटलें आहे कीं- हा आत्माच रस (म्हणजे आनंदरूप) आहे. व या ब्रह्मरूप रसास जाणूनच (म्हणजेच दोघांचें ऐक्य आहे असें समजल्यामुळेंच) तो आनंदी (निरतिशय सुखरूप) होतो. पूर्ण आनंदी होण्यास अशाप्रकारच्या आत्मज्ञानावांचून दुसरा उपायच नाहीं. ॥२॥

-याप्रमाणें अन्वयमुखानें इष्टप्राप्ति व अनिष्टनिवृत्ति यांचें प्रतिपादन करणारीं वाक्यें दाखवून अन्वय-व्यतिरेकांनीं अनर्थनिवृत्तिप्रदर्शन करणारीं तैत्तिरीयांतीलच-तै. भा. पृ. १४६- दोन वाक्यें अर्थत:

घेतात --

प्रतिष्ठां विंदते स्वस्मिन् यदा स्यादथ सोऽभय:।
कुरुतेऽस्मिन्नंतरं चेदथ तस्य भयं भवेत् ।।३

अन्वयार्थ - [यदा स्वस्मिन् प्रतिष्ठां विंदते अथ स: अभय: स्यात्-] ज्या वेळीं यास स्वरूपीं स्थान मिळतें तेहां तो निर्भय होतो. [अस्मिन् अंतरं कुरुते चेत् अथ तस्य भयं भवेत्-] यानें तर त्याच्या स्वरूपांत थोडासा भेद पाहिला तर त्याच्यावर मोठें भय ओढवतें.

प्रकाश:- ज्यावेळीं हा मुमुक्षु या विद्वदनुभवगम्य, इंद्रियागोचर, स्वकीयत्व या भावावाचून, शब्दातीत, निराधार व द्वितीयत्व नसल्यामळें अभय अशा वस्तूच्या ठिकाणीं 'मी ब्रह्मच आहें' अशा भावनेनें दृढ स्थित होतो त्याच वेळीं तो निर्भय व अद्वितीय अशा ब्रह्माचे स्वरूपीं मिळतो. आणि ज्यावेळीं हा या पूर्वोक्त गुणवान् आत्म्याच्याठायीं थोडासाहि भेदभाव धरितो त्याचवेळीं त्यास संसारयुक्त दु:ख होतें, अर्थात् आत्मस्वरूपीं भेददृष्टी ठेवणें हाच अनर्थाचा पाया आहे; व अनर्थांतून सुटण्याचा पूर्वोक्त गुणयुक्त आत्म्याचें ज्ञान हाच एक उपाय आहे. ।।३।।

-'भेददृष्टि ठेवणारांना भय होतें' ही गोष्ट दृढ करण्यासाठीं ब्रह्मात्मैकत्व ज्ञानरहित वाय्वादि देवतांचें भयप्रदर्शन करणारा 'भीषास्मातू०' तै. भा. १५० इत्यादि मंत्र अर्थत: उच्चारतात -

वायु: सूर्यो वह्निरिंद्रो मृत्युर्जन्मांतरेंतरम् ।
कृत्वा धर्मं विजानंतोऽप्यस्माद्भीत्या चरन्ति हि ।।४

अन्वयार्थ - [वायु: सूर्य: वह्नि: इंद्र: च मृत्यु:-] वायु, सूर्य, अग्नि, इंद्र, व यम हे [जन्मान्तरे धर्म विजानन्त: अपि-] पूर्वजन्मीं धर्माचें ज्ञानपूर्वक अनुष्ठान करणारे जरी होते तरी [अंतरं कृत्वा अस्मात् भीत्या चरन्ति हि-] भेददृष्टि केल्यामुळें या जन्मीं या ब्रह्माच्या भीतीनें आपापलें काम करितात.

प्रकाश:- वायु, सूर्य इत्यादि जगाच्या नियमन करणाऱ्या देवता आहेत; हें प्रसिद्ध आहे. पण त्यांनाहि कोणा जबरदस्त शक्तीची भीति असावी असें त्यांच्या नियमित वर्तनावरून अनुमान होतें, व 'याच्या भीतीनेंच वायु वहातो' (का. ३-३) इत्यादि तैत्तरीय श्रुतीहि याब्रह्माच्या भीतीने सर्व देवता आपापल्या कामांत निमग्न होतात असें सांगत आहेत. अर्थात्- या त्यांच्या भीतीस कांहींतरी कारण असलेंच पाहिजे. व तें ईश्वराच्या स्वरूपांत भेददृष्टि ठेवणें हेंच होय. - असा पूर्वापर संबंध पाहिला असतां श्रुतीवरूनच निश्चय होत असतो. सारांश, जरी कोणी कोणत्याहि प्रकारचा धर्म कितीहि ज्ञानपूर्वक केला तरी आत्मस्वरूपांत भेदभाव ठेविल्यास त्याचें भीति हें फल मिळाल्यावांचून राहत नाहीं. ।।४।।

-'अहोपण, 'तरति शोकमात्मवित्' इत्यादि पूर्वोक्त श्रुतिवाक्यांत ब्रह्मानंदाचें ज्ञान अनर्थनिवृत्तीचें साधन आहे हें स्पष्टपणें अवगत होत नाहीं' अशी आशंका घेऊन तसें प्रतिपादन करणाऱ्या वाक्याचें प्रमाण देतात-

आनंदं ब्रह्मणो विद्वान्न विभेति कुतश्चन ।
एतमेव तपेन्नैषा चिंता कर्माग्निसंभृता ।।५

अन्वयार्थ - [ब्रह्मण: आनंदं विद्वान् कुतश्चन न बिभेति-] ब्रह्माच्या आनंदाला जाणणारा कोणत्याहि कारणानें भीत नाहीं. [एषा कर्माग्निसंभृता चिंता एतं न तपेत् एव-] ही कर्मरूप अग्नीपासून निर्माण होणारी चिंता त्याला ताप देत नाहींच.

प्रकाश:- ब्रह्म आनंदरूप असल्यामुळें 'ब्रह्माचा आनंद' हा शब्दप्रयोग राहूचें शिर या शब्दाप्रमाणें गौण आहे. अर्थात् आनंदरूप ब्रह्माचा ज्या धन्य पुरुषास साक्षात्कार होतो, त्यास ऐहिक व्याघ्रादि व पारलौकिक पापादि यांची भीति वाटत नाहीं. व

त्यामुळें अज्ञ पुरुषास मरणसमयीं उत्पन्न होणारी - अरेरे ! मी आजपर्यंत पुण्यच कां केलें नाहीं. पाप कशाकरितां केलें-इत्यादि प्रकारची चिंता पडत नाही. जे सदा पाप करणारे व पुण्य न करणारे असतात त्यांस अशा प्रकारचा पश्चात्ताप अवश्य होतो. पण अंत्यसमय जवळ आल्यामुळें त्याचा कांहीं इलाज चालत नाहीं. यास्तव शहाण्यानें वेळींच सावध होऊन पुरुषार्थाच्या उद्योगास लागावें; हें चांगलें. ॥५॥

-पुण्य व पाप ज्ञान्यास अंतकालीं ताप कां देत नाहीं, हें आतां श्रुतीच्या आधारानें सांगतात --

एवं विद्वान्कर्मणी द्वे हित्वाऽऽत्मानं स्मरेत्सदा ।
कृते च कर्मणी स्वात्मरूपेणैवैष पश्यति ॥६

अन्वयार्थ - [एवं विद्वान् द्वे कर्मणी हित्वा सदा आत्मानं स्मरेत्-] जो याप्रमाणें आत्मैक्य जाणून प्रवृत्त होतो तो पुण्य व पाप या दोन्ही कर्मांचा त्याग करून सर्वदा ब्रह्मरूप प्रत्यगात्म्याचें चिंतन करितो [च एष: कृते कर्मणी स्वात्मरूपेण एव पश्यति-] व तो केलेल्या पुण्यपापकर्मांना आत्मरूपानेंच पाहतो.

प्रकाश:- या शरीरांतील व सूर्यांतील चैतन्य पुरुष एकच आहे; असें जो जाणतो, व पुण्यपापरूप कर्में आत्म्याशीं संबंध ठेवित नसल्यामुळें माझा व त्यांचा कांहीं संबंध नाहीं असें जो नि:संशय समजतो, आणि नंतर सर्वसंगपरित्याग करून जो सतत आत्मचिंतन करितो, त्याला अंत्यसमयीं पूर्वोक्त प्रकारें चिंता पडत नाहीं.

वादी:- आत्मज्ञानानंतर होणाऱ्या कर्मांची तुम्ही सांगतां तशी व्यवस्था होते, असें जरी मानलें तरी ज्ञानापूर्वी घडलेल्या संचित कर्मांची काय वाट होते ?
सिद्धान्ती:- ज्ञानानंतर हा आत्मज्ञ पुरुष सर्व संचित कर्मांस आत्मरूपानेंच पाहतो. म्हणजे आत्मा एक व सर्वव्यापी असल्यामुळें त्यास सोडून कोणीहि कधीं राहूं शकत नाहीं. अर्थात् माझीं संचित कर्मेंहि आत्मरूपच होत, असें तो जाणतो. ॥६॥

-'अनंत कोटि कल्प जरी निघून गेले तरी केलेलें कर्म फलभोग दिल्यावांचून क्षीण होत नाहीं,' असें शास्त्रवचन असल्यामुळें या अनादि संसारांत असंख्य कर्में असण्याचा संभव आहे. पण तीं सर्व अप्रसिद्ध असल्यामुळें त्या सर्वांचें आत्मरूपानें अनुसंधान करितां येणें शक्य नाहीं. तेव्हां त्याविषयींची चिंता नाहींशी कशी होईल ?अशी आशंका घेऊन 'त्या सर्वांची तत्त्वज्ञानानें कारणासह निवृत्ति झाल्यामुळें तीं मरणकालीं ज्ञानी पुरुषाच्या मनांत चिंता उत्पन्न करूं शकत नाहीं' अशा आशयानें मुंडकोपनिषदांतील हृदयग्रंथ्यादि निवृत्तिपर वाक्य-मुं. भा. २.२.८ पढतात-

भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशया: ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥७

अन्वयार्थ - [तस्मिन् परावरे दृष्टे सति-] हिरण्यगर्भादिकांहूनहि श्रेष्ठ अशा त्या परमात्माचा साक्षात्कार झाला असतां [अस्य हृदयग्रन्थि: भिद्यते-] त्या पुरुषाची हृदयग्रंथि नष्ट होते [सर्वसंशया: छिद्यन्ते-] सर्व संशय निवृत्त होतात; [च कर्माणि क्षीयन्ते-] व पुण्य-पापरूप सर्व संचित कर्में क्षीण होतात.

प्रकाश:- परावरे० हिरण्यगर्भादिकांच्या स्थानास परं असें म्हणतात. पण तेंहि ज्याच्यापुढें निकृष्ट आहे अशा ब्रह्मतत्त्वाचा साक्षात्कार होतांच हृदय-ग्रंथि सुटते. म्हणजे बुद्धि व आत्मा यांचा अनादि अज्ञानामुळें जो अन्योन्याध्यास झालेला असतो तो निवृत्त होतो. सारांश जड चैतन्याचें ऐक्य हीच ग्रंथि व त्यांचा विवेक हाच तिचा भेद होय. आत्मज्ञान होतांच मिळणारें हें

पहिलें फल होय. पुढें-आत्मा नैय्यायिकांच्या म्हणण्याप्रमाणें देहादिकांहून भिन्न आहे कीं चार्वाकमताप्रमाणें देहरूपच आहे ? जरी भिन्न असला तरी तार्किकांच्या किंवा मीमासकांच्या म्हणण्याप्रमाणें कर्तृत्वादि धर्मवान् आहे ? कीं सांख्यांच्या म्हणण्याप्रमाणें नुस्ता भोक्ताच आहे ? बरं, जरी अकर्ता असला तरी श्रीमच्छंकराचार्यांच्या म्हणण्याप्रमाणें ब्रह्मरूपच आहे कीं द्वैती, विशिष्टाद्वैती इत्यादिकांच्या म्हणण्याप्रमाणें ब्रह्माहून निराळा आहे ? ब्रह्माहून जरी तो भिन्न नसला तरी आचार्यांच्या मताप्रमाणें त्याचें केवल ज्ञानच मुक्तिसाधन आहे कीं बौधायनादि वृत्तिकारांच्या मताप्रमाणें ज्ञान व कर्मं यांच्या योगानें मुक्ति साधन मिळते-इत्यादि प्रकारचे सर्व संशय नष्ट होतात कारण ज्या वस्तूचा साक्षात्कार होतो तिच्या विषयीं संशय किंवा विपरीत भावना होणें शक्यच नाहीं. तसेंच आत्मज्ञान होऊन सर्व अनर्थांस कारण होणाऱ्या अज्ञानाचा नाश झाला असतां पुण्यपापरूप सर्व संचित कर्में नष्ट होतात. सारांश, या श्रुतींत आमच्या म्हणण्याप्रमाणें स्पष्ट उल्लेख आहे. ॥७॥

-'अहोपण, 'कुर्वन्नेवेह कर्माणि०' -ई. भा. २ -'विद्यां चाविद्यां च०' -ई. भा. ११- अशा श्रुति व 'कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकदाय:' गी. भा. ३.२० 'यथान्नं मधुसंयुक्तं मधु चान्नेन संयुतं । एवं तपश्च विद्या च संयुक्तं भेषजं महत् ॥' इत्यादि स्मृति असल्यामुळें केवल कर्म किंवा ज्ञानसमुच्चित कर्म मुक्तीचें साधन आहे, असें ठरतें,' अशी आशंका घेऊन 'तमेव विदित्वातिमृत्युमेति नान्य: पन्था विद्यतेऽयनाय' या श्वेताश्वतरवाक्याचा अर्थत: अनुवाद करितात --

तमेव विद्वानत्येति मृत्युं पंथा न चेतर: ।
ज्ञात्वा देवं पाशहानि: क्षीणै: क्लेशैर्न जन्मभाक्
॥८

अन्वयार्थ - [तं एव विद्वान् मृत्युं अत्येति च इतर: पन्था: न वर्तते-] त्या आत्म्यालाच जाणणारा संसाराचें अतिक्रमण करितो. ज्ञानावांचून मोक्षाचा दुसरा मार्गच नाहीं. [देवं ज्ञात्वा पाशहानि: स्यात् । क्षीणै: क्लेशै: जन्मभाक् न भवति] प्रकाशरूप आत्म्यास जाणल्यामुळें सर्व पाशांचा नाश होतो व क्लेश क्षीण झाले असतां त्यांच्यामुळें तो पुनर्जन्मास पात्र होत नाहीं.

प्रकाश:- या पूर्वोक्त परमात्म्याचा ज्याला साक्षात्कार होतो तोच मृत्युरूप संसाराचें अतिक्रमण करितो. या एका उपायावांचून मुक्तीचा दुसरा (केवल कर्मरूप किंवा ज्ञानकर्मसमुच्चयरूप) उपायच नाहीं. आतां ज्ञानाच्या योगानें ऐहिक अनर्थांची मात्र निवृत्ति होते; पारलौकिक अनर्थांची होत नाहीं. असें कोणी म्हणूं लागेल. कारण, पूर्वोक्त वचनांत 'मृत्यु' असा शब्द असून त्याचा अर्थ ऐहिक अनर्थपरच असल्यामुळें प्रस्तुत शंका सावकाश आहे. यास्तव ग्रंथकार दुसऱ्या एका श्रुतिवचनानें तिचें समाधान करितात- या प्रकाशरूप आत्म्याचा साक्षात्कार झाला असतां, काम, क्रोधादि सर्व पाशांचा नाश होतो. व त्यांचा नाश झाला असतां, उत्तरजन्मास कारण होणाऱ्या क्लेशांचाहि नाश होतो व त्यामुळें ज्ञानी पुरुषास जन्म घ्यावा लागत नाहीं. दया, शंका, भय, लज्जा, निंदा, कुल, जाति व शील हे आठ पाश आणि अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, व अभिनिवेश हें पांच क्लेश होत. अविद्या म्हणजे अज्ञान आणि अस्मिता म्हणजे सूक्ष्म अहंकार. ॥८॥

-'ज्ञानी शोकाचें उल्लंघन करून जातो' इत्यादि वाक्यें आपण नुस्तीं ऐकतों मात्र, पण त्याप्रमाणें अनुभव येत नाहीं. कारण ज्ञानी सुद्धां अज्ञांप्रमाणेंच इष्टप्राप्ति व अनिष्टनिवृत्ति यांकरितां प्रयत्न करीत असतात.'

उत्तर --

देवं मत्वा हर्षशोकौ जहात्यत्रैव धैर्यवान् ।
नैनं कृताकृते पुण्यपापे तापयत: क्वचित् ।।९

अन्वयार्थ - [धैर्यवान् देवं मत्वा अत्र एव हर्षशोकौ जहाति-] ब्रह्मचर्यादि साधनसंपन्न मुमुक्षु प्रकाशरूप ईश्वरास जाणून याच जन्मांत हर्ष व शोक यांस सोडतो. [एनं कृताकृते पुण्यपापे क्वचित् न तापयत:-] या ज्ञानी पुरुषाला पूर्वीं केलेलें व न केलेलें पुण्य-पाप कधींहि ताप देत नाहीं.

प्रकाश:- **देवं**-चिदानंदरूप, प्रकाशमय, नित्य, निर्विकार इत्यादि लक्षण आत्म्यास. मत्वा-साक्षात् जाणून. **अत्रैव**-या जन्माध्येंच. म्हणजे ज्ञानाच्या योगानें मिळणारे फल दृष्ट आहे. काम्य अग्निहोत्रादि कर्मांच्या फलाप्रमाणें अदृष्ट नाहीं. **कृताकृते पुण्यपापे**- न केलेलें पुण्य व केलेलें पाप हीं दोन्ही दु:ख देतात. तसेंच न केलेलें पाप आणि केलेलें पुण्य सुख देतें. पण तत्त्वज्ञ पुरुषास यापैकीं कशामुळेंहि संताप होत नाहीं. यास्थळीं ताप म्हणजे मनाचा एकप्रकारचा विकार असें समजावें ।।९।।

-सारांश -

इत्यादि श्रुतयो बह्व्य: पुराणै: स्मृतिभि: सह ।
ब्रह्मज्ञानेऽनर्थहानिमानंदं चाप्यघोषयन् ।।१०

अन्वयार्थ - [इत्यादि बह्व्य: श्रुतय: पुराणै:च स्मृतिभि:सह-] इत्यादि अनेक श्रुति, पुराणें व स्मृति यांसह [ब्रह्मज्ञाने सति अनर्थहानिं च आनंदं अपि अघोषयन्-] ब्रह्मज्ञान झालें असतां अनर्थाचा नाश होतो व आनंदहि प्राप्त होतो, असा घोष करीत आहेत.

प्रकाश:- 'आत्मासाक्षात्कार झाला असतां सर्व अनर्थांची सर्वथैव निवृत्ति व परमानंदाची प्राप्ति हीं दोन फलें निश्चयानें मिळतात.' असें एवढ्याच श्रुति सांगत आहेत असें नाहीं. तर अशा असंख्य श्रुति, स्मृति व पुराणें ही गोष्ट कंठरवानें सांगत आहेत. जसें- 'इह चेदवेदीदथ सत्यमस्ति' के. भा. १३ पृ. ५९ 'य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति अथेतरे दु:खमेवापियन्ति' 'तद्यो यो देवानां प्रत्यबुध्यत-' बृ. भा.१.४.३१५. 'निचाय्य तं मृत्युमुखात्प्रमुच्यते' का. भा. १.३. इत्यादि श्रुति 'सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि संपश्यन्नात्मयाजी वै स्वाराज्यमधिगच्छति' मनु. अ. १२. 'क्षेत्रज्ञस्यात्मविज्ञानाद्विशुद्धि: मता' इत्यादि स्मृति-पुराणवचनें प्रमाण आहेत. ।।१०।।

-'अहोपण 'ब्रह्मानंद' या शब्दांतील 'आनंद' या पदाचें 'ब्रह्म' विशेषण आहे. त्यामुळें दुसरे हि आनंद असावेत असें वाटतें. तेव्हां आनंद किती प्रकारचा व कसा आहे ?' अशी जिज्ञासा झाली असतां ब्रह्मानंदाचे भेद दाखवून त्याचेंच विवेचन करण्याची प्रतिज्ञा करितात -

आनंदस्त्रिविधो ब्रह्मानंदो विद्यासुखं तथा ।
विषयानंद इत्यादौ ब्रह्मानंदो विविच्यते ।।११

अन्वयार्थ - [ब्रह्मानन्द: विद्यासुखं तथा विषयानन्द: इति त्रिविध: आनन्द: अस्ति-] ब्रह्मानन्द, विद्यानन्द व विषयानन्द असा तीन प्रकारचा आनंद आहे. [किंतु आदौ ब्रह्मानंद: विविच्यते--] पण प्रथमत: त्यांतील ब्रह्मानन्दाचें विवेचन केलें जात आहे.

प्रकाश:- आनंद जरी मुख्यत: तीन प्रकारचा आहे तरी ब्रह्मानन्दामुळेंच दुसरे आनंद प्राप्त होत असल्यामुळें प्रथम तीन अध्यायांत ब्रह्मानन्दाचेंच विवेचन करवयाचे आहे. आतां, प्रत्येक अध्यायास योगानन्द, आत्मानन्द इत्यादि जीं निरनिराळीं नावें दिलेलीं आढळतात तीं त्याचे अवान्तर भेद दाखविण्याकरितां होत ।।११।।

-'तैत्तिरीय श्रुतीचा विचार केला असतां ब्रह्म आनंदरूप आहे, असें समजतें.' अशा आशयानें भृगुवल्लीचा अर्थ संक्षेपत: सांगतात --

भृगु: पुत्र: पितु: श्रुत्वा वरुणाद्ब्रह्मलक्षणम् ।
अन्नप्राणमनोबुद्धीस्त्यक्त्वाऽऽनंदं विजज्ञिवान् ॥१२

अन्वयार्थ - [पुत्र: भृगु: वरुणात् पितु: ब्रह्मलक्षणं श्रुत्वा] 'भृगु-' संज्ञक पुत्र 'वरुण'- नामक पित्याच्या तोंडून ब्रह्माचें लक्षण ऐकून [अन्नप्राण-मनो-बुद्धी: त्यक्त्वा आनंदं विजज्ञिवान्-] अन्न, प्राण, मन व बुद्धी यांचा त्याग करून आनंदास जाणता झाला.

प्रकाश:- तैत्तिरीय अरणांतील शीक्षा, ब्रह्मविदा व भृगु अशीं तीन उपनिषदें शुद्ध आत्मस्वरूपाचें प्रतिपादन करितात. व त्यांतील भृगुसंज्ञक उपनिषदांतील आख्यायिकेचा येथें उल्लेख केला आहे. भृगुसंज्ञक पुत्र आपल्या वरुणनामक पित्याकडे गेला व 'मला ब्रह्मोपदेश करा" म्हणून त्यास म्हणाला. तेव्हां त्यानें आपल्या प्रिय पुत्रास ब्रह्माचें लक्षण सांगितलें. तें असें (तै. ३-१) ज्याच्यापासून हीं भूतें उत्पन्न होतात; ज्याच्यामुळें उत्पन्न झालेलीं भूतें जिवंत राहतात व नाशसमयीं ज्याच्याकडे जाऊन ज्यांत लीन होतात तें जाणण्याची इच्छा कर. तेंच ब्रह्म आहे. पण हें लक्षण सांगण्यापूर्वीं शरीर, प्राण, इंद्रियें; मन व वाणी हीं त्याच्या ज्ञानाचीं द्वारें आहेत असें त्यानें सांगितलें होतें. पित्याच्या या उपदेशानंतर भृगु एकांतांत जाऊन बसला व विचार करूं लागला. पूर्ण विचार केल्यावर त्यास शरीरादिकांच्या ठायीं ब्रह्मलक्षण नसल्यामुळें त्यांस अनात्म बुद्धीनें सोडून आनंदाचा ब्रह्मबुद्धीनें स्वीकार करावा लागला. ॥१२॥

-'त्यानें आनंदामध्यें ब्रह्मलक्षणाची योजना कशी केली' अशी शंका घेऊन त्या योजनेचा प्रकार दाखविणारें 'आनंदाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायंते०' -तै. भा.- हें वाक्य अर्थत: पढतात -

आनंदादेव भूतानि जायन्ते तेन जीवनम् ।
तेषां लयश्च तत्रातो ब्रह्मानंदो न संशय: ॥१३

अन्वयार्थ -- [आनंदात् एव भूतानि जायन्ते-] आनंदापासूनच भूतें उत्पन्न होतात. [तेषां तेन एव जीवनं भवति-] त्यांचें आनंदाच्या योगानेंच जीवन होतें [च लय: तत्र एव-] व लय त्यांतच होतो. [अत: स: ब्रह्मानन्द: न संशय:-] यास्तव तो ब्रह्मानन्दच होय, यांत संशय नाहीं.

प्रकाश:- स्त्रीपुरुष संयोगजन्य आनंदापासून प्राणी उत्पन्न होतात. विषयभोगजन्य आनंदाच्या योगानेंच जीवंत राहतात व त्यांचा लयहि सुषुप्तिकालीन आनंदांत होतो. तस्मात् आनंद हेंच ब्रह्मस्वरूप होय, यांत कांहीं शंका नाहीं. ॥१३॥

-याप्रमाणें तैत्तिरीय श्रुतीचें पर्यालोचन केलें असतां ब्रह्माचें आनंदरूपत्व सिद्ध होतें, असें सांगून छान्दोग्यश्रुतीचें पर्यालोचन केल्यानेंहि तसेंच सिद्ध होतें, असें दाखविण्याच्या इच्छेनें सनत्कुमार व नारद यांच्या संवादरूप सातव्या अध्यायांतील 'भूम-' ब्रह्मप्रतिपादक 'यत्र नान्यत्पश्यति०'-छां. ७. इत्यादि वाक्याचा अर्थ संक्षेपत: सांगतात--

भूतोत्पत्ते: पुरा भूमा त्रिपुटीद्वैतवर्जनात् ।
ज्ञातृज्ञानज्ञेयरूपा त्रिपुटी प्रलये हि नो ॥१४

अन्वयार्थ - [भूतोत्पत्ते: पुरा त्रिपुटीद्वैतवर्जनात् भूमा आसत्-] आकाशादि भूतांच्या उत्पत्तीपूर्वी त्रिपुटीरूप द्वैताचा अभाव असल्यामुळें 'भूमा-' नामक परमात्मा होता. [प्रलये ज्ञातृज्ञानज्ञेयरूपा त्रिपुटी नो हि--] प्रलय कालीं ज्ञाता, ज्ञान व ज्ञेयरूप त्रिपुटी नसते, हें सर्व वेदान्तांस मान्य आहे.

प्रकाश:- आकाश, वायु इत्यादि स्थूल सूक्ष्म भूतें व त्यांचीं जरायुज, अंडज इत्यादि कार्यें यांच्या उत्पत्तिपूर्वी द्वैताचा अभाव असतो ही गोष्ट निर्विवाद होय. पण, त्यावेळींहि देशत: कालत:, व वस्तुत: परिच्छिन्न न होणारा परमात्मा होता. आतां-द्वैत नव्हतें

म्हणून कशावरून असें म्हणाल तर सांगतों-ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय इत्यादिरूपच द्वैत असतें, व ती त्रिपुटी प्रलयकालीं नसते, याविषयीं कोणाचाहि वाद नाहीं. शिवाय सर्व उपनिषदेंहि हेंच सांगत आहेत. ॥१४॥

-आतां ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय याचें स्वरूप सांगतात -

विज्ञानमय उत्पन्नो ज्ञाता ज्ञानं मनोमयः ।
ज्ञेयाः शब्दादयो नैतत्त्रयमुत्पत्तितः पुरा ॥१५

अन्वयार्थ -[उत्पन्नः विज्ञानमयः ज्ञाता-] **परमात्म्यापासून उत्पन्न झालेला बुद्ध्युपाधिक जीव-विज्ञानमय हा ज्ञाता, [मनोमयः ज्ञानं-] मनांत प्रतिबिंबित झालेलें 'मनोमय-' संज्ञक चैतन्य हें ज्ञान [च शब्दादयः ज्ञेयाः-] व शब्दस्पर्शादि विषय हेच ज्ञेय पदार्थ प्रसिद्ध आहेत. [एतत् त्रयं उत्पत्तितः पुरा न आसीत्-] पण हें त्रय कार्य असल्यामुळें उत्पत्तीच्या पूर्वीं कारणाहून पृथक् नव्हतें.**

प्रकाशः- परमात्म्यापासून उत्पन्न होणाऱ्या बुद्ध्युपाधिक जीवास विज्ञानमय किंवा ज्ञाता म्हणतात. मनामध्यें प्रतिबिंबित झालेल्या मनोमयनामक चैतन्यास ज्ञान व शब्दादि सर्व विषयांस ज्ञेय म्हणतात. पण हें सर्व कार्यरूप असल्यामुळें उत्पत्तीच्या पूर्वी कारणांत लीन होतें. ॥१५॥

-तात्पर्य -

त्रयाभावे तु निर्द्वैतः पूर्ण एवानुभूयते ।
समाधिसुप्तिमूर्च्छासु पूर्णः सृष्टेः पुरा तथा ॥१६

अन्वयार्थ - [त्रयाभावे तु समाधि-सुप्ति-मुर्च्छासु निर्द्वैतः पूर्णः एव अनुभूयते-] पण ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या त्रिपुटीचा अभाव असतांना समाधि, निद्रा व मूर्च्छा या अवस्थांमध्यें द्वैतशून्य व पूर्ण असाच आत्मा अनुभवास येतो, [तथा सृष्टेः पुरा पूर्णः-] **त्याप्रमाणेंच तो सृष्टीच्या पूर्वीं पूर्ण असतो.**

प्रकाशः- त्रिपुटी हेंच द्वैत होय; असें चवदाव्या श्लोकांत स्पष्टपणें म्हटलें आहे. अर्थात् जेव्हां त्रिपुटी नसते तेव्हां द्वैतहि नसतें असें म्हणणें युक्तच होय. आणि त्यामुळेंच समाधि, गाढ निद्रा, इत्यादि अवस्थांमध्यें द्वैताचें भान होत नाहीं. तर द्वैतशून्य व पूर्ण अशा आत्म्याचा त्यावेळीं प्रत्यय येतो. आतां समाधि व मूर्च्छा यांचा अनुभव सर्वांसच नसतो हें जरी खरें आहे तरी गाढ निद्रेचा अनुभव यावत् प्राणीमात्रास आहे. व त्यामुळें त्रिपुटी नसतांना पूर्ण आत्म्याचा कसा अनुभव येतो हें विस्तारपूर्वक सांगावयास नको. सारांश प्रलयकालींहि त्रिपुटीचा अभाव असल्यामुळें सुषुप्तींतील आत्म्याच्या स्वरूपाप्रमाणेंच त्यावेळच्या आत्म्याचें स्वरूप असतें, असें समजावें ॥१६॥

-पण 'आत्मा पूर्ण जरी असला तरी त्यावरून तो आनंदरूप आहे; हें कसें ठरतें ?' अशी आशंका घेऊन अन्वय-व्यतिरेकन्यायानें भूमात्म्याचें सुखरूपत्व प्रदर्शित करणारें 'यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति' छां. भा. अ. ७. २३. हें वाक्य अर्थतः पढतात --

यो भूमा स सुखं नाल्पे सुखं त्रेधा विभेदि नि ।
सनत्कुमारः प्राहैवं नारदायातिशोकिने ॥१७

अन्वयार्थ -[यः भूमा सः सुखं--] जो 'भूमा' नामक परमात्मा तो सुखच आहे. [त्रेधा विभेदिनि अल्पे सुखं न अस्ति--] कारण तीन प्रकारें भेद पावणाऱ्या अल्प द्वैतामध्यें सुख नसतें, [एवं सनत्कुमारः अतिशोकिने नारदाय प्राह--] असें सनत्कुमार अतिशय शोक करणाऱ्या नारदास सांगता झाला.

प्रकाशः- छान्दोग्याच्या सातव्या अध्यायांत नारद व सनत्कुमार यांच्या संवादाची आख्यायिका आहे. नारद अतिकष्टी होऊन सनत्कुमाराकडे गेला. व "मला अतिशय असमाधानरूपी शोक होत आहे तरी आपण मला या शोकांतून पार करा" असें त्यास म्हणाला, तेव्हां अनेक पर्यायांच्या योगानें नारदास उपदेश केल्यावर शेवटीं 'यो वै भूमा तत्सुखं नाल्पे

सुखमस्ति' असें त्यांनीं सांगितलें. त्याचाच येथें उल्लेख केला आहे. ''देश काल व वस्तु यांच्या योगानें मर्यादित होणाऱ्या या क्षुद्र द्वैतामध्यें सुखाचा लेशहि नसून या सर्वाचें अधिष्ठान जो भूमानामक परमात्मा तो स्वत: सुखरूप आहे'' असें या श्लोकाच्या पूर्वार्धाचें व प्रस्तुत श्रुति-वचनाचें तात्पर्य आहे. ॥१७॥

-श्रुतीमध्यें नारदाला अतिशय शोक होण्याचें जें कारण सांगितलें आहे त्याचाच येथें अनुवाद करितात -

सपुराणान् पंच वेदान् शास्त्राणि विविधानि च
ज्ञात्वाऽप्यनात्मकवित्त्वेन नारदोऽतिशुशोच ह ॥१८

अन्वार्थ - [सपुराणान् पंच वेदान् च विविधानि शास्त्राणि ज्ञात्वा अपि--] पुराणासंह पांच वेद व नाना प्रकारचीं शास्त्रें यांस जाणूनहि [अनात्मवित्त्वेन नारद: अतिशुशोच ह--] आत्मज्ञ नसल्यामुळें नारद अतिशय शोक करिता झाला.

प्रकाश:- सर्व पुराणें, स्मृतिग्रंथ, चारी वेद व अनेक शास्त्रें यांमध्यें जरी तो अति निष्णात होता तरी एक आत्मज्ञान नसल्यामुळें त्याच्या चित्तास समाधान वाटेना व त्यामुळेंच तो शोक करूं लागला. इत्यादि प्रकार पूर्वोक्त उपनिषदांत विस्तृतपणें सांगितला आहे. ॥१८॥

-'अहोपण, वेद-शास्त्रांचें ज्ञान शोकाची निवृत्ति करणारें आहे, अशी प्रसिद्धि असतांना तें झाल्यावरहि त्याला अतिशोक कसा झाला ?' उत्तर --

वेदाभ्यासात्पुरा तापत्रयमात्रेण शोकिता ।
पश्चात्त्वभ्यासविस्मारभंगगर्वैश्च शोकिता ॥१९

अन्वयार्थ - [वेदाभ्यासांत् पुरा तापत्रयमात्रेण शोकिता-] वेदाभ्यास करण्याच्या पूर्वीं केवल आध्यात्मिकादि त्रिविध तापांमुळेंच त्याला दु:ख होत होतें. [च पश्चात् तु अभ्यास-विस्मार-भंग-गर्वै: शोकिता-] पण अध्ययनानंतर तें तयार ठेवण्याकरितां करावा लागणारा अभ्यास, केलेल्या अध्ययनाचें होणारें विस्मरण, अधिक विद्वानानें केलेला अपमान, आपल्यापेक्षां कोणी कमी विद्वान् आढळल्यास 'त्याच्यापेक्षां मी अधिक-श्रेष्ठ आहें' असा गर्व, इत्यादि अनेक कारणांमुळें अधिकच दु:ख होऊं लागलें.

प्रकाश:- जोपर्यंत त्यानें वेदशास्त्राचें अध्ययन केलें नव्हतें तोंपर्यंत त्यास आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक तापांच्या योगानेंच दु:ख होत होतें. म्हणजे अध्ययनाच्या पूर्वीं त्याच्या दु:खाचें एकच कारण होतें. पण अध्ययनानंतर तें तयार ठेवण्याकरितां करावा लागणारा अभ्यास, केलेल्या अध्ययनाचें होणारें विस्मरण, अधिक विद्वानानें केलेला अपमान; आपल्यापेक्षां कोणी कमी विद्वान् आढळल्यास त्याच्यासमोर वाहवा लागणारा गर्व, इत्यादि अनेक कारणांमुळें अधिकच दु:ख होऊं लागलें. ॥१९॥

-अध्ययन करून शोकाची निवृत्ति कां झाली नाहीं ? उत्तर --

सोऽहं विद्वन्प्रशोचामि शोकपारं नयात्र माम् ।
इत्युक्त: सुखमेवास्य पारमित्यभ्यधादृषि: ॥२०

अन्वयार्थ - [हे विद्वन् स: अहं प्रशोचामि-] हे विद्वाना, तो मी अतिदु:ख भोगीत आहें. [अत्र मां शोकपारं नय-] यांतून मला पार कर. [इति उक्त: ऋषि:-] असें नारदानें ज्याला सांगितलें आहे असा तो ऋषि ['सुखं एव अस्य पारं' इति अभ्यधात्-] 'सुख हेंच याचें परतीर आहे' असें सांगता झाला.

प्रकाश:- 'महाराज मी जरी सर्व शास्त्रें, सर्व वेद,

सर्व विद्या इत्यादिकांत निष्णात झालों आहें तरी मला अति कष्ट होत आहेत. यास्तव मला या शोकसागरांतून पार करा.' हें नारदाचें वचन ऐकून सनत्कुमार म्हणाले - भूमानामक ब्रह्माचा साक्षात्कार झाला असतां प्राणी सर्व दु:खांतून पार निघून जातो. यास्तव तूं ब्रह्मज्ञान संपादन कर. तोच एक शोकाच्या नाशाचा उपाय आहे. ॥२०॥

-'अहोपण, अनेक विषयांपासून होणारीं अनेक सुखें असतांना 'नाल्पे सुखमस्ति-' -श्लो. १७ पहा - हें म्हणणें अयोग्य आहे' अशी शंका घेऊन 'विषयसुखें दु:खमिश्रित असल्यामुळें विषयुक्त अन्नाला जसें विष म्हणावें त्याप्रमाणें मुनि त्यांना दु:खरूप समजतो,' असें समाधान सांगतात -

सुखं वैषयिकं शोकसहस्रेणावृतत्वत: ।
दु:खमेवेति मत्वाऽऽह नाल्पेऽस्ति सुखमित्यसौ ॥२१

अन्वयार्थ - [वैषयिकं सुखं शोकसहस्रेण आवृतत्वत: दु:खं एव-] विषयांच्या भोगापासून होणारें सुख हजारों शोकांनीं भरलेलें असल्यामुळें दु:खच होय, [इति मत्वा अल्पे सुखं न अस्ति इति असौ आह--] असें मानून 'क्षुद्र द्वैतामध्यें सुख नाहीं' असें मुनि म्हणाला.

प्रकाश:- आदि व अंत यांमध्यें जें दु:खरूप तें मध्यें जरी सुखरूप भासलें तरी दु:खच होय. विषयांचें अर्जन दु:खरूप व त्यांचा वियोगहि दु:खरूप. यास्तव ह्यांचा संयोगहि दु:खरूपच आहे, असा निश्चय करावा. ॥२१॥

-द्वैतांत सुख नसतें, हें कबूल करून अद्वैतांतहि तें नसतें, अशी शंका -

ननु द्वैते सुखं मा भूदद्वैतेऽप्यस्ति नो सुखम् ।
अस्ति चेदुपलभ्येत तथा च त्रिपुटी भवेत् ॥२२

अन्वयार्थ - [ननु द्वैते सुखं मा भूत्-] अहो, द्वैतामध्यें सुख नसो. [अद्वैते अपि सुखं नो अस्ति-] पण अद्वैतामध्येंहि तें नाहीं. [अस्ति चेत् उपलभ्येत-] कारण तें असतें तर प्रत्ययास आलें असतें. [तथा च त्रिपुटी भवेत्-] पण मग त्रिपुटी होते.

प्रकाश:- मग द्वैतामध्यें जसें सुख नाहीं तसेंच तें अद्वैतामध्येंहि नाहीं. बरें, आहे, असें जरी मानलें तरी त्याचा प्रत्यक्ष अनुभव येणें अशक्य आहे. कारण त्याचा अनुभव येतो असें नुसतें तोंडानें म्हटलें कीं त्रिपुटी आलीच. त्रिपुटीवांचून कोणत्याहि पदार्थाचा अनुभव येणें अगदीं अशक्य आहे. ॥२२॥

-अद्वैतांत सुख नाहीं, म्ह० तें सुखाचें अधिकरण नाहीं, ही गोष्ट सिद्धान्ती कबूल करितात -

मास्त्वद्वैते सुखं किं तु सुखमद्वैतमेव हि ।
किं मानमिति चेन्नास्ति मानाकांक्षा स्वयंप्रभे ॥२३

अन्वयार्थ -[अद्वैते सुखं मा अस्तु-] अद्वैतांत सुख नसो, तें नाहीं असें आम्हीहि म्हणतों. [किंतु हि अद्वैतं सुखं एव-] कारण अद्वैतच सुख आहे. त्यामुळें अद्वैत सुखाचें अधिकरण नाहीं. [किं मानं इति चेत्-] पण अद्वैतच सुख आहे; याविषयीं प्रमाण काय, म्हणून म्हणाल तर [स्वयंप्रभे मानाकांक्षा न अस्ति-] स्वयंप्रकाश अद्वैताला प्रमाणाची अपेक्षाच नाहीं.

प्रकाश:- अद्वैत हा एक धर्मी पदार्थ व सुख हा त्याचा धर्म असा यांमध्यें धर्मधर्मी संबंध नाहींच. तर अद्वैत हें सुखच होय. आतां, या श्रुतिप्रसिद्ध अर्थाविषयीं जर 'प्रमाण काय' म्हणून विचारूं लागलास तर जड पदार्थास जशी प्रमाणाची अपेक्षा असते तशी स्वयंप्रकाश वस्तूंस नसते, हेंच आम्ही उत्तर देणार. ॥२३॥

-'अद्वैत स्वयंप्रकाश आहे याविषयीं तरी प्रमाण काय ?' अशी शंका घेऊन 'तुझें वचनच त्याला प्रमाण आहे,' असें उत्तर --

स्वप्रभत्वे भवद्वाक्यं मानं यस्माद्भवानिदम् ।
अद्वैतमभ्युपेत्यास्मिन्सुखं नास्तीति भाषते ॥२४

अन्वयार्थ - [यस्मात् भवान् इदं अद्वैतं अभ्युपेत्य अस्मिन् सुखं नास्ति इति भाषते-] ज्याअर्थी आपण या अद्वैताचा स्वीकार करून यामध्यें सुख नाहीं असें सांगतां, [तस्मात् अस्य स्वप्रभवत्वे भवद्वाक्यं मानं-] त्याअर्थी याच्या स्वयंप्रकाशपणाविषयीं तुमचें वाक्यच प्रमाण आहे.

प्रकाश:- अरे पण, भल्या गृहस्था ! तूं अद्वैताचा अंगीकार करितोसना ? व नंतरच त्यांत सुख नाहीं म्हणून म्हणतोस ना ? असें जर असेल तर तुझें भाषणच त्याच्या स्वप्रभत्वाविषयीं प्रमाण आहे असें समज. कारण तें जर स्वयंप्रकाश नसतें तर त्याचा तुला स्वीकारहि करितां आला नसता व त्यांत सुख नाहीं असेंहि म्हणतां आलें नसतें. ॥२४॥

-'मी अद्वैत कबूल करीत नाहीं तर तुम्ही सांगितलेल्या अद्वैताचा नुस्ता अनुवाद करून त्यावर दूषण देत आहें. त्यामुळें माझ्या वचनावरून अद्वैताच्या स्वप्रकाशत्वाची सिद्धि होत नाहीं,' अशी शंका घेऊन सिद्धान्ती - 'तुझें अद्वैत कबूल न करणें अयोग्य आहे' अशा आशयानें प्रश्न करितात -

नाभ्युपैम्यहमद्वैतं त्वद्वचोऽनूद्य दूषणम् ।
वच्मीति चेत्तदा ब्रूहि किमासीद्द्वैततः पुरा ॥२५

अन्वयार्थ - [अहं अद्वैतं न अभ्युपैमि-] मी अद्वैताचा स्वीकार करीत नाहीं. [किंतु तद्वचः अनूद्य दूषणं वच्मि इति चेत्-] तर तुमच्या म्हणण्याचा अनुवाद करून केवल त्यावर दूषण देत आहें, असें जर म्हणशील [तदा द्वैततः पुरा किं आसीत् ब्रूहि--] तरमग द्वैताच्या पूर्वीं काय होतें तें सांग पाहूं.

प्रकाश:- वादी अद्वैताचा अंगीकारच करीत नाहीं असें पाहून सिद्धान्ती त्यास निरुत्तर करण्याकरितां अन्य प्रकारें प्रश्न करीत आहेत. ॥२५॥

-'पूर्व श्लोकांतील 'किं-' शब्दावरून सुचविलेला विकल्प दाखवितात -

किमद्वैतमुत द्वैतमन्यो वा कोटिरन्तिमः ।
अप्रसिद्धो न द्वितीयोऽनुत्पत्तेः शिष्यतेऽग्रिमः ॥२६

अन्वयार्थ - [किं अद्वैतं उत द्वैतं अन्यः वा कोटिः-] द्वैताच्या पूर्वीं अद्वैत होतें कीं द्वैत होतें कीं अन्य कांहीं प्रकार होता ? यांतील तिसऱ्या पक्षाचें निराकरण-- [अंतिमः- अप्रसिद्धः-] अन्य एखादा प्रकार होता ? म्हणून म्हणावें, तर तो मुळीं अप्रसिद्धच आहे. कारण द्वैत व अद्वैत यांहून विलक्षण असें रूप जगांत उपलब्धच होत नाहीं. दुसऱ्या पक्षाचें निराकरण - [अनुत्पत्तेः न द्वितीयः-] बरें, द्वैत होतें म्हणून म्हणावें, तर त्यावेळीं त्याची मुळीं उत्पत्तिच झालेली नसल्यामुळें दुसरा पक्षहि संभवत नाहीं. [अतः अग्रिमः शिष्यते-] यास्तव, पूर्वीं अद्वैत होतें हा पहिला पक्षच अवशिष्ट राहतो.

प्रकाश:- सृष्टीच्या पूर्वीं अद्वैत होतें कीं द्वैत होतें कीं या द्वैताद्वैताहून तिसराच प्रकार होता ? तिसराच होता म्हणून म्हणावें, तर त्याची कोणालाच ओळख नसल्यामुळें तो होता असें म्हणणेंहि युक्त नव्हे. द्वैताचें तर द्वैतरूप सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वीं अस्तित्वच संभवत नाहीं व त्यामुळें पूर्वीं अद्वैतच होतें असा निश्चय करावा लागतो. त्याचा अनुभव केव्हां येतो, हें पूर्वीं सोळाव्या श्लोकांत सांगितलेंच आहे. ॥२६॥

-'पण अशा प्रकारें अद्वैत युक्तीनेंच सिद्ध होतें, अनुभवानें सिद्ध होत नाहीं' अशी शंका -

अद्वैतसिद्धिर्युक्त्यैव नानुभूत्येति चेद्वद ।
निर्दृष्टान्ता सदृष्टान्ता वा कोट्यन्तरमत्र नो ॥२७

अन्वयार्थ - [अद्वैतसिद्धिः युक्त्या एव न अनुभूत्या इति चेत्-] अद्वैताची सिद्धि युक्तीनेंच होते अनुभवाच्या योगानें होत नाहीं; असें जर म्हणशील

तर [निर्दृष्टान्ता सदृष्टान्ता वा वद-] ती युक्ति सदृष्टान्त आहे कीं दृष्टान्तावांचून आहे सांग पाहूं ! [अत्र कोट्यंतरं नो अस्ति-] येथें याहून अन्य प्रकार तर संभवत नाहीं.

प्रकाश:- युक्तिद्वाराच अद्वैतसिद्धि होते. त्यावांचून तिला दुसरा उपाय नाहीं. असें जर तुला वाटत असेल तर आम्ही तुला असें विचारितों कीं, ज्या युक्तीच्याद्वारा तूं अद्वैतसिद्धि करणार ती युक्ति दृष्टान्तयुक्त आहे कीं, दृष्टान्तावांचून आहे. दृष्टान्तावांचूनहि आहे व त्यासहहि आहे, असें तर तुला मुळीं म्हणतांच येणार नाहीं. कारण, असा प्रकार कोठेंहि दिसत नाहीं. ॥२७॥

-'आमची अद्वैतसिद्धि करणारी युक्ति दृष्टान्तशून्य आहे,' असें जर म्हणशील, तर -

नानुभूतिर्न दृष्टान्त इति युक्तिस्तु शोभते ।
सदृष्टान्तत्वपक्षे तु दृष्टान्तं वद मे मतम् ॥२८

अन्वयार्थ - [न अनुभूति: न दृष्टान्त: इति युक्ति: तु शोभते-] अनुभवहि नाहीं व जिला दृष्टांतहि नाहीं असली युक्ती तर फारच शोभते ! [सदृष्टांतत्व-पक्षे तु मे मतं दृष्टान्तं वद-] बरें, युक्ति दृष्टान्तयुक्त आहे हा दुसरा पक्ष जर तुला स्वीकारावयाचा असला तर मला मान्य होईल असा दृष्टान्त सांग पाहूं !

प्रकाश:- अद्वैताची सिद्धि केवल युक्तिद्वाराच होणें शक्य आहे असें म्हणणारा वादी वेदान्तसिद्ध अनुभवाचा अंगीकार करणार नाहीं हें उघडच आहे. पण, ती युक्ति दृष्टान्तावांचून आहे असे जर तो म्हणूं लागला तर तें अयोग्यच होणार ! कारण, दृष्टान्तावांचून युक्तिसिद्धि होत नसते. बरें; ती आमची युक्ति दृष्टान्तयुक्त आहे असें जर म्हणशील तर कोणता दृष्टान्त देतोस तो दे पाहूं. कोणताहि दृष्टान्त वादी व प्रतिवादी या उभयतांस मान्य असावा लागतो, हें तूं विसरला नसशीलच. ॥२८॥

-वादी मी 'दृष्टान्तानेंच अद्वैत सिद्ध करितों,' अशी शंका घेतो -

अद्वैत: प्रलयौ द्वैतानुपलंभेन, सुप्तिवत् ।
इति चेत्सुप्तिरद्वैतेत्यत्र दृष्टांतमीरय ॥२९

अन्वयार्थ - [प्रलय: अद्वैत: द्वैतानुपलंभेन सुप्तिवत्, इति चेत्-]'प्रलयकाल द्वैतशून्य आहे. कारण त्यांत द्वैताची उपलब्धि होत नाहीं. सुषुप्तीप्रमाणें.' असें जर अनुमान करीत असशील तर [सुप्ति: अद्वैता इत्यत्र दृष्टान्तं ईरय-] सुषुप्ति अद्वैतद्वैतशून्य आहे; याविषयीं दृष्टान्त दे पाहूं !

प्रकाश:- या श्लोकांतील युक्तिसंज्ञक अनुमानांत प्रलयकाल हा पक्ष आहे. द्वैताचें शून्यत्व किंवा अद्वैतत्व हें साध्य आहे. द्वैताची प्रतीति येत नाहीं म्हणून, इत्यादि हेतु आहे व सुषुप्तीमध्यें जसा द्वैताचा अभाव असतो त्याप्रमाणें हा दृष्टान्त आहे. अर्थात् हें अनुमान तर बरोबर आहे. पण, सिद्धान्ती वाद्यास विचारतात कीं, तूं जो सुषुप्तीचा दृष्टान्त देत आहेस तो कोणाच्या सुषुप्तीचा? आपल्या कीं दुसऱ्याच्या ? आपल्या सुषुप्तीचा जर दृष्टान्त देत असलास तर ती दुसऱ्याच्या अनुभवास येण्यासारखी नसल्यामुळें तिची सिद्धीहि तुला युक्तीद्वाराच करावी लागणार, हें उघड आहे. यास्तव, त्या युक्तीकरितां तूं कोणता दृष्टान्त देतोस तो दे पाहूं ! ॥२९॥

-'दुसऱ्याच्या सुषुप्तीचाच दृष्टान्त आहे' असें वादी म्हणतो व सिद्धान्ती त्याचा उपहास करितात -

दृष्टान्त: परसुप्तिश्चेदहो ते कौशलं महत् ।
य: स्वसुप्तिं न वेत्त्यस्य परसुप्तौ तु का कथा ॥३०

अन्वयार्थ - [परसुप्ति: दृष्टान्त: इति चेत् अहो ते महत् कौशलं-] दुसऱ्याची सुषुप्ति हाच दृष्टान्त आहे असें जर म्हणशील, तर तुझें फारच मोठें चातुर्य आहे !! [य: स्वसुप्तिं न वेत्ति अस्य परसुप्तौ तु का कथा-] कारण जो आपल्या सुषुप्तीलाहि जाणत नाहीं, तो दुसऱ्याच्या सुषुप्तीविषयीं काय बोलणार !

प्रकाश:- वाद्यास अद्वैताचा अनुभव मान्य नसल्यामुळेंच हाच असा उडवाउडवीचा जबाब द्यावा लागत आहे. सुषुप्तीमध्यें जें अद्वैत असतें त्याची सिद्धि युक्तीच्या द्वारा होते अनुभवाच्या द्वारा नव्हे, असें त्याचें मत असल्यामुळें त्यास अद्वैतसिद्धि करितांना निर्दोष दृष्टान्त मिळत नाहीं. आणि त्यामुळेंहि असा हा उपहास होतो. ॥३०॥

-'अनुमानानें दुसऱ्याच्या सुषुप्तीची सिद्धि होते' अशी शंका -

निश्चेष्टत्वात्पर: सुप्तो यथाऽहमिति चेत्तदा ।
उदाहर्तु: सुषुप्तेस्ते स्वप्रभत्वं बलाद्भवेत् ॥३१

अन्वयार्थ - [यथा अहं तथा पर: निश्चेष्टत्वात् सुप्त अस्ति इति चेत्-] ज्याप्रमाणें मी त्याप्रमाणें हा दुसरा निश्चेष्टपणामुळें गाढ निजलेला आहे असें जर अनुमान करूं लागलास [तदा उदाहर्तु: ते सुषुप्ते: स्वप्रभत्वं बलात् भवेत्-] तर उदाहरण देणाऱ्या तुझ्या सुषुप्तीचें स्वयंप्रकाशत्व बलात्कारानें सिद्ध होईल !

प्रकाश:- दुसऱ्याच्या सुषुप्तीविषयीं अनुमान कसें करितां येतें तें अगोदर दाखवून नंतर त्याच्यावर दोष दिला पाहिजे. 'हा (दुसरा) पुरुष यावेळीं सुषुप्तीमध्यें आहे. कारण तो निश्चेष्ट आहे. जो जो प्राणयुक्त असूनहि निश्चेष्ट असतो तो तो सुषुप्तीमध्यें असतो. जसा - 'मी' या अनुमानावरून आपल्या सुषुप्तीच्या दृष्टान्तावरून दुसऱ्याच्या सुषुप्तीची सिद्धि होते असें जर म्हणशील तर माझ्या समजुतीकरितां सुषुप्तीस दृष्टान्त बनविणाऱ्या तुझ्या सुषुप्तीच्या ठायीं तुझी इच्छा नसली तरी स्वयंप्रकाशत्व येईल. कारण, ती स्वयंप्रकाश असल्यावांचून तुला तिचा दृष्टान्त देतां येणार नाहीं ॥३१॥

-'तें कसें ?' उत्तर --

नेंद्रियाणि न दृष्टांतस्तथाऽप्यंगीकरोषि ताम् ।
इदमेव स्वप्रभत्वं यद्भानं साधनैर्विना ॥३२

अन्वयार्थ - [इंद्रियाणि न, दृष्टान्त: न, तथापि तां अंगीकरोषि-] इंदियें नाहींत; योग्य दृष्टान्त नाहीं; तरी तूं त्या सुषुप्तीचा अंगीकार करितोस. [यत् साधनै: विना भानं, इदं एव स्वप्रभत्वं--] जें साधनावांचून भान तेंच स्वप्रभत्व होय.

प्रकाश:- निद्रासमयीं सर्व इंद्रियें आपल्या करणामध्यें लीन होत असल्यामुळें तीं सुषुप्तीचें ग्रहण करीत नाहींत; हें उघडच आहे. तसाच दोघांनाहि मान्य होण्यासारखा दृष्टान्तहि पण नाहीं; तरी सुद्धां तूं तिचा अंगीकार करितोस ! अर्थात् सुषुप्तींतील अद्वैत स्वप्रकाशरूप आहे असें शब्दांनीं जरी नाहीं तरी तें पर्यायानें तूं कबूल करितोस असें होतें. कारण, साधनावांचून भान होणें (प्रत्यय येणें) हेंच स्वयंप्रकाशत्व होय. ॥३२॥

-याप्रमाणें प्रलयाच्या दृष्टान्तत्वानें सांगितलेल्या सुषुप्तीचे अद्वैतत्व व स्वप्रभत्व सिद्ध करून तिच्यांतील सुखाची सिद्धि करण्यासाठीं वाद्याची आकांक्षा उत्थापित करितात -

स्तामद्वैतस्वप्रभत्वे वद सुप्तौ सुखं कथम् ।
शृणु दु:खं तदा नास्ति ततस्ते शिष्यते सुखम् ॥३३

अन्वयार्थ - [अद्वैतस्वप्रभत्वे स्तां-] अद्वैत व स्वप्रभत्व हे दोन धर्म असोत. [किंतु सुप्तौ सुखं कथं वद-] पण सुषुप्तींत सुख कसें असतें ? सांग [श्रृणु- -]ऐक. [तदा दु:खं नास्ति-] त्यावेळीं दु:ख नसतें [तत: ते सुखं शिष्यते-] त्यामुळेंच तुझें सुख राहतें.

प्रकाश:- या श्लोकाच्या दुसऱ्या अर्धांत वाद्याच्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. प्राण्याच्या दोन अवस्था असतात. एक सुख व दुसरी दु:ख. त्यापैकीं एक असते तेव्हां दुसरी नसते व दुसरी असते तेव्हां पहिली नसते, असा नियम आहे. त्यामुळें सुषुप्तींत दु:ख नसल्यामुळें बाकी राहणारें सुख असतें असा निश्चय

करितां येतो. ॥३३॥

-'सुषुप्तींत दु:ख नसतें, याविषयीं प्रमाण काय ?' अशी आशंका घेऊन श्रुति व अनुभव हीं प्रमाणें सांगतात-

अंध:सन्नप्यनंध: स्याद्विद्धोऽविद्धोऽथ रोग्यपि ।
अरोगीति श्रुति: प्राह तच्च सर्वे जना विदु: ॥३४

अन्वयार्थ - [अंध: सन् अपि अनंध: स्यात्-] अंध असूनहि डोळस होतो, [विद्ध: अविद्ध: स्यात्-] विद्ध असूनहि अविद्ध होतो, [अथ रोगी अपि अरोगी इति श्रुति: प्राह-] रोगी असूनहि निरोगी होतो, असें श्रुति सांगते. [च तत् सर्वे जना: विदु:--] व सर्व लोक तें स्वानुभवानेंच जाणतात.

प्रकाश:- छान्दोग्यामध्यें 'तस्माद्वा एतं सेतुं तीर्त्वा अन्ध: सन्नन्धो भवति' (८-४ व १०) ह्या सेतूवरून पार गेल्यावर आंधळ्यास दिसूं लागतें. म्हणजे त्याचा उपाधिजन्य दोष निवृत्त होतो. ज्याला जखम झालेली असते तो बरा होतो. रोगी रोगरहित होतो - इत्यादि प्रकारें वर्णन केलें आहे. अर्थात् हें श्रुतिप्रमाण झालें व सर्व लोकांचा असाच अनुभव असल्यामुळें याविषयीं अनुभव हेंहि एक दुसरें प्रमाण आहे. ॥३४॥

-'पण जेथें दु:ख नसतें तेथें सुख असतेंच असा कांहीं नियम नाहीं;' अशी शंका घेऊन उत्तर -

न दु:खाभावमात्रेण सुखं लोष्टशिलादिषु ।
द्वयाभावस्य दृष्टत्वादिति चेद्विषमं वच: ॥३५

अन्वयार्थ - [लोष्टशिलादिषु द्वयाभावस्य दृष्टत्वात्-] लोष्ट-शिलादिकांमध्यें दोहोंचाहि अभाव असतो असा अनुभव येत असल्यामुळें [तत्र दु:खाभाव मात्रेण न सुखं इति चेत्-] सुषुप्तीमध्यें केवल दु:खाचा अभाव असतो, एवढ्यावरूनच सुख सिद्ध होत नाहीं, असें जर म्हणशील तर [विषमं वच:-] तें विषम वचन आहे.

प्रकाश:- या श्लोकांत इतर सर्व भाग शंकारूप असून 'विषमं वच:' एवढाच भाग उत्तररूप आहे. दु:ख व सुख एकाच कालीं एके ठिकाणीं राहूं शकतात; असें दाखविण्याकरितां वाद्यानें येथें मातीचें ढेकूळ, दगड इत्यादिकांचा दृष्टान्त दिला आहे. ॥३५॥

-दृष्टान्त दार्ष्टान्तिकाला अनुकूल कसा नाहीं, त्याचेंच उपपादन करितात -

मुखदैन्यविकासाभ्यां परदु:खसुखोहनम् ।
दैन्याद्यभावतो लोष्टे दु:खाद्यूहो न संभवेत् ॥३६

अन्वयार्थ - [मुखदैन्यविकासाभ्यां परदु:ख-सुखोहनं भवति--] मुख दीन होणें व तें प्रसन्न असणें, यांवरून दुसऱ्याच्या दु:खसुखांचा तर्क होतो. [किंतु लोष्टे दैन्याद्यभावत: दु:खाद्युह: न संभवेत्-] पण मातीच्या ढेकळामध्यें दैन्यादिकांचा अभाव असल्यामुळें दु:खादिकांचा तर्क संभवत नाहीं.

प्रकाश:- ज्याचें मुख उतरलेलें असतें तो दु:खी आहे व ज्याचें प्रसन्न असतें तो सुखी आहे असा तर्क होतो. पण दगड, मातीचें ढेकूळ यांच्या ठिकाणीं यांतील एकहि चिन्ह नसल्यामुळें जड पदार्थ सुखी आहेत किंवा दु:खी आहेत असा नियम करितां येत नाहीं. ॥३६॥

-आतां दुसऱ्याच्या सुखदु:खांहून आपल्या सुख:दु:खांतील वैषम्य दाखवितात --

स्वकीये सुखदु:खे तु नोहनीये ततस्तयो: ।
भावो वेद्योऽनुभूत्यैव तदभावोऽपि नान्यत: ॥३७

अन्वयार्थ - [तु स्वकीये सुखदु:खे न ऊहनीये-] पण आपलें सुखदु:ख तर्क करितां येण्यासारखें नाहीं. [तत: तयो: भाव: अनुभूत्या एव वेद्य:-] त्यामुळें त्यांचें सत्त्व अनुभवावरूनच सिद्ध होणार [तदभाव: अपि अन्यत: न-] व त्यांचा अभावहि अनुभवावांचून दुसऱ्या कशानेंहि समजत नाहीं.

प्रकाश:- प्रत्येक प्राण्यास त्याच्या दु:खाचा व

सुखाचा साक्षात् अनुभव येत असल्यामुळें त्यांच्या विषयीं तर्क करितां येणें अशक्य आहे. त्याचें अस्तित्व व नास्तित्व या उभयतांचेंहि अनुभवावरूनच ज्ञान होत असतें ।।३७।।

-तात्पर्य --

तथा सति स्वसुप्तौ च दु:खाभावोऽनुभूतित: ।
विरोधिदु:खराहित्यात्सुखं निर्विघ्नमिष्यताम् ।।३८

अन्वयार्थ - [तथा सति स्वसुप्तौ च दु:खाभाव: अपि अनुभूतित: सिद्ध:-] आपलें सुखादिक अनुभवगम्य आहे असें सिद्ध झालें असतां आपल्या सुषुप्तींतील दु:खाचा अभावहि अनुभवानेंच सिद्ध झाला. [अत: विरोधिदु:खराहित्यात् निर्विघ्नंसुखं इष्यताम्-] यास्तव सुषुप्तींत विरोधी दु:खाचाहि अभाव असल्यामुळें निर्बाध सुखाचा स्वीकार करावा.

प्रकाश:- सुखदु:ख अनुभवास येण्यासारखें आहे, असा एकदा निश्चय झाला कीं, सुषुप्तींतील दु:खाच्या अभावाचाहि अनुभवच आला पाहिजे हें ठरतें. पण त्या अवस्थेंत सुखाशीं विरोध करणाऱ्या दु:खाचा लेशहि नसल्यामुळें अबाधित सुखाचा अंगीकार करावा, म्हणजे तेथें अशा प्रकारचें सुख आहे असें मानावें. ।।३८।।

-मनुष्य शय्यादि सुखसाधनांचें संपादन करीत असल्यामुळेंहि, सुषुप्तींत सुखच असतें, ही गोष्ट सिद्ध होते, असें सांगतात -

महत्तरप्रयासेन मृदुशय्यादिसाधनम् ।।
कुत: संपाद्यते सुप्तौ सुखं चेत्तत्र नो भवेत् ।।३९

अन्वयार्थ - [तत्र सुप्तौ सुखं नो भवेत् चेत्-] त्या सुषुप्तीमध्यें सुख जर नसतें [तर्हि महत्तरप्रयासेन मृदुशय्यादिसाधनं कुत: संपाद्यते--] तर फार मोठ्या प्रयासानें मृदु शय्यादि साधनांचें संपादन मनुष्यानें कां केलें असतें ?

प्रकाश:- मोठा थोरला बिछाना, पलंग, गाद्या, गिरद्या, उशा इत्यादि पदार्थ प्राणाहून प्रिय असें द्रव्य खर्चूनहि मनुष्य मिळवीत असतो, हें सुप्रसिद्ध आहे. निद्रेमध्यें खरोखरीच जर सुख नसतें तर त्यानें हें कधीं तरी केलें असतें का ? सती जाणारी स्त्री, माझ्या खालीं मऊ मऊ लांकडें घाला असें कधीं म्हणत नाहीं. ।।३९।।

-साधनें सुखाकरितांच असतात --

दु:खनाशार्थमेवैतदिति चेद्रोगिणस्तथा ।
भवत्वरोगिणस्त्वेतत्सुखायैवेति निश्चिनु ।।४०

अन्वयार्थ - [एतत् दु:खनाशार्थं एव इति चेत्-] हें शय्यादि साधनसंपादन दु:खाच्या नाशासाठींच तो करीत असतो, म्हणून जर म्हणशील तर [रोगिण: तथा अस्तु-] रोग्याचें शय्यादि संपादन रोगादि दु:खाच्या नाशासाठीं असो [अरोगिण: तु एतत् सुखाय एव इति निश्चिनु-] पण जो रोगी नाहीं तोहि शय्यादिसाधन संपादन जें करितो तें सुखासाठींच होय, असा तूं निश्चय कर.

प्रकाश:- रोगी पुरुषानेंच जर मऊ मऊ गाद्या वगैरे यांची इच्छा केली असती तर ती दु:खाच्या नाशार्थच आहे असें आम्हीं म्हटलें असतें. पण रोग्यापेक्षां निरोग्यासच त्यांची मोठी हांव असल्याचें दिसतें. अर्थात् शय्यादि साधनें सुखाकरितांच आहेत; केवल दु:खनिवारणाकरितां नव्हेत. ।।४०।।

-'अहोपण, सुषुप्तींतील सुख शय्यादि साधन-जन्य जर असेल तर त्याला आत्मस्वरूपसुख म्हणतां येणार नाहीं,' अशी शंका --

तर्हि साधनजन्यत्वात्सुखं वैषयिकं भवेत् ।
भवत्वेवात्र निद्राया: पूर्वं शय्यासनादिजम् ।।४१

अन्वयार्थ - [तर्हि साधनजन्यत्वात् इदं वैषयिकं सुखं भवेत्-] तर मग साधनांपासून उत्पन्न होणारें असल्यामुळें हें विषयसंबंधीं सुख आहे असें होणार ! [अत्र निद्राया: पूर्वं शय्यासनादिजं भवतु एव-] निद्रेच्या पूर्वीं शय्या, आसन इत्यादिकांच्या

योगानें होणारें सुख विषयसंबंधी खुशाल असो.

प्रकाश:- साधनांच्या द्वारा जें सुख होतें तें वैषयिक होय, असा तुमचा नियम असल्यामुळें शय्या इत्यादि साधनांमुळें होणारें सुखहि वैषयिक आहे असें म्हणावयास पाहिजे असें वादी म्हणत आहे. पण तें आम्हांस इष्टच असल्यामुळें त्याविषयीं वाद करण्याचें कांहीं कारण नाहीं असें सिद्धान्ती या श्लोकाच्या उत्तरार्धात सांगत आहेत. 'निद्रा लागण्यापूर्वी गाद्यागिरद्यांमुळें जें सुख होत असतें तें विषयसंबंधींच होय. पण निद्रा लागल्यानंतर जें होतें तें साधनजन्य नसल्यामुळें वैषयिक नव्हे' असा या उत्तरार्धाचा भाव समजावा. ॥४१॥

-पुढील श्लोकांत दुसऱ्या पक्षाचें निराकरण करितात-

निद्रायां तु सुखं यत्तज्जन्यते केन हेतुना ।
सुखाभिमुखधीरादौ पश्चान्मज्जेत्परे सुखे ॥४२

अन्वयार्थ - [निद्रायां तु यत् सुखं तत् केन हेतुना जन्यते-] पण निद्रेमध्यें जें सुख असते तें कोणत्या साधनानें झालेलें असतें ? कोणत्याच नाहीं. कारण झोपेत शय्यादिकांचें अनुसंधान नसतें. त्यामुळें तें शय्यादिजन्य आहे, असें म्हणतां येत नाहीं. 'अहोपण झोंपेत साधनापासून न होणारें स्वरूपभूत सुख जर आहे तर त्याचा अनुभव कां येत नाहीं ?' उत्तर - [आदौ सुखाभिमुखधी: पश्चात् परे सुखे मज्जेत्-] झोंप लागण्याच्या पूर्वक्षणीं जीव ज्याची बुद्धि शय्यादिजन्य सुखाच्या अभिमुख झाली आहे असा होतो, आणि मागून-निद्राकालीं तो उत्कृष्ट स्वरूपसुखांत लीन होऊन जातो.

प्रकाश:- निद्रेतील सुख हें वैषयिक नाहीं. कारण तें कोणत्याहि साधनापासून उत्पन्न होत नसतें. वादी:- मग असें जर आहे तर त्या सुखाचा इतर वैषयिक सुखांप्रमाणें अनुभव कां येत नाहीं ? सिद्धान्ती:- निद्रेमध्यें सुखाचा अनुभव घेणाराच सुखामध्यें निमग्न होऊन जात असल्यामुळें विषयसुखाप्रमाणें याचा अनुभव येत नाहीं. सारांश निद्रा लागण्यापूर्वी मनुष्याची बुद्धि सुखाभिमुख झालेली असते व नंतर निद्रा लागतांच तो स्वरूपसुखामध्यें निमग्न होतो. ॥४२॥

-संक्षेपत: सांगितलेला अर्थच पुढील श्लोकांत अधिक स्पष्ट करितात -

जाग्रद्व्यापृतिभि: श्रांतो विश्रम्याथ विरोधिनि ।
अपनीते स्वस्थचित्तोऽनुभवेद्विषये सुखम् ॥४३

अन्वयार्थ - [जाग्रद्व्यापृतिभि: श्रांत:-] जीव जागरावस्थेंतील निरनिराळ्या व्यवहारांनीं श्रांत होत्साता [विश्रम्य-] मृदुशय्यादिकांवर शयन करून [अथ विरोधिनि अपनीते सति-] त्यानंतर जाग्रद्व्यापारजनित विरोधी दु:खाचें निवारण झालें असतां [स्वस्थचित्त: सन् विषये सुखं अनुभवेत्-] अव्याकुलचित्त होऊन शय्यादि विषयजन्य सुखाचा अनुभव येतो.

प्रकाश:- उजाडल्यापासून दिवस मावळेपर्यंत श्रम करून थकलेल्या जीवास रात्रीं विश्रांति घ्यावी अशी इच्छा होते. व नंतर तो मऊ बिछान्यावर पडून जरा स्वस्थ होतो व त्यामुळें त्याचें श्रम कमी होतात. पुढें चित्त स्वस्थ झाल्यामुळें व पूर्वीच्या दु:खाचा वेग कमी झाल्यामुळें त्यास त्या मऊ गाद्यागिरद्यांपासून सुख होऊं लागतें. ॥४३॥

-'विषयसुख कशा प्रकारचें ?' अशी आकांक्षा झाली असतां त्याचें स्वरूप दाखविणारे ग्रंथकार परम सुखांत निमग्न होण्याचें निमित्त, या रूपानें त्या विषयसुखानुभवांतील श्रमहि दाखवितात -

आत्माभिमुखधीवृत्तौ स्वानंद: प्रतिबिंबति ।
अनुभूयैनमत्रापि त्रिपुट्या श्रांतिमाप्नुयात् ॥४४

अन्वयार्थ - [आत्माभिमुखधीवृत्तौ स्वानंद: प्रतिबिंबति-] आत्म्याच्या सन्मुख झालेल्या बुद्धिवृत्तींत स्वानंद प्रतिबिंबित होतो. [अत्र अपि एनं अनुभूय त्रिपुट्या श्रांतिं आप्नुयात्-] पण या वेळींहि

या विषयानंदाचा अनुभव घेऊन त्रिपुटीमुळें त्यास श्रम होतात.

प्रकाश:- जाग्रतींत अश्रांत श्रम करून दु:खी झालेला जीव त्याच्या निवृत्तीकरितां मृदु शय्येवर पडला असतां त्याची बुद्धि अंतर्मुख होते. नंतर मुखासमोर आलेल्या आरशांत मुख जसें प्रतिबिंबित होतें त्याप्रमाणें बुद्धिवृत्तीमध्यें स्वरूपभूत आनंद प्रतिबिंबित होतो. यासच विषयानंद म्हणतात. पण या आनंदाचा अनुभव घेतांनाहि त्रिपुटीच्या द्वारा जीवास श्रम होतात. म्हणजे त्यावेळींहि अनुभव घेणारा, खुद्द अनुभव व अनुभवाचा विषय अशा त्रिपुटीचें अस्तित्व असल्यामुळें त्याच्या योगानें जीवास त्रास होतो. कारण अद्वैतानंदाची चटक लागल्यामुळें त्यास त्रिपुटीहि कंटाळवाणी वाटणार हें उघड आहे. ॥४४॥

-नंतर --

तच्छ्रमस्यापनुत्त्यर्थं जीवो धावेत्परात्मनि ।
तेनैक्यं प्राप्य तत्रत्यो ब्रह्मानंद: स्वयं भवेत् ॥४५

अन्वयार्थ - [तच्छ्रमस्य अपनुत्त्यर्थं जीव: परात्मनि धावेत्-] त्या त्रिपुटीदर्शनामुळें होणाऱ्या **श्रमाच्या निराकरणार्थ तोच जीव परमात्म्यामध्यें - आनंदरूप ब्रह्मामध्यें सत्वर जातो.[तथा च तेन ऐक्यं प्राप्य स्वयं तत्रत्य: ब्रह्मानन्द: भवेत्-] आणि 'सता सोम्य तदा संपन्नो भवति' -छा. भा. ६.८.१. या श्रुतींत सांगितल्याप्रमाणें त्या ब्रह्माशीं तादात्म्य पावून स्वत:हि त्या सुषुप्तींत स्थित असलेला ब्रह्मानंद होतो.**

प्रकाश:- या पूर्वोक्त किंचित् श्रमाचाहि नाश करण्याकरितां जीव परमात्म्याचा आश्रय करितो. कारण 'परमात्मा आनंदरूप आहे व तेथें गेल्यासच माझ्या या दु:खाचें निवारण होणार' असें त्यास पक्केपणीं ठाऊक नसलें तरी तसा अनुभव येत असतो. व्यवहारांतहि आपण दु:खाच्या भीतीनें समर्थाचा आश्रय करीत असतोंच. परमात्म्याकडे जाऊन त्याच्या स्वरूपांत एकदा मिळून गेल्यावर हा जीवच स्वत: ब्रह्मानन्द होतो. ॥४५॥

-याच सुषुप्तींतील आनंदाविषयीं श्रुतीनें शकुनि प्रभृतींचे अनेक दृष्टान्त दिले आहेत, असें आतां सांगतात -

दृष्टांता: शकुनि: श्येन: कुमारश्च महानृप: ।
महाब्राह्मण इत्येते सुप्त्यानंदे श्रुतीरिता: ॥४६

अन्वयार्थ - [सुप्त्यानन्दे शकुनि: श्येन:, कुमार:, महानृप:, महाब्राह्मण: इति एते दृष्टान्ता: श्रुतीरिता: सन्ति-] सुषुप्तींतील आनंदाविषयीं शकुनि, श्येन, बालक, नृपति व महाब्राह्मण असे दृष्टान्त श्रुतीनें सांगितले आहेत.

प्रकाश:- या श्लोकांतील सर्व दृष्टान्तांचें व्याख्यान आतां पुढें क्रमानेंच होणार आहे. त्यावेळीं कोणता दृष्टान्त कोणच्या उपनिषदांतील आहे; हेंहि स्पष्ट होईल. ॥४६॥

त्यांतील 'स यथा शकुनि:०... प्राणबन्धनं हि सोम्य मन:' या दृष्टान्त-दार्ष्टान्तिकप्रतिपादनपर छांदोग्य-श्रुतिवाक्याचा अर्थ दोन श्लोकांनीं संक्षेपत: सांगतात -

शकुनि: सूत्रबद्ध: सन् दिक्षु व्यापृत्य विश्रमम् ।
अलब्ध्वा बंधनस्थानं हस्तस्तंभाद्युपाश्रयेत् ॥४७
जीवोपाधिमनस्तद्वद्धर्माधर्मफलाप्तये ॥
स्वप्न जाग्रति च भ्रान्त्वा क्षीणे कर्मणि लीयते ॥४८

अन्वयार्थ - [शकुनि: सूत्रबद्ध: सन्-] **पक्षी हात, खांब इत्यादि कोठें तरी आधारसूत्रानें बांधलेला** [दिक्षु व्यापृत्य-] पूर्वादि दिशांमध्यें व्यापार- **उडण्याचा प्रयत्न करून** [विश्रमं अलब्ध्वा-] त्यांत **कोठेंच आधार न मिळून** [हस्तस्तंभादि बंधनस्थानं यथा उपाश्रयेत्-] हात, स्तंभ इत्यादि

बंधस्थानाचाच जसा आश्रय करितो [तद्वत् जीवोपाधिमन: धर्माधर्मफलाप्तये-] त्याप्रमाणें जीवोपाधिभूत मनहि पुण्य-पापांचें सुखदु:खादि फल भोगण्यासाठीं [स्वप्ने च जाग्रति भ्रांत्वा-] स्वप्न व जागर या अवस्थांमध्यें भ्रमण करून [कर्मणि क्षीणे सति लीयते-] भोगप्रद कर्म क्षीण झालें असतां आपल्या उपादानभूत अज्ञानांत लीन होतें. त्याचा लय झाला असतां तदुपाधिक जीव परमात्माच होतो. - छा. भा. ६.८.२ पहा.

प्रकाश:- पक्ष्याच्या पायांस दोरी बांधून तिचें दुसरें टोंक एकाद्या खांबास किंवा बोटासच बांधून त्याची कशी गंमत होते तें कांहीं शोकी पाहत बसतात. पण अशा वेळीं तो बिचारा पक्षी या काळाच्या हातांतून सुटण्याकरितां इकडे तिकडे उडून पाहतो; पण व्यर्थ. पुढें निराश होऊन तो बिचारा बंधनस्थानीं येऊन बसतो. ह्या दृष्टान्ताप्रमाणेंच मन धर्माधर्मादिकाचें फल भोगण्याकरितां स्वप्न व जाग्रती या दोन विक्षेपरूप अवस्थेंत फिरून, शेवटीं आपल्या कारणांत लीन होतें. या स्थळीं मन पक्ष्याच्या स्थानीं, स्वप्न व जागर दिशांच्या स्थानीं, अज्ञान बंधनाच्या स्थानीं व धर्माधर्म सूत्राच्या स्थानीं आहेत असें समजावें. ।।४७,४८।।

-आतां 'तद्यथास्मिन्नाकाशे०' इत्यादि बृहदारण्यकस्थ श्येनदृष्टान्तपर वाक्याचा अर्थ थोडक्यांत सांगतात -

श्येनो वेगेन नीडैकलंपट: शयितुं व्रजेत् ।
जीव: सुप्त्यै तथा धावेद्ब्रह्मानंदैकलंपट: ।।४९

अन्वयार्थ - [यथा श्येन: शयितुं नीडैकलंपट: सन् वेगेन व्रजेत्-] जसा आकाशांत सर्वत: संचार करणारा श्येन पक्षी आकाशांतील संचारामुळें झालेल्या श्रमाचा परिहार करण्यासाठीं शयनार्थ केवल आपल्या घरट्याचीच इच्छा करून शीघ्र गमन करितो [तथा जीव: ब्रह्मानंदैकलंपट: सन् सुप्त्यै धावेत्-] तसाच हा जीव-मन-उपाधिक चिदाभासहि केवल ब्रह्मानंदाचाच अभिलाष धरून शयनार्थ हृदयाकाशांत शीघ्र गमन करितो. -बृह. भा. २.१.१९.

प्रकाश:- बृहदारण्यकामध्यें "ज्याप्रमाणें श्येन किंवा गरुड पक्षी आकाशांत चोहोंकडे उडून श्रांत होत्साता आपले पंख सारखे जुळून आपल्या घरट्याचा रस्ता धरितो, त्याप्रमाणें हा पुरुष या आनंदाकरितां धांवतो." इत्यादि प्रकारें वर्णन आहे व त्याच्या आधारानेंच ग्रंथकारांनीं येथेंहि उल्लेख केला आहे. या दृष्टान्तांतील श्येन पक्ष्याच्या ठायीं दार्ष्टान्तिकांतील जीव असून तो जसा घरट्याचे ठायीं लंपट होतो तसा हा ब्रह्मानंदाचे ठायीं लंपट होतो. त्याला जसे आकाशांत फिरल्यामुळें श्रम होतात तसे यास विक्षेपरूप पूर्वोक्त दोन्हीं अवस्थांमध्यें फिरत असतांना श्रम होतात. तो जसा घरट्यामध्यें शिरतो तसा हा हृदयाकाशांत शिरतो. तात्पर्य, भोग भोगून श्रांत झालेल्या जीवास आपल्या शांत स्वरूपाची इच्छा होते. ।।४९।।

-आतां 'स यथा कुमारो वा०' या कुमारादि तीन दृष्टान्त देणाऱ्या बालाकि. ब्राह्मणगत वाक्यांचें तीन श्लोकांनीं व्याख्यान करितात-

अतिबाल: स्तनं पीत्वा मृदुशय्यागतो हसन् ।
रागद्वेषाद्यनुत्पत्तेरानंदैकस्वभावभाक् ।।५०

अन्वयार्थ - [यथा अतिबाल: स्तनं पीत्वा मृदुशय्यागत: हसन् रागद्वेषाद्यनुत्पत्ते: आनंदैकस्वभावभाक् भवति-] ज्याप्रमाणें अगदीं लहान मूल दूध पाजून मऊ शय्येवर निजविलें असतां, हंसत, आपपरभाव नसल्यामुळें रागद्वेषादिरहित होऊन केवल आनंदमूर्तिच राहतो.

महाराज: सार्वभौम: संतृप्त: सर्वभोगत: ।
मानुषानंदसीमानं प्राप्यानंदैकमूर्तिभाक् ।।५१

अन्वयार्थ - [सर्वभोगत: संतृप्त: सार्वभौम: महाराज:-] किंवा ज्याप्रमाणें सर्व भोगांमुळें पूर्ण तृप्त झालेला सार्वभौम महाराजा [मानुषानन्दसीमानं

प्राप्य-] मृत्युलोकांतील आनंदाच्या सीमेला पोंचून इच्छिण्यास योग्य असें कांहीं न राहिल्यामुळें राग-द्वेषरहित होऊन [आनंदैकमूर्तिभाक् भवति-] केवळ आनंदमूर्तिरूपच होऊन राहतो.

महाविप्रो ब्रह्मवेदी कृतकृत्यत्वलक्षणाम् ।
विद्यानंदस्य परमां काष्ठां प्राप्यावतिष्ठते ।।५२

अन्वयार्थ - [अथवा यथा महाविप्र: ब्रह्मवेदी-] किंवा जसा महाब्राह्मण - प्रत्यगभिन्नब्रह्मसाक्षात्कार-वान् [कृतकृत्यत्वलक्षणां विद्यानन्दस्य परमां काष्ठां प्राप्य अवतिष्ठते-] मी कृतकृत्य आहें, अशा स्वरूपाच्या विद्यानंदाच्या पराकाष्ठेस-जीवन्मुक्तावस्थेस प्राप्त होऊन परमानंदरूपच राहतो [तथा सुप्त: अपि आनंदरूप: तिष्ठति-] तसा निजलेला मनुष्यहि आनंदरूप राहतो.

प्रकाश:- गेल्या तीन श्लोकांत तीन दृष्टान्त दिले आहेत. सर्व दृष्टान्तांमध्यें रागादि वृत्तींचा अभाव असल्यामुळें कुमारादि आनंदरूप असतात असें स्पष्टपणें म्हटलें आहे. अर्थात् रागादि वृत्ति हेंच दु:ख व त्यांचा अभाव हेंच परम सुख होय. आतां आनंदाविषयीं श्रुतीनें या कुमारादि तिघांचाच दृष्टान्त कां दिला, दुसऱ्याहि कांहीं आनंदी प्राण्यांचा दृष्टान्त देण्यास कोणता प्रत्यवाय होता ? अशी एक शंका येथें उद्‌भवण्यासारखी आहे. पण तिचें समाधान पुढच्याच श्लोकांत केलेलें आहे. ।।५२।।

-पण हे कुमारादिक तीनच येथें दृष्टान्तासाठीं कां घेतलें ? आणखी कोणाचा दृष्टान्त कां दिला नाहीं ? उत्तर --

मुग्धबुद्धातिबुद्धानां लोके सिद्धा सुखात्मता ।
उदाहृतानामन्ये तु दु:खितो न सुखात्मका: ।।५३

अन्वयार्थ - [उदाहृतानां मुग्धबुद्धातिबुद्धानां लोके सुखात्मता सिद्धा-] वर ज्यांचा दृष्टान्त दिला आहे त्या मुग्ध, बुद्ध व अतिबुद्ध यांचीच सुखरूपता लोकामध्यें प्रसिद्ध आहे. [अन्ये तु दु:खिन: न सुखात्मका:-] यांच्याहून दुसरे सर्व तर दु:खीच होत. सुखी नव्हेत.

प्रकाश:- मुग्ध म्हणजे अज्ञ; सर्व अज्ञांमध्यें लहान बालक सुखी होय. जे विवेकी आहेत त्यांच्यामध्यें सार्वभौम राजा सुखी असतो. व जे अति विवेकी असतात त्यांच्यामध्यें ज्याला आनंदरूप आत्म्याचा साक्षात्कार झालेला असतो तो सुखी होय. बाकी सर्व दु:खीच होत, यांत कांहीं संशय नाहीं. कारण ते रागादि वृत्तियुक्त असतात हें सर्वप्रसिद्ध आहे. ।।५३।।

दार्ष्टान्तिक श्रुतिवाक्याचें तात्पर्य -

कुमारादिवदेवायं ब्रह्मानंदैकतत्पर: ।
स्त्रीपरिष्वक्तवद्वेद न बाह्यं नापि चांतरम् ।।५४

अन्वयार्थ - [कुमारादिवत् एव ब्रह्मानंदैकतत्पर: अयं-] कुमारादिकांप्रमाणेंच केवल ब्रह्मानन्दामध्येंच तत्पर असलेला हा [स्त्रीपरिष्वक्तवत् न बाह्यं न आंतरं अपि असौ वेद-] प्रिय स्त्रीनें आलिंगन दिलेल्या विषयी पुरुषाप्रमाणें बाहेरील किंवा आंतील कांहीं एक जाणत नाहीं.

प्रकाश:- पूर्वोक्त दृष्टान्तांतील कुमार, महाराजा व महाब्राह्मण हे जसे आनंदाचा अनुभव घेत असतात त्याप्रमाणें सुषुप्तीमध्यें हा जीवहि केवळ आनंदांत निमग्न होतो. याविषयीं दृष्टान्त-ज्याप्रमाणें व्यवहारांत प्रिय स्त्रीनें आलिंगन दिलें असतां कामी पुरुष बाह्य व आंतर विषयज्ञानशून्य असल्यामुळें केवळ सुखमय होऊन जातो, त्याप्रमाणें प्राज्ञसंज्ञक परमात्म्याशीं ऐक्य पावलेला जीव आनंदरूप होतो. प्रस्तुत अर्थाची काण्वश्रुतिहि आहे. ।।५४।।

-आतां, दृष्टान्त व दार्ष्टान्तिक यांतील बाह्य व आंतर या शब्दांचा अर्थ सांगतात -

बाह्यं रथ्यादिकं वृत्तं गृहकृत्यं यथांतरम् ।।
तथा जागरणं बाह्यं नाडीस्थ: स्वप्न आंतर: ।।५५

अन्वयार्थ - [यथा रथ्यादिकं वृत्तं बाह्यं च गृहकृत्यं आंतरं-] ज्याप्रमाणें दृष्टांतांत राजमार्गादिसंबंधी वृत्तांत बाह्य व गृहकृत्य आंतर [तथा जागरणं बाह्यं नाडीस्थ: स्वप्न: आंतर:-] त्याप्रमाणें दार्ष्टांतिकांत जागरण बाह्य व नाडीस्थ स्वप्न आंतर होय.

प्रकाश:- गेल्या श्लोकांतील दृष्टान्तांत 'पुरुष आंतील व बाहेरील कांहीं जाणत नाहीं' असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ-स्त्रीशीं विलास करण्यांत निमग्न झालेल्या पुरुषास त्या क्षणीं घरांतील कोणतेंहि कृत्य व बाहेरील कोणताहि व्यवहार आठवत नाहीं. असा समजावा. मन एकाच विषयांत गढून गेलें असतां इतर भान नष्ट होणें व तेवढ्यापुरतें सुख वाटणें हा स्वभावच आहे. त्याचप्रमाणें निद्रासमयीं जीव जाग्रतींत व अति सूक्ष्म नाडीमध्यें भासणाऱ्या स्वप्नातील सर्व वृत्तांत विसरून जाऊन आनंदांत निमग्न होतो. ।।५५।।

-जीव सुषुप्तींत ब्रह्मानंदैकरूपानेंच अवस्थित होतो, याविषयीं युक्ति प्रदर्शित करणाऱ्या 'अत्र पिता अपिता भवति' या श्रुतीचें तात्पर्य -

पितापि सुप्तावपितेत्यादौ जीवत्ववारणात् ।।
सुप्तौ ब्रह्मैव नो जीव: संसारित्वासमीक्षणात् ।।५६

अन्वयार्थ - [सुप्तौ पिता अपि अपिता भवति इत्यादौ जीवत्ववारणात्-] सुषुप्तींत पिता अपिता होतो, माता अमाता होते, लोक अलोक होतात, इत्यादि श्रुतींत - बृ. भा. अ. ४ ब्रा. ३ पितृत्वादि आरोपित जीवधर्माचें निवारण केलेलें असल्यामुळें [सुप्तौ संसारित्वासमीक्षणात् ब्रह्म एव नो जीव:-] सुषुप्तींत संसारित्वाची-जीवत्वाची प्रतीति येत नाहीं. त्यामुळें जीव ब्रह्मच होतो. त्याची ब्रह्मताच अवशिष्ट राहते. त्यावेळीं तो जीव नव्हे.

प्रकाश:- 'निद्राकालीं जो पिता असतो तो अपिता होतो; माता अमाता होते, लोक अलोक होतात, देव अदेव होतात' इत्यादि प्रकारें श्रुतीमध्यें वर्णन आहे. त्यावरून निद्रेमध्यें जीव ब्रह्मरूप होतो हें निर्विवाद होतें. पण त्याविषयीं अनुमान कसें करितां येतें तें दाखविलें पाहिजे. निद्रेमध्यें जीव ब्रह्मच होतो. कारण तो संसारी आहे असा त्यावेळीं प्रत्यय येत नाहीं व जो जो असंसारी तो तो मुक्त किंवा ब्रह्मरूप असतो; अशी व्याप्ति मिळते. सुषुप्तींत जीव ब्रह्मरूप होतो; हें आमचें म्हणणें अनेक प्रमाणांनीं सिद्ध होतें. ।।५६।।

-पितृत्वादि अभिमानाचा अभाव जरी असला तरी सुखित्वादि संसार कां नाहीं ? अशी शंका घेऊन 'देहाभिमानामुळें संसार आहे. अर्थात् त्या अभिमान्याच्या अभावीं संसाराचाहि अभाव होतो,' असें मानणारें ग्रंथकार त्याचेंच प्रतिपादन करणारे 'तीर्णो हि तदा सर्वान् शोकान् हृदयस्य भवति' हें पुढील वाक्य तात्पर्यत: पढतात -

पितृत्वाद्यभिमानो य: सुखदु:खाकर: स हि ।
तस्मिन्नपगते तीर्ण: सर्वान्शोकान् भवत्ययम् ।।५७

अन्वयार्थ - [य: पितृत्वाद्यभिमान: स: सुखदु:खाकर: हि-] जो पितृत्वादि-अभिमान तीच सुखदु:खांची खाण होय. [अत: तस्मिन् अपगते सति-] यास्तव तो अभिमान निघून गेला असतां [अयं सर्वान् शोकान् तीर्ण: भवति-] हा सर्व शोकांतून पार निघून जातो.

प्रकाश:- कोणत्याहि प्राण्यांस जें दु:ख होत असतें तें देहादिकांच्या ठायीं अभिमान ठेविल्यामुळें होत असतें. अर्थात् तो अभिमान नष्ट झाला असतां प्राणी सर्व प्रकारच्या दु:खांतून मुक्त होतो. ।।५७।।

-'अहोपण, या पूर्वोक्त श्रुतींनीं सुषुप्तींत सुखप्राप्ती होते, असें प्रत्यक्ष शब्दांनीं सांगितलेलें

दिसत नाहीं' अशी आशंका घेऊन तसें प्रत्यक्ष सांगणारें कैवल्यश्रुतिवाक्य अर्थत: पढतात-

सुषुप्तिकाले सकले विलीने तमसाऽऽवृत: ।
सुखरूपमुपैतीति ब्रूते ह्याथर्वणी श्रुति: ॥५८

अन्वयार्थ - [सुषुप्तिकाले सकले विलीने सति-] सुषुप्तिसमयीं जाग्रदादिलक्षण सर्व प्रपंचाचा आपल्या उपादानभूत तम:प्रधान प्रकृतिमध्यें लय झाला असतां [तमसा आवृत: स: सुखरूपं उपैति-] त्याच तम:प्रधान प्रकृतीकडून आच्छादित झालेला जीव सुखरूप ब्रह्माला प्राप्त होतो. [इति हि आथर्वणी श्रुति: आहे-] असेंच अथर्ववेदाची श्रुति सांगते.

प्रकाश:- कैवल्योपनिषदांत प्रस्तुत अर्थाचें वाक्य आहे. व-जाग्रदादि विक्षेपरूप प्रपंचाचा तम:प्रधान प्रकृतीमध्यें लय झाला असतां त्या प्रकृतीनेंच आच्छादित झालेला जीव सुखरूप ब्रह्मास जाऊन मिळतो, - असा त्याचा भावार्थ आहे. ॥५८॥

हा केवल श्रुतिप्रसिद्धच अर्थ नाहीं तर सर्वानुभव प्रसिद्ध आहे, असें सांगतात -

सुखमस्वाप्समत्राहं न वै किंचितवेदिषम् ।
इति सुप्ते सुखाज्ञाने परामृशति चोत्थित: ॥५९

अन्वयार्थ - [उत्थित: अहं अत्र सुखं अस्वाप्सं-] झोपेंतून उठलेला मनुष्य 'मी एवढा वेळ सुखानें निजलों होतों.'[किंचित् न वै अवेदिषं-] 'मला कांहीं समजलें नाहीं' [इति सुप्ते सुखाज्ञाने परामृशति-] अशाप्रकारें निद्रेंतील सुख व अज्ञान यांचा परामर्श करितो. त्यांना स्मरतो.

प्रकाश:- प्रत्येक मनुष्य निजून उठल्यावर मी सुखानें निजलों होतों व मला कांहीं समजले नाहीं असें नि:संशय होऊन सांगतो. अर्थात् त्याला पूर्वी अनुभवविलेल्या सुखाचें व अज्ञानाचें स्मरण होतें-हें निर्विवाद आहे. याविषयीं बरेंचसें विवेचन पूर्वी प्रथम प्रकरणांलतहि होऊन गेलें आहे. ॥५९॥

-'पण तें स्मरण अप्रमाण आहे. तेव्हां त्यावरून सुखसिद्धि कशी होणार ?' अशी आशंका घेऊन 'स्मरणाला जरी अप्रामाण्य असलें तरी तन्मूलभूत अनुभवबलानें त्याची सिद्धि होते,' असें सांगतात -

परमर्शोऽनुभूतेऽस्तीत्यासीदनुभवस्तदा ।
चिदात्मत्वात्स्वतो भाति सुखमज्ञानधीस्तत: ॥६०

अन्वयार्थ - [परामर्श: अनुभूते अस्ति इति हेतो:-] परामर्श म्ह० स्मरण अनुभूत पदार्थाचेंच होतें, अननुभूत पदार्थाचें होत नाहीं, असा अबाधित नियम असल्यामुळें [तदा अनुभव: आसीत्-] सुषुप्तींत अनुभव होता, असें अवगत होतें. अहोपण सुषुप्तींत मनासह सर्व ज्ञानेंद्रियांचा लय होत असल्यामुळें अनुभवाची सिद्धि कशी होणार ?' अशी आशंका घेऊन सिद्धान्ती म्हणतात - 'सुखानुभवाचें साधन नाहीं म्हणतां कीं अज्ञानानुभवाचें ?' पहिल्या पक्षाचें निराकरण- [चिदात्मत्वात् सुखं स्वत: भाति-] सुख स्वप्रकाश चिद्रूप असल्यामुळें त्याला साधनाची अपेक्षा नाहीं. तें स्वत:च भासतें. दुसऱ्या पक्षाचें निराकरण-[तत: च अज्ञानधी:-] स्वप्रकाश सुखाच्या बलानेंच त्याला आच्छादित करणाऱ्या अज्ञानाची प्रतीति येते.

प्रकाश:- अनुभव हें स्मरणाचें कारण आहे. अर्थात् सुषुप्तीमध्यें ज्याचा अनुभव आला होता त्याचेंच उठल्यावर स्मरण होतें असें म्हणणें युक्त होय. पण सुषुप्तीमध्यें मन व इंद्रियें यांचा लय झाल्यानंतर सुखाचा व अज्ञानाचा अनुभव कोण घेणार ? असें जर विचारशील तर सांगतों:- सुख चिद्रूप असल्यामुळें तें आपोआप भासतें व नंतर त्या स्वयंप्रकाश सुखामुळें अज्ञानाची प्रतीति येते. अर्थात् त्यांच्या अनुभवास साधनांची गरज नाहीं ॥६०॥

-'पण, सुषुप्तींतील सुख स्वयंप्रकाश जरी असले तरी ते ब्रह्मानन्दरूप आहे याविषयीं काय प्रमाण ?'

उत्तर -

ब्रह्म विज्ञानमानंदमिति वाजसनेयिन: ।
पठंत्यत: स्वप्रकाशं सुखं ब्रह्मैव नेतरत् ।।६१

अन्वयार्थ - [ब्रह्म विज्ञानं आनंदं इति वाजसनेयिन: पठन्ति-] ब्रह्म विज्ञान व आनंदरूप आहे असें वाजसनेयी शाखाध्यायी सांगतात. [अत: स्वप्रकाशं सुखं ब्रह्म एव इतरत् न-] यास्तव स्वप्रकाश सुख ब्रह्मच आहे, दुसरें कांहीं नाहीं.

प्रकाश:- बृहदारण्यकामध्यें विज्ञान व आनंदरूप ब्रह्म आहे असा स्पष्ट उल्लेख आहे. तस्मात् आनंदरूप ब्रह्मच. अन्य कांहीं नाहीं. ॥६१॥

-'अनुभव व स्मरण, यांचें अधिकरण एकच असते, म्ह० ज्याला अनुभव आलेला असतो त्यालाच स्मरण होतें, असा नियम असल्यामुळें 'मी सुखानें निजलों होतों, मला कांहीं कळलें नाहीं' अशा प्रकारें विज्ञानमय जीवाला सुख व अज्ञान यांचा अनुभव येतो. यास्तव तोच त्यांचा अनुभव घेणारा आहे, असें म्हणणें उचित होय' अशी आशंका घेऊन 'विज्ञानमयाची उपाधि असें जें विज्ञान-बुद्धि तें अज्ञानाचें कार्य असल्यामुळें त्याचा अज्ञानांत लय झालेला असतो, यास्तव विज्ञानमयाला सुखानुभवितृत्व नाहीं' असें सांगतात -

यदज्ञानं तत्र लीनौ तो विज्ञानमनोमयौ ।
तयोर्हि विलयावस्था निद्राऽज्ञानं च सैव हि ।।६२

अन्वयार्थ - [यत् अज्ञानं तत्र तौ विज्ञानमनोमयौ लीनौ-] पूर्वोक्त स्मरणावरून ठरणारें जें अज्ञान त्यांत ते विज्ञानमय व मनोमय कोश लीन होऊन जातात. [हि तयो: विलयावस्था निद्रा-] कारण त्यांची विलीन अवस्थाच निद्रा होय. [अज्ञानं च सा एव हि-] व अज्ञानहि तिलाच म्हणतात.

प्रकाश:- जाग्रतींत 'मला कांहीं समजलें नाहीं' असें जें अज्ञानाचें स्मरण होत असतें तें अज्ञान येथें असतें म्हणूनच होतें हें उघड आहे. व त्यामध्येंच प्रमाता व प्रमाण असें ज्यांस क्रमानें म्हणतात ते विज्ञानमय व मनोमय कोश लीन होतात. त्यामुळें निद्रासमयीं जीव सुखानुभव घेणारा आहे असें म्हणतां येत नाहीं. जीवसंज्ञक विज्ञानमय व साधनसंज्ञक मनोमय कोशाची जी लीनावस्था तीच निद्रा होय. व निद्रेसच अज्ञान हेंहि नांव आहे. कोशामध्येंहि 'विज्ञानविरति: सुप्ति:' विशेषज्ञानाचा लय हीच सुषुप्ति होय; असें म्हटलें आहे. ॥६२॥

-'मग तर सुषुप्तींतील सुखादिकांच्या अनुभवकालीं विद्यमान नसलेल्या विज्ञानमयाला जागें झाल्यावर त्यांचें स्मरण कसें होणार ?' अशी शंका घेऊन 'विलयावस्थेंतहि त्याच्या स्वरूपाचा नाश होत नाहीं. तर विलयावस्था याच उपाधीनें युक्त अशा आनंदमयरूपानें त्याला अनुभवितृत्व आहे व विज्ञानमयसंज्ञक घनीभावरूप उपाधीनें युक्त झालेल्या त्याला स्मर्तृत्व आहे. याप्रमाणें एकाचेंच ते दोन धर्म संभवतात,' असें समाधान सांगतात -

विलीनघृतवत्पश्चात्स्याद्विज्ञानमयो घन: ।
विलीनावस्थ आनंदमयशब्देन कथ्यते ।।६३

अन्वयार्थ - [विलीनघृतवत् पश्चात् विज्ञानमय: घन: स्यात्-] उष्णतेनें वितळलेलें तूप निवलें म्हणजे जसें गोठतें-घट्ट होतें. त्याप्रमाणें जाग्रदादि अवस्थांमध्यें भोगप्रद कर्माचा क्षय झाल्यानें निद्रारूपानें लीन झालेलें अन्त:करण पुन: भोगप्रद कर्मामुळें जागृतींत विज्ञानरूपानें घनीभूत होतें. त्यामुळें तदुपाधिक आत्माहि विज्ञानमयघन होतो. [विलीनावस्थ: आनंदमयशब्देन कथ्यते-] तोच पूर्वीं विलयावस्थोपाधिक असलेला 'आनंदमय-' शब्दानें बोलला जातो.

प्रकाश:- विलयावस्थेंत जीवाचा स्वरूपत: नाश होत नसतो. तर अग्नीजवळ ठेवलेलें तूप जसें अग्निसंयोगामुळें पातळ होतें व नंतर कांहीं वेळानें घट्ट

होतें त्याप्रमाणें अज्ञानांत लीन झालेलें अंत:करण कर्मामुळें जाग्रतींत विज्ञानमयरूपानें घन होतें; व त्यामुळें ज्याची अंत:करणच उपाधि आहे अशा त्या आत्म्यास विज्ञानमय, जीव, प्रमाता असें म्हणतात. व अंत:करणाच्या लय समयीं त्यासच आनंदमय म्हणतात. तात्पर्य, जीवादि संज्ञा अंत:करणावर अवलंबून आहेत. व त्यामुळें अनुभव घेणाऱ्याचा निद्राकालीं सर्वथैव अभाव होता असें म्हणता येत नाहीं. ॥६३॥

-'विलीनावस्थाच आनंदमय' या उक्तार्थाचें स्पष्टीकरण -

सुप्तिपूर्वक्षणे बुद्धिवृत्तिर्या सुखबिंबिता ।
सैव तद्बिंबसहिता लीनानंदमयस्तत: ॥६४॥

अन्वयार्थ - **[सुप्तिपूर्वक्षणे या बुद्धिवृत्ति: सुखबिंबिता-] सुषुप्तीच्या अव्यवहित पूर्वक्षणीं जी अन्तर्मुख बुद्धिवृत्ति स्वरूपभूत सुखाच्या प्रतिबिंबानें युक्त होते [तत: तद्बिंबसहिता सा एव लीना आनंदमय:-] त्यानंतर त्या प्रतिबिंबानें युक्त असलेली तीच वृत्ति निद्रारूपानें विलीन झाली असतां आनंदमय म्हटली जाते.**

प्रकाश:- निद्रा लागण्याच्या पूर्वी एक क्षण बुद्धिवृत्ति अंतर्मुख होते. व त्यामुळें तिच्यामध्यें आत्म्याच्या आनंदाचें प्रतिबिंब पडतें. नंतर ती वृत्ति त्या प्रतिबिंबासह लीन झाली असतां तिलाच आनंदमय असें म्हणतात. ॥६४॥

-ह्याप्रमाणें आनंदमयाचें स्वरूप दाखवून तोच जाग्रत्कालीं विज्ञानमयरूपानें स्मरण करणारा आहे ही गोष्ट सिद्ध करण्याकरिता त्या वेळच्या त्याच्या सुखानुभवाचें उपपादन करितात -

अंतर्मुखो य आनंदमयो ब्रह्मसुखं तदा ।
भुंक्ते चिद्बिम्बयुक्ताभिरज्ञानोत्पन्नवृत्तिभि: ॥६५

अन्वयार्थ - [य: अंतर्मुख: आनंदमय: स:-] सुखप्रतिबिंबयुक्त असलेली जी अन्तर्मुख बुद्धिवृत्ति तिच्यापासून झालेल्या संस्कारांनीं युक्त असलेलें जें अज्ञान तें ज्याची उपाधि आहे असा आनन्दमय [तदा ब्रह्मसुखं चिद्बिम्बयुक्ताभि: अज्ञानोत्पन्न-वृत्तिभि: भुंक्ते-] सुषुप्तींत स्वरूपभूत सुखाला अज्ञानापासून उत्पन्न झालेल्या सुखादिविषयक चिदाभासयुक्त वृत्तींनीं-चित्ताच्या विशेष परिणामानीं भोगतो.

प्रकाश:- बुद्धि अंतर्मुख झाल्यामुळें तिचा अभिमानीहि अंतर्मुख झाल्यासारखा वाटतो. व त्यालाच आनंदमय म्हणतात. असला हा सोपाधिक आनंदमय अज्ञानापासून उत्पन्न झालेल्या चैतन्याभासयुक्त वृत्तींच्या द्वारा ब्रह्मानंदाचा अनुभव घेतो. सारांश, त्या वेळींहि सूक्ष्म वृत्ति असतात. व त्यांच्या द्वारा निद्राकालीन सुखाचा आणि अज्ञानाचा अनुभव घडतो. ॥६५॥

-'तर मग जाग्रतीप्रमाणें त्या वेळीं 'मी सुख भोगीत आहें' असा अभिमान होत कां नाहीं ? अशा आशयानें सांगतात -

अज्ञानवृत्तय: सूक्ष्मा विस्पष्टा बुद्धिवृत्तय: ।
इति वेदान्तसिद्धांतपारगा: प्रवदन्ति हि ॥६६

अन्वयार्थ - **[अज्ञानवृत्तय: सूक्ष्मा: च बुद्धिवृत्तय: विस्पष्टा:-] अज्ञानाच्या वृत्ति, सूक्ष्म म्हणजे अस्पष्ट व बुद्धीच्या वृत्ति अति स्पष्ट असतात; [इति वेदान्तसिद्धान्तपारगा: प्रवदन्ति हि-] असें वेदांतसिद्धांतातील निष्णात पुरुष सांगतात.**

प्रकाश:- जाग्रतींत बुद्धीचें साम्राज्य असतें व तिच्या वृत्ति अति स्पष्ट असतात. त्यामुळें जाग्रतींतील भोगांचें स्पष्ट भान होतें. पण सुषुप्तींत अज्ञानाचें साम्राज्य असल्यामुळें आणि त्याच्या वृत्तिहि अस्पष्ट असल्यामुळें त्या वेळेच्या भोगाचें स्पष्ट भान होत नाहीं. ही गोष्ट विवरणकारादि सर्व वेदान्ताचार्यांनीं सांगितली आहे. ॥६६॥

-'पण आनन्दमय सूक्ष्म अविद्यावृत्तींनीं ब्रह्मानन्दाचा भोग घेतो, याविषयीं प्रमाण काय ?' उत्तर-

मांडूक्यतापनीयादिश्रुतिष्वेतदतिस्फुटम् ।
आनंदमयभोक्तृत्वं ब्रह्मानंदे च भोग्यता ॥६७

अन्वयार्थ - [आनंदमयभोक्तृत्वं च ब्रह्मानन्दे भोग्यता इति एतत्-] आनंदमयाचें भोक्तृत्व व ब्रह्मानंदाची भोग्यता हा सिद्धान्त [मांडूक्य-तापनीयादिश्रुतिषु अतिस्फुटं अस्ति-] मांडूक्य, नृसिंहतापनीय इत्यादि श्रुतींमध्यें अति स्पष्टपणें सांगितला आहे.

प्रकाश:- भोक्ता आनंदमय व त्याचें भोग्य ब्रह्मानंद ही गोष्ट अनेक उपनिषदांत आहे. कैवल्यामध्यें 'त्रिषु धामसु०' इत्यादि श्रुतींमध्येंहि हाच प्रकार सांगतलेला आहे. ॥६७॥

-आता मांडूक्यांतील 'सुषुप्तस्थान एकीभूत:'० मा. ५ इत्यादि वाक्य अर्थत: येथें घेतात -

एकीभूत: सुषुप्तस्थ: प्रज्ञानघनतां गत: ।
आनंदमय आनंदभुक्चेतोमयवृत्तिभि: ॥६८

अन्वयार्थ - [एकीभूत: सुषुप्तस्थ: प्रज्ञानघनतां गत: आनंदमय: चेतोमयवृत्तिभि: आनंदभुक्-] एकरूप झालेला, मीच सुषुप्तिमान् आहें, असा अभिमान धरणारा, प्रज्ञानाच्या घनत्वास प्राप्त झालेला, आनन्दप्रचुर, चैतन्यप्रचुर-चित्प्रतिबिंब-युक्त वृत्तींनीं स्वरूपभूत आनंदाचा उपभोग घेणारा.

प्रकाश:- गाढ निद्रा लागली असतां हा आत्मा एकरूप होतो. पण तोच या अवस्थेचा अभिमानी आहे. तो सर्वसामान्य ज्ञानांचा जसा कांहीं एक गोळा होऊन राहतो. हा आनंदपूर्ण असतो व चैतन्याभासयुक्त अशा अज्ञानाच्या वृत्तींच्या द्वारा हा आनंदाचा भोग घेत असतो. ॥६८॥

-आता या वाक्यांत 'एकीभूत' म्हणून जें म्हटलें आहे त्याचा अर्थ सांगतात --

विज्ञानमयमुख्यैर्यो रूपैर्युक्त: पुराधुना ।
स लयेनैकतां प्राप्तो बहुतन्दुलपिष्टवत् ॥६९

अन्वयार्थ -[य: पुरा विज्ञानमयमुख्यै: रूपै: युक्त:-] जो जाग्रदवस्थेंत विज्ञानमय, प्राणमय, मनोमय, चक्षुर्मय, श्रोत्रमय, पृथ्वीमय, आपोमय, वायुमय-बृ. भा. अ. ४.४. इत्यादि आकारांनीं युक्त होता [स: अधुना लयेन बहुतंदुलपिष्टवत् एकतां प्राप्त: भवति-] तोच आतां सुषुप्तींत विज्ञान, मन इत्यादि उपाधींचा लय झाल्यानें पुष्कळ तांदुळांच्या पिठाप्रमाणें एकरूप होतो.

प्रकाश:- जाग्रदवस्थेंत जो हा विज्ञानमय, प्राणमय, मनोमय, चक्षुर्मय, श्रोत्रमय, पृथ्वीमय, आपोमय, वायुमय इत्यादिरूप असतो, तोच, सुषुप्तिसमयीं विज्ञानादि उपाधींचा अज्ञानांत लय झाल्यामुळें एकरूप होतो. या विषयीं तांदुळाच्या पिठाचा दृष्टांत दिला आहे. म्हणजे ज्याप्रमाणें अनेक तांदुळ दळले असतां त्यांचें पीठरूपानें एकच रूप होतें त्याप्रमाणें या विज्ञानमयादिकांचा प्रकार होतो. ॥६९॥

-आतां 'प्रज्ञानघन-' शब्दाचा अर्थ सांगतात -

प्रज्ञानानि पुरा बुद्धिवृत्तयोऽथ घनोऽभवत् ।
घनत्वं हिमबिंदूनामुदग्देशे यथा तथा ॥७०

अन्वयार्थ - [यथा उदग्देशे हिमबिंदूनां घनत्वं-] ज्याप्रमाणें उत्तर देशांत दहिंवराच्या बिंदूंचा एक गोळा होतो-बर्फ बनतें, [तथा पुरा प्रज्ञानानि बुद्धिवृत्तय:-] त्याप्रमाणें जाग्रदादि कालीं ज्या 'प्रज्ञान-' संज्ञक घटादिविषयक बुद्धिवृत्ति होत्या त्याच [अथ घन: अभवत्-] सुषुप्तिकालीं घटादि विषयांच्या अभावीं चिद्रूपानें एकरूप-प्रज्ञानघन झाल्या.

प्रकाश:- हिमालयाच्या आसपास पडलेल्या दवाचा जो एकच गोळा होतो, त्यास बर्फ म्हणतात. अर्थात् अंतरिक्षांतून पडणाऱ्या भिन्न भिन्न थेंबांचें तें एक घनरूप होय. ह्या दृष्टांताप्रमाणेंच जाग्रदादि समयीं घटादि पदार्थाविषयीं ज्या बुद्धीच्या वृत्ति असतात त्यांस विज्ञानें असें म्हणतात. विषय व वृत्ति अनेक

असल्यामुळें विज्ञानेंहि अनेक होतात. पण त्या सर्वांचा सुषुप्तीमध्यें एक गोळा होतो म्हणजे तीं सर्व विज्ञानें एक चैतन्यरूप होतात. ॥७०॥

-आतां 'प्रज्ञानघन-' शब्दाच्या निरूपणप्रसंगानें आलेलें कांहीं सांगतात --

तद्घनत्वं साक्षिभावं दुःखाभावं प्रचक्षते ।
लौकिकास्तार्किका यावद्दुःखवृत्तिविलोपनात् ॥७१

अन्वयार्थ - [यत् साक्षिभावं घनत्वं तत् लौकिकाः च तार्किकाः दुःखाभावं प्रचक्षते-] हें जें साक्षित्वरूप प्रज्ञानघनत्व त्यालाच शास्त्रसंस्कार-शून्य सामान्य लोक व वैशेषिकादि तार्किक-शास्त्री दुःखाचा अभाव असें म्हणतात. [यावद्दुःख-वृत्तिविलोपनात्-] कारण जितक्या दुःखवृत्ति आहेत त्या सर्वांचा त्या अवस्थेंत विलय होत असतो.

प्रकाशः- ज्यांना विचार करण्याची मुळींच संवय नाहीं असे सामान्य लोक व श्रुत्यर्थास सोडून मनसोक्त कल्पना करणारे, वैशेषिक नैय्यायिक इत्यादि तार्किक या प्रज्ञानघनरूप अवस्थेसच दुःखाभाव असें म्हणतात. कारण त्या अवस्थेंत जेवढ्या म्हणून दुःखरूप वृत्ति आहेत त्या सर्वांचा लय झालेला असतो. ॥७१॥

-आता पूर्वोक्त श्रुतींतील 'चेतोमुख-' शब्दाचा अर्थ सांगतात --

अज्ञानबिंबिता चित्स्यान्मुखमानन्दभोजने ।
भुक्तं ब्रह्मसुखं त्यक्त्वा बहिर्यात्यथ कर्मणा ॥७२

अन्वयार्थ - [आनंदभोजने मुखं अज्ञानबिंबिता चित् स्यात्-] आनंदाचा भोग घेण्याचें साधन अज्ञानवृत्तींत प्रतिबिंबित झालेलें चैतन्य होतें. 'अहो पण, सुषुप्तींत आनंदरूप जीवाकडून जर ब्रह्मसुख भोगले जातें तर तें सोडून जीव दुःखाचें घरच अशा जागृतींत कां येतो ?' उत्तर - [अथ कर्मणा भुक्तं ब्रह्मसुखं त्यक्त्वा बहिः याति-] पण पुढें कर्मवशात् भोगलेलें ब्रह्मसुख सोडून जीव बाहेर येतो.

प्रकाशः- ज्याप्रमाणें एखादा कामगार काम करून थकला असतां विश्रांतीकरितां निजावयाच्या खोलींत जाऊन सुखोपभोग घेत मऊ बिछान्यावर पडतो; व थकवा गेल्यावर कामाची वेळ झाली असतां पुनः खोलींतून बाहेर पडून काम करावयास लागतो, त्याप्रमाणें ह्या जीवाची उपाधि विश्रांतीकरितां आपल्या अज्ञानसंज्ञक विश्रांतीच्या जागीं जाते. पुढें ती अज्ञानांत निमग्न झाली असतां अज्ञानांच्या वृत्तींत प्रतिबिंबित झालेल्या चैतन्याच्या द्वारा साक्षी आनंदानुभव घेतो. त्या ब्रह्मानंदास सोडूं नये असें त्यास पुष्कळ वाटत असतें पण कर्माच्या अधीन असल्यामुळें त्यास बाहेर पडावें लागतें. अर्थात् ब्रह्मानंदास सोडून व जाग्रतींत येऊन तो जीव पुनरपि धर्माधर्मांचें फल भोगूं लागतो. ॥७२॥

-'पण हें कशावरून अवगत होतें', अशी आशंका घेऊन 'पुनश्च जन्मान्तारकर्मयोगात्स एव जीवः स्वपिति प्रबुद्धः' या कैवल्यश्रुतिवाक्यावरून अवगत होतें, अशा आशयानें ते वाक्य अर्थतः पढतात -

कर्म जन्मांतरेऽभूद्यत्तद्योगाद्बुध्यते पुनः ।
इति कैवल्यशाखायां कर्मजो बोध ईरितः ॥७३

अन्वयार्थ - [यत् कर्म जन्मान्तरे अभूत् तद्योगात् पुनः बुध्यते-] जें कर्म पूर्वजन्मीं झालेलें असतें त्याच्या योगानें जीव पुनः जागृतींत येतो. [इति कैवल्यशाखायां कर्मजः बोधः ईरितः अस्ति-] अशा प्रकारें कैवल्यशाखेमध्यें कर्मापासून बोधावस्था सांगितलेली आहे.

प्रकाशः- जन्मान्तरीं घडलेल्या कर्मानें जीवास ह्या जन्मांतील अवस्था भोगाव्या लागतात. अर्थात् जाग्रदादि सर्व अवस्थांस पूर्वकर्म कारण आहे. त्यामुळें जाग्रतीस कारण होणारें कर्म क्षीण झालें असतां स्वप्न

किंवा सुषुप्ति प्राप्त होते व त्यास कारण होणाऱ्या कर्माचा क्षय झाला असतां जाग्रती प्राप्त होते. ॥७३॥

-सुषुप्तींत ब्रह्मानन्दाचा अनुभव घेतला, याविषयीं सूचकचिह्न सांगतात -

कंचित्कालं प्रबुद्धस्य ब्रह्मानंदस्य वासना ।
अनुगच्छेद्यतस्तूष्णीमास्ते निर्विषय: सुखी ॥७४

अन्वयार्थ - [प्रबुद्धस्य अपि कंचित् कालं ब्रह्मानंदस्य वासना अनुगच्छेत्-] जागृतींत आलेल्याहि पुरुषामध्यें, कांहीं कालपर्यंत ब्रह्मानंदाची वासना अनुवृत्त होते. [यत: स: निर्विषय:च सुखी सन् तूष्णीं आस्ते-] त्यामुळेंच जागृतींत आल्यावर कांहीं वेळ तो विषयरहित व सुखी होऊन स्वस्थ रहातो.

प्रकाश:- झोंपेंतून उटलेल्या मनुष्यामध्यें झोंपेंतील आनंदाचा कांहीं वेळ संस्कार राहतो. व त्यामुळें तो उठल्याबरोबर स्वस्थ, निश्चेष्ट, शांत व गंभीर दिसतो. झोंपेंतून उठलेल्या एखाद्या मनुष्याकडे पाहिल्यास प्रस्तुत अनुभव येण्यासारखा आहे. ॥७४॥

-'तर मग तो पुढेंहि तसाच तूष्णीं कां रहात नाहीं ?' उत्तर -

कर्मभि: प्रेरित: प्रश्चान्नानादु:खानि भावयन् ।
शनैर्विस्मरति ब्रह्मानंदमेषोऽखिलो जन: ॥७५

अन्वयार्थ - [कर्मभि: प्रेरित: एष: अखिल: जन:-] पूर्वोक्त कर्मांकडून प्रेरित झालेला हा सर्व प्राणिवर्ग [पश्चात् नानादु:खानि भावयन् ब्रह्मानंदं शनै: विस्मरति-] नंतर अनेक दु:खांची भावना करीत ब्रह्मानंदास हळुहळू विसरतो.

प्रकाश:- निजून उठतांच प्राणी शांत व सुखी असतो हें खरें, पण त्यास बलात्कारानें जाग्रतींत आणणारी कर्में त्याच अवस्थेंत राहू देत नाहींत. तर विचित्र भावनांच्या योगानें त्यास हळू हळू त्या आनंदांतून काढून दु:खरूप व्यवहारांत लोटितात. ही गोष्ट अनुभवगम्य आहे. प्रतिदिनीं झोपेंतून उठतांच आपल्या मनाची स्थिति कशी असते व तिच्यात उत्तरोत्तर बदल कसा होतो हें थोडच्याशा विचाराअंतीं प्रत्येकास समजण्यासारखें आहे. ॥७५॥

-याहि कारणानें या ब्रह्मानंदाविषयीं विवाद करणें अयोग्य आहे.

प्रागूर्ध्वमपि निद्राया: पक्षपातो दिने दिने ।
ब्रह्मानंदे नृणां तेन प्राज्ञोऽस्मिन्विवदेत क: ॥७६

अन्वयार्थ - [नृणां दिने दिने निद्राया: प्राक् ऊर्ध्वं अपि ब्रह्मानन्दे पक्षपात: अस्ति-] मनुष्यांचा प्रतिदिनीं निद्रेच्या आरंभीं व अंतीं ब्रह्मानन्दामध्यें स्नेह दिसतो. कारण आरंभीं ते मृदु शय्यादिकांना संपादन करितात व अंतीं त्यांना शय्येला सोडावेसें वाटत नाहीं. तर मुकाट्यानें बसतात. [तेन क: प्राज्ञ: अस्मिन् विवदेत-] तेव्हां कोणता शहाणा या आनंदाविषयीं वाद करील ? कोणी नाहीं.

प्रकाश - निद्रेच्या पूर्वी मऊ बिछाना इत्यादि साधनांची तयारी करण्यांत व नंतर झोंप व बिछाना सोडून व उठवण्यांत प्रत्येक मनुष्याचा प्रतिदिनीं स्नेह आढळतो. निद्रेमध्यें जर खरोखरीच आनंद नसता तर प्राण्यास तिच्याविषयीं एवढें प्रेम कां वाटलें असतें ! रोग्यांना झोंप यावी म्हणून वैद्य कसे खटपट करीत असतात; अवेळीं झोंपमोड झाल्यास मनुष्य कसा रागावतो; झोंपेपुढें सर्व ऐहिक विषय कसे तुच्छ वाटतात; व एक दिवस झोंप न आली तर बिचाऱ्या मेंदूची काय अवस्था होते याचा ज्यांना अनुभव असेल ते झोंपेंतील आनंदाविषयीं कधींच वाद करणार नाहींत. ॥७६॥

- हें सर्व ऐकून वादी पुन: शंका घेतो -

ननु तूष्णींस्थितौ ब्रह्मानंदश्चेद्भाति लौकिका: ।
अलसाश्चरितार्था: स्यु: शास्त्रेण गुरुणात्र किम् ॥७७

अन्वयार्थ - [ननु ब्रह्मानंद: तूष्णीं स्थितौ भाति चेत्-] गुरुशुश्रूषादि उपायांनींच प्राप्त होणाऱ्या ब्रह्मानंदानुभवाचा केवल तूष्णीं अवस्थेंतच जर लाभ होऊं लागला तर [अलसा: लौकिका: चरितार्था: स्यु:-] आळसी सामान्य लोक कृतार्थ होतील. [अत्र गुरुणा शास्त्रेण च किं-] मग त्यांना गुरु व शास्त्र यांचें काय प्रयोजन ? (गुरु-शास्त्रपूर्वक श्रवणादि करणें व्यर्थ होईल.)

प्रकाश:- कोणतीहि क्रिया न करितां स्वस्थ बसणें हा तूष्णींस्थितीचा अर्थ आहे. व त्या अवस्थेमध्यें जर ब्रह्मानंद होतो असें मानलें तर सर्वांच्या पूर्वी आळशी लोक मुक्त होतील. अर्थात् मग या कठीण शास्त्रांची व गुरुची काय गरज ! अहो आपल्या परड्यातच जर भाजी मिळूं लागली तर बाजारांत जाऊन पैसे खर्चून ती कोण आणील ! ॥७७॥

- हाच ब्रह्मानंद आहे. असें जर त्यांनीं जाणलें तर ते कृतार्थ होतीलच ! पण तसें ज्ञानच गुरुश्रुश्रूषादिकांवांचून संभवत नाहीं, असें सांगतात -

बाढं ब्रह्मेति विद्युश्चेत्कृतार्थास्तावतैव ते ।
गुरुशास्त्रे विनाऽत्यंतं गंभीरं ब्रह्म वेत्ति क: ॥७८

अन्वयार्थ - [बाढं तत् ब्रह्म इति विद्यु: चेत्-] खरें आहे; तें सुखच ब्रह्म आहे असें जर त्यांस समजलें [तर्हि तावता एव ते कृतार्था: स्यु:-] तर तेवढ्यानेंच ते कृतार्थ होतील. [किंतु गुरुशास्त्रे विना अत्यंतं गंभीरं ब्रह्म क: वेत्ति-] पण गुरु व शास्त्र यांच्यावांचून अत्यंत गंभीर ब्रह्माला कोण जाणणार?

प्रकाश:- तूष्णीं अवस्थेमध्यें ज्याचा प्रत्यय येतो तें ब्रह्मच होय असा जर त्यांस बोध झाला तर ते आळशीहि तेवढ्या बोधानेंच मुक्त होतील यांत कांहीं शंका नाहीं. पण अनेक जन्म घेऊन अनेक साधनें केल्यानेंहि प्राप्त न होणारें, वाणी व मन यांस अगोचर, सर्वज्ञ, सर्वान्तर्यामी व सर्वात्मरूप अशा ब्रह्माचें गुरु व शास्त्र यांच्या वांचून दुसऱ्या कोणत्या उपायानें ज्ञान होणार आहे ? ब्रह्मज्ञानास दुसरा कोणताहि इलाज चालत नाहीं. ॥७८॥

-'असें जर आहे तर तुमच्या तोंडून ब्रह्मानंदाचें श्रवण करणाऱ्या मला कृतार्थता कां प्राप्त होत नाहीं ?' अशी शंका व तिचें उपहासपूर्वक उत्तर -

जानाम्यहं त्वदुक्त्याद्य कुतो मे न कृतार्थता ।
शृण्वत्र त्वादृशो वृत्तं प्राज्ञंमन्यस्य कस्यचित् ॥७९

अन्वयार्थ - [अहं त्वदुक्त्या अद्य जानामि मे कुत: न कृतार्थता-] मी तुमच्या या भाषणावरूनच आज ब्रह्मानंदाला जाणत आहें. मग मला कृतार्थता कां प्राप्त होत नाहीं ? असें जर म्हणशील तर [अत्र कस्यचित् त्वादृश: प्राज्ञंमन्यस्य वृत्तं शृणु-] याविषयीं कोणाएका तुझ्यासारख्याच प्राज्ञंमन्याचा वृत्तान्त सांगतों, ऐक.

प्रकाश:- ब्रह्मानंदाचें केवळ शाब्दि ज्ञानच कृतकृत्यतेस कारण आहे, असें समजणाऱ्या वाद्याची ही शंका कशी अप्रयोजक आहे हें सिद्धांती आतां गोष्टीच्या रूपानें सांगणार आहेत. ॥७९॥

-वृत्तात असा -

चतुर्वेदविदे देयमिति शृण्वन्नवोचत ।
वेदाश्चत्वार इत्येवं वेद्मि मे दीयतां धनम् ॥८०

अन्वयार्थ - [चतुर्वेदविदे देयं इति शृण्वन् -] 'हें सर्व धन चार वेद जाणणाराला द्यावयाचें आहे' हें वाक्य, ऐकून कोणी एक मनुष्य [वेदा: चत्वार: इत्येवं अहं वेद्मि-] 'वेद चार आहेत' एवढें मी याच वाक्यावरून जाणतों. [अत: मे धनं दीयताम् इति अवोचत-] यास्तव मला हें धन द्या, असें ज्याप्रमाणें बोलला तसेंच तूं हें विचारीत आहेस.

प्रकाश:- कोणा एका श्रीमान् गृहस्थास आपलें सर्वस्व दान करावयाचें होतें, व त्यानें एका अक्षरशत्रु मनुष्याजवळ 'हे चारी वेद जाणणाऱ्यास द्यावयाचें

आहे' असें म्हटलें. पण तें ऐकून तो म्हणतो, ''महाराज 'चार वेद आहेत' हें मीहि जाणतों तेव्हां हें सर्व धन मलाच द्या.'' त्या मूर्खाचें हें भाषण ऐकून तो श्रीमान् हंसला, व म्हणाला, ''बाबा रे, नुस्तें नांव ऐकल्यानेंच जर चतुर्वेदी होतां आलें असतें तर आज जगांत सर्वच चतुर्वेदी झाले असते. सारांश या गोष्टीप्रमाणेंच तुझी अवस्था आहे.'' ॥८०॥

-'तो तर नुस्ती वेदांची संख्याच जाणत होता. त्यांचें स्वरूप जाणत नव्हता !' अशी शंका व उत्तर-

संख्यामेवैष जानाति न तु वेदानशेषत: ।
यदि तर्हि त्वमप्येवं नाशेषं ब्रह्म वेत्सि हि ॥८१

अन्वयार्थ - [एष: संख्यां एव जानाति-] हा संख्या मात्र जाणतो. [वेदान् तु अशेषत: न-] वेदांस संपूर्णपणें जाणत नाहीं, [एवं यदि तर्हि त्वं अपि ब्रह्म अशेषं न वेत्सि हि-] असें जर म्हणशील तर तूंहि ब्रह्माला पूर्णपणें जाणत नाहींस !

प्रकाश:- पूर्वोक्त गोष्टींतील मनुष्य नुस्ती वेदांची संख्याच जाणतो; पण त्यास वेदांचें संपूर्ण ज्ञान नसतें. अर्थात् त्याची स्थिति माझ्यापेक्षां निराळी आहे; असें जर म्हणशील तर तें बरोबर नाहीं. कारण तुला तरी 'ब्रह्मानन्द'याशब्दाच्या पलीकडे काय ठाऊक आहे ? तुला ब्रह्मसाक्षात्कार थोडाच झाला आहे ! सारांश त्या चार वेदांच्या अभिमान्याप्रमाणें तूंहि फुकट ब्रह्मज्ञानाभिमान मानणारा आहेस. ॥८१॥

-'अहोपण, वेदांच्या संख्येहून त्यांचें स्वरूप जसें निराळें आहे तसें स्वगतादि भेदशून्य आनंदरूप ब्रह्मामध्यें अज्ञात अंशाचा संभवच नसल्यामुळें 'मला संपूर्ण ब्रह्मज्ञान नाहीं' हें म्हणणें योग्य नाहीं !' असा आक्षेप -

अखंडैकरसानंदे मायातत्कार्यवर्जिते ।
अशेषत्वसशेषत्ववार्तावसर एव क: ॥८२

अन्वयार्थ-[मायातत्कार्यवर्जिते अखंडैकरसानन्दे अशेषत्वसशेषत्ववार्तावसर: एव क: अस्ति-] माया व मायाकार्य यांनीं रहित व अखंड-एक-रसानन्द अशा ब्रह्माच्या ठिकाणीं अशेषत्व, सशेषत्व इत्यादि शब्दांस अवसरच कोठें आहे ?

प्रकाश:- तुला अशेष ब्रह्मज्ञान झालेलें नाहीं असें वरच्या श्लोकांत म्हटलें आहे व त्या 'अशेष' शब्दावरच जोर देऊन वादी येथें शंका करीत आहे. माया व मायाकार्य यांनीं रहित; अखंड, एकरस, आनंद इत्यादिरूप ब्रह्माच्या ठायीं सशेषत्वादि शब्दांचा प्रयोग तरी कसा होऊं शकेल ? असा या शंकेचा भावार्थ आहे. ॥८२॥

-ब्रह्मज्ञानाचेंहि अशेषत्वादिक दाखविण्यासाठीं 'मी ब्रह्म जाणतों' असें म्हणणाऱ्या वाद्याला विकल्पपूर्वक प्रश्न करितात -

शब्दानेव पठस्याहो तेषामर्थं च पश्यसि ।
शब्दपाठेऽर्थबोधस्ते संपाद्यत्वेन शिष्यते ॥८३

अन्वयार्थ - [शब्दान् एव पठसि आहो तेषां अर्थं च पश्यसि -] ब्रह्म अखंडैकरस, अद्वितीय, सच्चिदानन्दरूप आहे; इत्यादि नुस्ते शब्द मात्र तूं वाचतोस कीं त्यांच्या स्वगतादि-भेदशून्यत्वादि अर्थाकडेहि तुझें ध्यान आहे ? [ते शब्दपाठे अर्थबोध: संपाद्यत्वेन शिष्यते-] केवल शब्दांचाच पाठ जर तूं करीत असतील तर त्यांच्या अर्थज्ञानाची आवश्यकता असल्यामुळें तें तुला संपादन करून घेतलें पाहिजे.

प्रकाश:- ब्रह्म अखंडैकरस, अद्वितीय, सच्चिदानन्दरूप आहे; इत्यादि नुस्ते शब्द मात्र तूं वाचतोस कीं त्यांच्या अर्थाकडेहि तुझें ध्यान आहे ? केवल शब्दांचाच पाठ जर तूं करीत असशील तर त्यांच्या अर्थज्ञानाची आवश्यकता असल्यामुळें तें तुला संपादन करून घेतलें पाहिजे. ॥८३॥

-आणि-

अर्थे व्याकरणाद्बुद्धे साक्षात्कारोऽवशिष्यते ।
स्यात्कृतार्थत्वधीर्यावत्तावद्गुरुमुपास्व भो: ॥८४

अन्वयार्थ - [व्याकरणात् अर्थे बुद्धे सति

साक्षात्कार: अवशिष्यते-] व्याकरणावरून अर्थज्ञान झालें असतां साक्षात्कार होण्याचें बाकी राहतें. [अत: यावत् कृतार्थत्वधी; स्यात् तावत् गुरुं उपास्व भो:-] यास्तव कृतार्थताबुद्धि होईतोंपर्यंत बाबारे ! तूं गुरूची उपासना कर.

प्रकाश- व्याकरणादि शास्त्रांच्या साह्यानें तुला ब्रह्माचें परोक्ष ज्ञान झालें कीं संशयादिकांचें निरसन करून अपरोक्ष ज्ञान होणें अवशिष्ट राहणार. सारांश मी आतां कृतकृत्य झालों असें वाटेपर्यंत तुला गुरूची उपासना करणेंच उचित आहे, व कृतार्थ बुद्धि झाली कीं संपूर्ण ब्रह्मज्ञान झालें म्हणून समज. ॥८४॥

- ह्याप्रमाणें प्रसंगोपात्त शंकांचें निरसन करून आतां प्रकृत विषयाकडे वळतात -

आस्तामेतद्यत्र यत्र सुखं स्याद्विषयैर्विना ।
तत्र सर्वत्र विद्ध्येतां ब्रह्मानंदस्य वासनाम् ॥८५

अन्वयार्थ - [एतत् आस्ताम्-] हें असो. [यत्र यत्र विषयै: विना सुखं स्यात्-] ज्या ज्या वेळीं विषयांवाचून सुख होतें [तत्र सर्वत्र एतां ब्रह्मानन्दस्य वासनां विद्धि-] त्या त्या सर्व कालीं ती ब्रह्मानंदाची वासना आहे, असें जाण.

प्रकाश:- तात्पर्य: विषयानुभवावांचून आनंदाची प्रतीति होऊं लागली कीं तो ब्रह्मानंदाच्या वासनेचा आनंद आहे असें नि:संशय जाणावें. ॥८५॥

-ह्याप्रमाणें ब्रह्मानंद व वासनानंद यांचें दिग्दर्शन करून आतां तीन प्रकारचाच आनंद आहे, असा नियम करण्याकरिता पूर्वीं चव्वेचाळिसाव्या श्लोकांत सांगितलेल्या विषयानंदाचा अनुवाद करितात -

विषयेष्वभिलब्धेपु तदिच्छोपरमे सति ।
अंतर्मुखमनोवृत्तावानन्द: प्रतिबिम्बति ॥८६

अन्वयार्थ - [विषयेषु अभिलब्धेषु तदिच्छोपरमे सति -] जेव्हां जेव्हां फुलांच्या माळा-चंदन-स्त्री इत्यादि विषय प्राप्त होऊन त्यांची इच्छा निवृत्त होते [अंतर्मुखमनोवृत्तौ आनंद: प्रतिबिंबति-] तेव्हां तेव्हां अंतर्मुख मनोवृत्तीमध्यें जो स्वात्मानंद प्रतिबिंबित होतो तो विषयानंद होय.

प्रकाश:- इष्ट विषयांची पूर्णपणें प्राप्ति झाली असतां त्या त्या विषयाविषयींची इच्छा पूर्ण होते व त्यामुळें तिची शांति होते. तदनंतर त्या अंतर्मुख झालेल्या बुद्धिवृत्तीमध्यें आनंदाचें प्रतिबिंब पडतें; हाच 'विषयानन्द होय. ॥८६॥'

- तात्पर्य -

ब्रह्मानन्दो वासना च प्रतिबिम्ब इति त्रयम् ।
अंतरेण जगत्यस्मिन्नानन्दो नास्ति कश्चन ॥८७

अन्वयार्थ -[ब्रह्मानन्द: वासना च प्रतिबिंब: इति त्रयं, अन्तरेण अस्मिन् जगति कश्चन आनंद: न अस्ति-] ब्रह्मानन्द, वासनानन्द व विषयानन्द या तीन आनंदांवांचून या जगांत कोणताहि आनंद नाहीं.

प्रकाश:- या श्लोकांत सांगितलेल्या ब्रह्मानंदादि तीन आनंदांवांचून जगांत आनंदच नाहीं. पण - पूर्वी ब्रह्मानन्द, विद्यासुख व विषयानंद अशा तीन प्रकारच्या आनंदांचा उल्लेख आहे, व त्यांच्याशीं या प्रस्तुत श्लोकाचा विरोध दिसतो. त्याचप्रमाणें मुख्यानंद, आत्मानंद, योगानंद, ब्रह्मानंद, अद्वैतानंद इत्यादि शब्दांचा या व पुढील प्रकरणांतून उल्लेख आहे. त्यामुळें प्रस्तुत श्लोकांतील निर्देश अयुक्त होय - असें कोणाला वाटेल, पण तें बरोबर नाहीं. कारण विद्यानंदाचा विषयानंदामध्येंच अंतर्भाव होत असून मुख्यानंदादि सर्व आनंद एकच आहे. म्हणजे ब्रह्मानंदाचींच तीं भिन्न भिन्न नावें आहेत. याविषयीं पुढें मूळ ग्रंथांतहि स्पष्ट उल्लेख होणारच आहे. ॥८७॥

-'अहोपण, या अध्यायांत ब्रह्मानंदाचें विवेचन प्रकृत असल्यामुळें दुसऱ्या दोन आनंदांचे प्रतिपादन करणें प्रकृतासंगत आहे,' अशी शंका घेऊन 'ते

दोन्ही आनंद ब्रह्मानंदजन्य असल्यामुळें त्यांचें प्रतिपादन ब्रह्मानंदाच्या ज्ञानाच्या उपयोगी आहे, त्यामुळें तें प्रकृतासंगत नाहीं.' अशा आशयानें म्हणतात -

तथा च विषयानंदो वासनानंद इत्यमू ।
आनंदौ जनयन्नास्ते ब्रह्मानन्दः स्वयंप्रभः ॥८८

अन्वयार्थ - [तथा च यः स्वयंप्रभः आनन्दः विषयानंदः च वासनानंदः इति अमू आनंदौ जनयन् आस्ते-] अर्थात् जो स्वयंप्रकाश आनंद 'विषयानंद व वासनानंद या दोन आनंदांस उत्पन्न करीत असतो [सः ब्रह्मानन्द.-] तो ब्रह्मानन्द आहे.

प्रकाश.- ब्रह्मानंद दुसऱ्या दोन्ही आनंदांचें उत्पत्तिस्थान आहे असें याचें तात्पर्य समजावें. ॥८८॥

- पूर्वोक्त सर्व ग्रंथाचा अनुवाद करून आतां उत्तर ग्रंथास आरंभ करितात -

श्रुतियुक्त्यनुभूतिभ्यः स्वप्रकाशचिदात्मके ।
ब्रह्मानन्दे सुप्तिकाले सिद्धे सत्यन्यदा शृणु ॥८९

अन्वयार्थ - [श्रुतियुक्त्यनुभुतिभ्यः सुप्तिकाले स्वप्रकाशचिदात्मके ब्रह्मानंदे सिद्धे सति अन्यदा शृणु-] पूर्वोक्त श्रुति, युक्ति व अनुभव यांवरून निद्रासमयीं स्वप्रकाश चैतन्यरूप ब्रह्मानन्दाची सिद्धि झाली असतां तो आणखी केव्हां होतो तो ऐक. आतां यापुढें जागरावस्थेंतहि ब्रह्मानंदाच्या ज्ञानाचा जो उपाय सांगितला जात आहे तो तूं ऐक.'

प्रकाशः- अठ्ठावन्नाव्या श्लोकापासून येथपर्यंत श्रुतिप्रमाणें, युक्ती व सर्व प्राण्यांचे अनुभव यांवरून निद्रासमयीं ब्रह्मानन्द असतो असें सिद्ध केलें. आतां यापुढें जाग्रतींतहि ब्रह्मानंदाचा कसा अनुभव येईल हें सांगावयाचें आहे. ॥८९॥

-पण अगोदर ब्रह्मानंदाचा उपाय सांगण्यासाठीं जीवाच्या दोन अवस्थांची प्राप्ति निमित्तांसह सांगतात-

य आनन्दमयः सुप्तौ स विज्ञानमयात्मताम् ।
गत्वा स्वप्नं प्रबोधं वा प्राप्नोति स्थानभेदतः ॥९०

अन्वयार्थ - [सुप्तौ यः आनंदमयः सः विज्ञानमयात्मतां गत्वा-] सुषुप्तींत जो आनंदमय सांगितला आहे-श्लो. ६३. पहा.-तोच 'विज्ञान-' संज्ञक बुद्ध्युपाधिमत्त्वामुळें विज्ञानमयत्वाला प्राप्त होऊन [स्थानभेदतः स्वप्नं प्रबोधं वा प्राप्नोति-] स्थानभेदानें स्वप्न किंवा जागरण या अवस्थांस कर्मानुसार प्राप्त होतो.

प्रकाशः- बुद्धीचा अज्ञानांत लय झाल्यामुळें जो आनंदमय या नांवानें बोलला जात होता, तोच बुद्धि अज्ञानांतून बाहेर आली असतां तिच्याशीं मिळून जातो व त्यामुळें त्यास विज्ञानमय म्हणतात. या विज्ञानमय अवस्थेंत राहूनच तो स्वप्न व जाग्रति या दोन अवस्था भोगतो. शरीरांतील भिन्न भिन्न स्थानीं राहिल्यामुळें त्यास या दोन अवस्था प्राप्त होत असतात. ॥९०॥

-आतां जाग्रदादि-अवस्थोपयोगी स्थानें दाखवितात-

नेत्रे जागरणं कंठे स्वप्नः सुप्तिर्हृदंबुजे ।
आपादमस्तकं देहं व्याप्य जागर्ति चेतनः ॥९१

अन्वयार्थ - [नेत्रे जागरणं कंठे स्वप्नः च हृदंबुजे सुप्तिः भवति-] नेत्रांत जागरण, कंठांत स्वप्न व हृदयकमलांत निद्रा होते. पण 'नेत्र-' शब्द सर्व शरीराच्या उपलक्षणार्थ मानून उत्तरार्धात 'नेत्रे जागरणं' या अंशाचा अर्थ सांगतात - [चेतनः आपादमस्तकं देहं व्याप्य जागर्ति-] हा जीव पायांपासून मस्तकांपर्यंत देहाला व्यापून जागतो.

प्रकाशः- विज्ञानमय जोंपर्यंत नेत्रांत असतो तोंपर्यंत त्याला जाग्रतीचा अनुभव येतो; जोंपर्यंत कंठस्थानीं असतो तोंपर्यंत स्वप्न व जेव्हां हृदयकमलांत असतो तेव्हां गाढ निद्रा तो अनुभवितो. पण जाग्रतींत नेत्रामध्यें राहून त्याला सर्व देहाचें भान कसें होतें, म्हणून कोणी

विचारील यास्तव ग्रंथकार म्हणतात :- तो जीव देहास नखशिखांत व्यापून राहतो. म्हणजे तो जरी नेत्ररूप एकदेशांत राहत असला तरी त्याचा अंमल सर्व शरीरावर चालतो. ॥९१॥

-'देहाला व्यापून' या वाक्यानें विवक्षित असलेला अर्थ दृष्टान्तानें स्पष्ट करितात -

देहतादात्म्यमापन्नस्तप्ताय: पिंडवत्तत: ।
अहं मनुष्य इत्येवं निश्चित्यैवावतिष्ठते ॥९२

अन्वयार्थ - [यत: तप्ताय: पिंडवत् देहतादात्म्यं आपन्न:-] ज्याअर्थी जीवात्मा तापलेल्या लोखंडाच्या पिंडाप्रमाणें मनुष्यादि देहाशीं तादात्म्य पावलेला असतो [तत: अहं मनुष्य: इति एवं निश्चित्य एव अवतिष्ठते-] त्याअर्थी तो 'मी मनुष्य' असा निश्चय करून-असें संशयादिरहित ज्ञानानें ग्रहण करूनच राहतो.

प्रकाश:- तापलेला लोखंडाचा गोळा अग्नीशीं तादात्म्य पावतो. म्हणजे तो अग्निरूपच होतो. व त्यामुळें त्यास 'हा अग्नि आहे' असें लोक म्हणतात. हा दृष्टान्त होय. म्हणजे त्याप्रमाणेंच जीवात्मा देहाशीं तादात्म्य पावतो व त्यामुळें 'मी मनुष्य आहें, शहाणा आहें' इत्यादि निश्चय करून तो व्यवहारांत वागतो. ॥९२॥

- त्या देहतादात्म्यामुळें दुसऱ्याहि कोणत्या अवस्था होतात तें सांगतात -

उदासीन: सुखी दु:खीत्यवस्थात्रयमेत्यसौ ।
सुखदु:खे कर्म कार्ये त्वौदासीन्यं स्वभावत: ॥९३

अन्वयार्थ - [असौ उदासीन: सुखी दु:खीच इति अवस्थात्रयं एति-] हा उदासीन, सुखी व दु:खी या तीन अवस्थांस प्राप्त होतो. [सुखदु:खे कर्मकार्ये--] यांतील सुख व दु:ख कर्माचीं कार्ये आहेत. [औदासीन्यं तु स्वभावत:-] पण औदासीन्य स्वाभाविक आहे.

प्रकाश:- हा जीवात्मा उदासीनता, सुखित्व, दु:खित्व या तीन अवस्थांप्रत प्राप्त होतो. पण सुख व दु:ख कर्मफल आहे. म्हणजे पुण्याचें फल सुख व पापाचें दु:ख आहे. औदासिन्याची मात्र तशी स्थिति नाहीं. तें आत्म्याच्या स्वभावभूत आहे. अर्थात् सुखदु:खाप्रमाणें अनित्य नव्हे. ॥९३॥

- या सुख-दु:खाचे आणखी दोन भेद कसे होतात व औदासीन्य केव्हां असतें तें सांगतात -

बाह्यभोगान्मनोराज्यात्सुखदु:खे द्विधा मते ।
सुखदु:खान्तरालेषु भवेत्तूष्णीमवस्थिति: ॥९४

अन्वयार्थ - [बाह्यभोगात् च मनोराज्यात् सुखदु:खे द्विधा मते-] बाह्य भोगांमुळें व मनोराज्यामुळें सुख व दु:ख दोन प्रकारचें मानलेलें आहे. [सुखदु:खान्तरालेषु तूर्ष्णीं अवस्थिति: भवेत्-] आणि सुख व दु:ख यांच्यामध्यें तूर्ष्णीं स्थिति होते.

प्रकाश:- एक बाह्य सुख व दुसरें आंतर. उन्हाळ्यांत अंगास थंड वारा लागला असतां सुख होतें; पुत्रास आलिंगन दिलें असतां सुख होतें; अत्तराचा वास घेतला असता सुख होतें; सुंदर पदार्थ पाहून आनंद वाटतो व गोड किंवा इष्ट रस खाल्ल्यावर आनंद होतो; हें बाह्य सुख. आणि मनोराज्यामुळें जें होतें तें आंतर होय. असेंच दु:खहि दोन प्रकारचें आहे. या सुखदु:खांच्या मधील जी सुखदु:खरहित अवस्था असते, तिलाच उदासीनता म्हणतात. ॥९४॥

-आतां ज्या आनंदाकरितां जाग्रदादि अवस्थांचें वर्णन केलें त्याचें प्रतिपादन करितात -

न कापि चिंता मेऽस्त्यद्य सुखमास इति ब्रुवन् ।
औदासिन्ये निजानंदभानं वक्त्यखिलो जन: ॥९५

अन्वयार्थ - [अद्य मे का अपि चिंता नास्ति-] आतां मला कोणतीहि चिंता नाहीं, [अहं सुखं आसे इति ब्रुवन् अखिल: जन:-] मी सुखानें बसलों आहें

असें बोलणारे सर्व लोक [औदासीन्ये निजानंदभानं वक्ति-] औदासीन्यांत निजानंदाचें भान सांगत असतात.

प्रकाश:- उदासीन पुरुष निश्चिंत असतात व त्यामुळें त्यांस सर्वदा सुख होतें; आणि ते ही गोष्ट आपल्या तोंडानें सांगत असतात. अर्थात् उदासीन अवस्थेंतील आत्मानंद अनुभवसिद्ध आहे. ॥९५॥

- पण उदासीन अवस्थेंतील आनंदास जर निजानंद म्हटलें, तर तो ब्रह्मानंद झाला. अर्थात् त्याला पूर्वोक्त वासनानंदत्व नाहीं !' उत्तर -

अहमस्मीत्यहंकारसामान्याच्छादितत्वत: ।
निजानन्दो न मुख्योऽयं किं त्वसौ तस्य वासना ॥९६

अन्वयार्थ - [अहं अस्मि इति अहंकारसामान्याच्छादितत्वत: अयं मुख्य: निजानंद: न-] 'मी देवदत्त' अशा विशेषाकारानें जरी नाहीं तरी 'मी आहें' या सामान्य अहंकाराच्या योगानें आच्छादित झाल्यामुळें हा मुख्य निजानंद नव्हे; [किंतु असौ तस्य वासना-] तर ही त्याची वासना आहे.

प्रकाश:- उदासीन अवस्थेंत जो आनंद भासतो, तो मुख्य नव्हे. कारण त्यावेळीं 'मी आहें' हें भान असतेंच. म्हणजे तो आनंद या अहं अहंकारानें आच्छादित झालेला असतो. आणि त्यामुळें ती मुख्य ब्रह्मानन्दाची वासना आहे, असें म्हणावें लागतें. ॥९६॥

- मुख्य आनंदाहून निराळा कसा आनंद आहे, याविषयीं दृष्टान्त -

नीरपूरितभांडस्य बाह्ये शैत्यं न तज्जलम् ।
किं तु नीरगुणस्तेन नीरसत्तानुमीयते ॥९७

अन्वयार्थ - [नीरपूरितभांडस्य बाह्ये यत् शैत्यं अस्ति तत् जलं न भवति-] पाण्यानें भरलेल्या भांड्याला बाहेरून स्पर्श केला असतां प्रतीत होणारें जें शीतत्व तें स्वत: पाणी नव्हे. [किंतु नीरगुण:-] तर तो पाण्याचा गुण आहे. पण [तेन नीरसत्ता अनुमीयते-] त्यावरून पाण्याच्या अस्तित्वाचें अनुमान केलें जातें.

प्रकाश:- पाण्यानें भरलेल्या भांड्यास बाहेरून हात लावून पाहिल्यास तें गार लागतें. पण तें पाणी नव्हे, तर तो त्याचा शीतगुण आहे हें कोणीहि म्हणेल. कारण पाण्याचें स्वरूप जें द्रवत्व तें तेथें नसतें. अर्थात् हातास लागणारा गारवा पाण्याचा गुण होय. त्यावरून भांड्यांतील पाण्याचें अनुमान करितां येतें. थंडीच्या दिवसांत प्रस्तुत अनुभव चांगल्या प्रकारें येण्यासारखा आहे. ॥९७॥

- आणि या दृष्टान्ताप्रमाणेंच -

यावद्यावदहंकारो विस्मृतोऽभ्यासयोगत: ।
तावत्तावत्सूक्ष्मदृष्टेर्निजानंदोऽनुमीयते ॥९८

अन्वयार्थ - [अभ्यासयोगत: यावत् यावत् अहंकार: विस्मृत:-] अभ्यासाच्या योगानें जसा जसा अहंकाराचा विसर पडतो, [तावत् तावत् सूक्ष्मदृष्टे: निजानंद: अनुमीयते-] तशी तशी सूक्ष्म दृष्टि होत असल्यामुळें निजानंदाचें अनुमान केलें जातें.

प्रकाश:- चित्ताच्या ऐकाग्र्याकरितां केल्या जाणाऱ्या अभ्यासाच्या योगानें अहंकारादि वृत्तींचा हळु हळू लोप होऊं लागतो. तो जसा जसा अधिक वाढतो तशी तशी अंतर्दृष्टी अधिक सूक्ष्म होते व जशी जशी दृष्टि सूक्ष्म होत जाते, तसें तसें आत्मानंदाचें अनुमान होतें. सारांश; दृढ अभ्यासाच्या योगानें अहंकाराचा लय होतो. अहंकाराच्या लयामुळें दृष्टि सूक्ष्म होते. आणि सूक्ष्म दृष्टि झाली असतां आत्मानंदाचें नि:शंकपणें अनुमान करितां येतें. ॥९८॥

-'बुद्धीच्या सूक्ष्मतेची अवधि-सीमा कोणती ?' साक्षात्कार हीच तिची सीमा' असें उत्तर -

सर्वात्मना विस्मृत: सन्सूक्ष्मतां परमां व्रजेत् ।
अलीनत्वान्न निद्रैषा ततो देहोऽपि नो पतेत् ॥९९

अन्वयार्थ - [सर्वात्मना विस्मृत: सन् अहंकार: परमां सूक्ष्मतां व्रजेत्-] सर्व प्रकारें विस्मृत होत्साता अहंकार परम सूक्ष्मतेला प्राप्त होतो. 'तरमग ती निद्राच असेल !' उत्तर - [अलीनत्वात् एषा निद्रा न] सर्ववृत्तींचा विलय जरी झालेला असला तरी अन्त:करणाच्या स्वरूपाचा विलय झालेला नसल्यामुळें ती निद्रा नव्हे. कारण 'बुद्धीचें कारणरूपानें अवस्थान हीच निद्रा' असें आचार्यांनीं सांगितलें आहे. अन्त:करणस्वरूपाचा विलय झालेला नसतो याविषयीं चिन्ह [तत: देह: अपि नो पतेत्-] त्यामुळें देहहि पडत नाहीं.

प्रकाश:- अहंकाराचा सर्व प्रकारें विसर पडला असतां तो अतिशय सूक्ष्म होतो. पण त्याचा लय झालेला नसल्यामुळें त्या सूक्ष्मावस्थेस निद्रा असेंहि म्हणतां येत नाहीं. निद्रेचें मुख्य लक्षण शरीर शिथिल होणें हें आहे. झोंप आली असतां शरीर भूमीवर पडूं लागतें, हें सर्वप्रसिद्ध आहे. पण प्रस्तुत अवस्था लयरूप नसल्यामुळें शरीर पडूं लागत नाहीं. ॥९९।

- सारांश --

न द्वैतं भासते नापि निद्रा तत्रास्ति यत्सुखम् ।
स ब्रह्मानंद इत्याह भगवानर्जुनं प्रति ॥१००

अन्वयार्थ - [यत्र द्वैतं न भासते निद्रा अपि न-] ज्या वेळीं द्वैत भासत नाहीं व निद्राहि नसते [तत्र यत् सुखं अस्ति स: ब्रह्मानंद:-] त्यावेळीं उपलब्ध होणारें जें सुख असतें तो ब्रह्मानंद होय; 'पण हेंच ब्रह्मसुख आहे हें तुम्हांला कशावरून कळलें ?' उत्तर - [इति भगवान् अर्जुनं प्रति प्राह-] असें भगवानानीं अर्जुनास सांगितलें आहे.

प्रकाश:- इष्ट द्वैताचें भान झालें असतां सुख होतें किंवा निद्रेमध्यें सुख होतें. पण यांतील एकहि सुखाचें कारण नसतांना जें सुख होतें, तो ब्रह्मानन्दच होय, असें भगवंतांनीं गीतेच्या सहाव्या अध्यायांत सांगितलें आहे. ॥१००॥

- गीतेंतील श्लोकच ते पढतात -

शनै: शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।
आत्मसंस्थं मन:कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् ॥१

अन्वयार्थ - [धृतिगृहीतया बुद्ध्या शनै: शनै: उपरमेत्-] धैर्ययुक्त बुद्धीच्या योगानें हळुहळू शांत व्हावें. [च मन: आत्मसंस्थं कृत्वा किंचित् अपि न चिंतयेत्-] व मनाला आत्म्यामध्यें स्थिर करून नंतर कांहींहि चिंतन करूं नये.

प्रकाश:- धैर्ययुक्त बुद्धि हेंच अंत:करणास शांत करण्याचें साधन आहे. यास्तव तिचा आश्रय करून हळु हळू शांत व्हावें. आतां अंत:करणास कोठपर्यंत शांत करावें म्हणून म्हणशील तर सांगतों-मन अन्य सर्व विषयांस सोडून आत्म्यामध्येंच निश्चयपूर्वक स्थिर होई तों असा अभ्यास करावा. व तें एकदा आत्मनिष्ठ झालें कीं सर्व मनोव्यापार सोडावे. ॥१॥

-पण, ही पूर्वोक्त सिद्धि प्राप्त करून घेण्यास प्रवृत्त झालेल्या साधकानें प्रथम काय करावें, तें भगवानांच्या शब्दांनींच सांगतात -

यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥२

अन्वयार्थ - [चंचलं अस्थिरं च मन: यत: यत: निश्चरति-] स्वभावत:च चंचल व त्यामुळेंच अस्थिर-एकाच विषयांत नियत न राहणारें मन ज्या ज्या शब्दादि विषयास उद्देशून बाहेर पडतें, [तत: तत: एतत् नियम्य आत्मनि एव वशं नयेत्-] त्या त्या शब्दादि विषयापासून त्याचें नियमन करून, मिथ्यात्वादि दोषदर्शनानें त्यांना आभासरूप करून, वैराग्यभावनेनें त्यांचा निरोध करून, आत्म्याच्या अधीन करावें.

प्रकाश:- मन स्वभावत:च चंचल आहे व त्यामुळें तें एकाच विषयांत स्थिर होऊन राहत नाहीं. पण तें ज्या ज्या विषयाच्या उद्देशानें वृत्तिद्वारा बाहेर पडत असेल त्या त्या विषयापासून त्यास मागें परतवून आत्म्याच्या स्वाधीन करावें. जसें राजपुरुष चोराला मुख्य कामगाराच्या हवालीं करितात, त्याप्रमाणें या दुष्ट मनाचा निग्रह करावा. ॥२॥

-मन शांत झालें असतां काय होतें, तें सांगतात-

प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥३

अन्वयार्थ - [शांतरजसं प्रशांतमनसं अकल्मषं एनं योगिनं उत्तमं ब्रह्मभूतं सुखं उपैति-] **ज्याचें मोहादि क्लेशरूप रज-मल शांत झालें आहे व त्यामुळें ज्याचें मन अत्यंत शांत-विक्षेपशून्य झालें आहे अशा ब्रह्मभूत म्ह० ब्रह्मच हें सर्व आहे अशा निश्चयानें जीवन्मुक्त झालेल्या अधर्मादि पापरहित योग्याला उत्तम-क्षयित्व-सातिशयित्व इत्यादि दोषशून्य-सुख प्राप्त होतें.**

प्रकाश:- अभ्यासाच्या योगानें ज्याचें मोहादि क्लेश नष्ट झाले आहेत व त्यामुळेंच ज्याचें मन शांत झालें आहे आणि मन शांत झाल्यामुळें ज्याचें सर्व पापकर्म नष्ट झालें आहे अशा त्या उत्तम योग्यासच ब्रह्मसुखाचा लाभ होतो; दुसऱ्या कोणासहि होत नाहीं. सारांश, आत्मचिंतन व आत्मध्यान हेंच या अक्षय सुखाचें कारण आहे. ॥३॥

-या संक्षिप्त अर्थाच्याच विवरणपर असलेले भगवद्वचनरूप श्लोक पढतात -

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥४
सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वत: ॥५
यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं तत: ।
यस्मिन्स्थितो न दु:खेन गुरुणापि विचाल्यते ॥६
तं विद्याद्दु:खसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ।
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥७

अन्वयार्थ - [यत्र योगसेवया निरुद्धं चित्तं उपरमते -] ज्या वेळीं दृढ योगाभ्यासामुळें एकाग्र झालेलें - निरुद्ध चित्त शांत होतें; [च यत्र आत्मना आत्मानं पश्यन् आत्मनि एव तुष्यति-] तसेंच, ज्यावेळीं सत्त्वप्रधान शुद्ध अंत:करणाच्या द्वारा प्रत्यगात्म्यास पाहणारा साधक परमानंदघन आत्म्यामध्येंच संतुष्ट होतो; [यत्र च यत् बुद्धिग्राह्यं अतींद्रियं आत्यंतिकं सुखं तत् वेत्ति-] ज्या अवस्थेंत जें बुद्धिद्वाराच ग्रहण करण्यास योग्य, अतींद्रिय-इंद्रियें व विषय यांच्या संयोगापासून न होणारें व निरतिशय सुख त्यास साधक जाणतो; [च यत्र स्थित: अयं तत्त्वत: न चलति एव-] त्याचप्रमाणें ज्या अवस्थेंत स्थित झालेला पुरुष तत्त्वापासून ढळत नाहीं; [च यं लब्ध्वा अपरं लाभं तत: अधिकं न मन्यते-] ज्याची प्राप्ती झाल्यावर त्याला दुसरा कोणताहि लाभ अधिक वाटत नाहीं; [यस्मिन् स्थित: गुरुणा अपि दु:खेन न विचाल्यते-] आणि ज्यामध्यें स्थित झालेला हा पुरुष मोठ्या दु:खानेंहि चंचल होत नाहीं [तं दु:खसंयोगवियोगं योगसंज्ञितं विद्यात्-] त्या दु:खसंयोगाच्या वियोगास योग असें जाणावें. [स: योग: अनिर्विण्णचेतसा निश्चयेन योक्तव्य:-] तो योग निर्वेदरहित अंत:करणानें व निश्चयानें करावा.

प्रकाश:- पूर्वश्लोकांत जें उत्तम सुख प्राप्त होतें म्हणून सांगितलें होतें, त्याचाच भगवानांनीं पुढील चार श्लोकांत विस्तार केला आहे. हें सर्व प्रकरण भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायांत आहे. या चारी श्लोकांचें तात्पर्य असें:- ब्रह्मानंदरूप सुख प्राप्त झालें असतां चित्त निश्चल होतें; अति निर्मल अंत:करणानें आत्म्यास पाहून साधक त्याच्या स्वरूपभूत आनंदांतच गढून जातो; एकदा या स्वसंवेद्य व

अतींद्रिय सुखाचा लाभ झाला असतां तो आत्मतत्त्वापासून ढळत नाहीं; त्याला दुसरा कोणाताहि लाभ या सुखाहून अधिक वाटत नाहीं; व त्याच्यावर दु:खाचें डोंगर जरी पडले तरी तो डगमगत नाहीं. अशा प्रकारच्या या सुखाची प्राप्ति म्हणजे दु:खाचा नाश होय. किंवा अगदीं मूळ शब्दास धरून बोलावयाचें असल्यास सुखप्राप्ति म्हणज दु:खाच्या संयोगाचा वियोग होय, म्हणजे दु:खाचा पुरुषार्शी पूर्वी जो संयोग झाला होता त्याचा विच्छेद होणें होय. यालाच शास्त्रांत योग असें म्हटलें आहे. हा फार कठिण असल्यामुळें साधकास त्याच्या अनुष्ठानाचा त्यानें कंटाळा न करितां किंवा दीर्घकाल अनुष्ठान करूनहि सिद्धि होत नाहीं म्हणून न त्रासतां, दृढ निश्चयानें अभ्यास करावा. या जन्मीं साध्य न झाल्यास पुढच्या जन्मीं किंवा त्याच्या पुढच्या जन्मीं साध्य होईल. उगीच त्वरा करण्यांत काय तात्पर्य आहे ! अशी मनाची समजूत घालून जर या चंचल मनाच्या निग्रहास आरंभ केला, तर त्याचीं पूर्वोक्त मधुर फलें कधीं ना कधीं चाखावयास मिळतीलच मिळतील, यांत शंका नाहीं. ॥४॥५॥६॥७॥

- या उक्तार्थाचाच उपसंहार करितात -

युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मष: ।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥८

अन्वयार्थ - [एवं आत्मानं सदा युञ्जन् विगतकल्मष: योगी-] ह्याप्रमाणें आपल्या मनाला सर्वदा शांत करणारा-आत्मानुसंधान करणारा निष्पाप-प्रतिबंधरहित योगी [ब्रह्मसंस्पर्श: अत्यंतं सुखं सुखेन अश्नुते-] ब्रह्मस्वरूपभूत निरतिशय सुखाचा अनायासानें अनुभव घेतो.

प्रकाश:- मनाच्या योगानेंच सर्व इंद्रियसमुदायाचा निरोध करून नंतर आपल्या मनासहि अहोरात्र एकाग्र करणारा योगी निष्पाप होतो. आणि तदनंतर ब्रह्मरूप व त्यामुळेंच सर्वोत्कृष्ट सुख सहज भोगतो. म्हणजे व्यावहारिक लोकांना व्यवहारांतील सुख भोगण्यास जसें प्रथम पुष्कळ आयासहि करावे लागतात, तसे यांस करावे लागत नाहींत. ॥८॥

-'कंटाळा न करितां जर योगाभ्यास केला तर त्याचें फल अवश्य मिळतें' असें दृष्टान्त सांगतात --

उत्सेक उदधेर्यद्वत्कुशाग्रेणैकबिन्दुना ।
मनसो निग्रहस्तद्वद्भवेदपरिखेदत: ॥९

अन्वयार्थ - [कुशाग्रेण एकबिंदुना यद्वत् उदधे: उत्सेक:-] कुशाच्या अग्रानें एक एक बिंदु बाहेर काढून टाकणें, या उपायानें खिन्न न झाल्यास ज्याप्रमाणें कालांतरीं समुद्राचें शोषण होतें [तद्वत् मनस: निग्रह: अपरिखेदत: भवेत्-] त्याप्रमाणें मनाचा निग्रहहि न कंटाळतां अभ्यास केल्यास कालान्तरीं सिद्ध होतो.

प्रकाश:- एका टिटवीनें समुद्राच्या कांठीं आपलीं अंडीं घातलीं व ती चारा आणण्याकरितां कोठें निघून गेली. इतक्यांत समुद्रास भरती येऊन तीं अंडीं वाहून गेलीं. टिटवी जों परत येऊन पाहते तों आपलीं अंडीं नाहींशीं झालीं आहेत व समुद्रावांचून दुसऱ्या कोणाचेंहि हें काम नव्हे, असें तिला समजलें. अपत्यप्रेम मोठें कठिण आहे. वस्तुत: तो जरी एक लहानसा पक्षीच होता, तरी त्यांस तें अपत्यनाशाचें दु:ख सहन झालें नाहीं. त्या टिटवीनें समुद्राचा सूड घेण्याचें मनांत आणलें व ती आपल्या बारिकशा चोंचीनें समुद्रांतून एक एक थेंब उचलून बाहेर फेकूं लागली. तिचा हा एकसारखा चाललेला क्रम पाहून आकाशमार्गानें जात असलेल्या नारदास मोठें आश्चर्य वाटलें व तिच्याजवळ येऊन त्यांनीं 'तूं हें काय करीत आहेस ?' असें विचारिलें, तेव्हां त्या दु:खी टिटवीनें आपली सर्व हकीकत त्यास कळविली. तिचें वर्तमान ऐकून नारदास आश्चर्य वाटलें व 'एवढा थोरला समुद्र तुझ्यानें कसा शुष्क करवेल ?' असेंहि तिला विचारिलें. पण ती

म्हणाली, 'कांहीं झालें तरी मी या मत्त झालेल्या समुद्रास आटवून सोडल्यावांचून राहणार नाहीं.' हा तिचा दृढ निश्चय पाहून नारद गरुडाकडे गेले व त्यास त्यांनीं हा सर्व वृत्तांत कळविला. जात्यभिमान बहुतेक सर्वांमध्येंच असतो. समुद्राचें हें उन्मत्तमणाचें कृत्य गरुडासहि सहन झालें नाहीं व तो त्या टिटवीच्या साह्यास आला. गरुड येताच समुद्राचें पाणी हां हां म्हणतां आटूं लागलें. त्यामुळें जलचर प्राण्यांस फार दु:ख झालें. हा सर्व प्रकार पाहून समुद्रासहि मोठी भीति वाटली, व तो गरुडास शरण आला. पुढें गरुडाच्या सांगण्यावरून समुद्रानें टिटवीचीं अंडीं परत दिलीं. सारांश , दृढ निश्चयामुळें टिटवीसारख्या प्राण्यासहि सिद्धि मिळते. असो; या गोष्टीकडे लक्ष्य देऊन श्री गौडपादाचार्यांनीं प्रस्तुत कारिका मांडुक्यावरील कारिकेंत लिहिली आहे. सारांश-दर्भाच्या अग्रावर जेवढें पाणी राहतें तेवढाला थेंब बाहेर टाकूनहि जसें समुद्राचें शोषण करण्याचें टिटवीनें मनांत आणिलें होतें, त्याप्रमाणें निश्चयानें व न कंटाळतां जर अभ्यास केला, तर मनाचाहि निग्रह होणें शक्य आहे. ॥९॥

-मन:शांतीनें ब्रह्मसुख होतें, ही गोष्ट केवल गीतेंतच नव्हे तर मैत्रायणीय शाखेंतहि सांगितली आहे, असें सांगतात --

बृहद्रथस्य राजर्षे: शाकायन्यो मुनि: सुखम् ।
प्राह मैत्राख्यशाखायां समाध्युक्तिपुर:सरम् ॥१०

अन्वयार्थ - [मैत्राख्यशाखायां शाकायन्य: मुनि:-] 'मैत्रायणीय-' नांवाच्या यजु:शाखेंत 'शाकायन्य'-नामक कोणी ऋषी [बृहद्रथस्य राजर्षे: समाध्युक्तिपुर:सरं सुखं प्राह-] शिष्यभावानें शरण आलेल्या 'बृहद्रथ-' संज्ञक राजर्षीला प्रथम समाधीचा उपदेश करूनच ब्रह्मसुख सांगता झाला.

प्रकाश:- प्रस्तुत मुनीनें उपदेश केला वगैरे सर्व प्रकार यापुढेंच सांगितलेला आहे. ॥१०॥

यथा निरिंधनो वह्नि: स्वयोनावुपशाम्यति ।
तथा वृत्तिक्षयाच्चित्तं स्वयोनावुपशाम्यति ॥११

अन्वयार्थ - [निरिंधन: वह्नि: यथा स्वयोनौ उपशाम्यति-] इंधन म्हणजे जळण. त्यास ज्यानें जाळून टाकिलें आहे असा निरिंधन अग्नि जसा आपल्या कारणरूप तेजामध्यें लीन होतो म्हणजे ज्वालादि विशेष आकार टाकून सामान्य तेजोरूपानें राहतो [तथा चित्तं वृत्तिक्षयात् स्वयोनौ उपशाम्यति-] त्याप्रमाणेंच चित्तहि, निरोधसमाधीच्या अभ्यासानें वृत्ति नष्ट झाल्या असतां आपल्या सत्त्वरूप कारणामध्यें मिळून जातें. राजसादि सर्व वृत्तींचा नाश झाल्यामुळें आपल्या कारणांत म्ह० सत्त्वमात्रांत तें शांत होतें. त्याचा केवल सत्त्वाकार अवशिष्ट राहतो.

- नंतर -

स्वयोनावुपशांतस्य मनस: सत्यकामिन: ।
इंद्रियार्थविमूढस्यानृता: कर्मवशानुगा: ॥१२

अन्वयार्थ --[सत्यकामिन: स्वयोनौ उपशांतस्य इंद्रियार्थविमूढस्य मनस:-] सत्य ब्रह्माची इच्छा करणाऱ्या, आपल्या करणामध्यें लीन झालेल्या व विषयविमुख झालेल्या- विषयज्ञानशून्य मनाला [कर्मवशानुगा: अनृता: स्यु:-] कर्माधीन-साधन-परतंत्र असलेले सुखादिकभाव साधनांसह मायिकत्वज्ञानानें मिथ्या होतात.

प्रकाश:- सत्य जें ब्रह्म त्याच्याविषयीं इच्छा करणाऱ्या मनास, जीवास प्राप्त होणारे सर्व भोग मिथ्या वाटतात. कारण एका ब्रह्माकडेच त्याचा कल असल्यामुळें तें आपल्या कारणांत लीन होतें. आणि त्यामुळें तें आपोआपच विषयविमुख होतें. पण जर कदाचित् तें व्यवहारांत आलें तर त्यास सर्वच द्वैत मिथ्या वाटत असल्यामुळें कर्मपरतंत्र जीवाचे भोगहि मिथ्या वाटणें साहजिक आहे. ॥१२॥

-'अहोपण, चित्त शांत झाल्यावर जगत् मिथ्या

होतें, हें म्हणणें अयोग्य आहे. कारण चित्त हें जगाचें उपादान कारण नव्हे !' उत्तर --

चित्तमेव हि संसारस्तत्प्रयत्नेन शोधयेत् ।
यच्चितस्तन्मयो मर्त्यो गुह्यमेतत्सनातनम् ॥१३

अन्वयार्थ - [यत: चित्तं एव हि संसार: तत् प्रयत्नेन शोधयेत्-] ज्या अर्थी चित्तच संसार आहे त्या अर्थी त्याचें प्रयत्नानें शोधन करावें. [यच्चित: तन्मय: मर्त्य: एतत् सनातनं गुह्यं अस्ति-] 'ज्याच्यामध्यें मन असतें तद्रूप प्राणी होतो' हें अबाधित गुह्य आहे.

प्रकाश:- चित्त हें स्वरूपत: जरी जगाचें कारण नसलें तथापि तें माझें भोग्य आहे असें प्राण्यास चित्तामुळेंच वाटत असतें. म्हणून चित्त हा संसार आहे; असा येथें निर्देश केला आहे. आणि असा प्रकार असल्यामुळें चित्ताचीच प्रथमत: शुद्धि केली पाहिजे. 'ज्या ज्या प्राण्याचें ज्या ज्या पुत्रकलत्रादि विषयांमध्यें चित्त गढून गेलेलें असतें, तो तो तन्मय होत असतो' हा सिद्धांत कधींहि बाधित न होणारा आहे. यास्तव चित्ताची शुद्धि झाली असतांच आत्माच्या संसाराची निवृत्ति होणें शक्य आहे. रजोगुण व तमोगुण यांचा सर्वथैव नाश करून चित्तास सत्वमय व एकाग्र करणें हीच त्याची शुद्धि होय. ॥१३॥

-'अहोपण, अनादि कालापासून प्रवृत्त झालेल्या अनंत जन्मांत घडलेली पुण्य-पापरूप सुखदु:खद कर्में असेपर्यंत, चित्तशुद्धि जरी झाली तरी त्यामुळें संसाराची निवृत्ति कशी होईल ?'अशी शंका घेऊन 'चित्तप्रसादा वरून उपलक्षित होणाऱ्या ब्रह्मानुसंधानानें सर्व कर्माचा क्षय होऊं शकतो' अशा आशयानें तिचा परिहार करितात -

चित्तस्य हि प्रसादेन हन्ति कर्म शुभाशुभम् ।
प्रसन्नात्माऽऽत्मनि स्थित्वा सुखमक्षय्यमश्नुते ॥१४

अन्वयार्थ - [चित्तस्य प्रसादेन हि शुभाशुभं कर्म हन्ति-] साधक चित्ताच्या प्रसादानेंच शुभ व अशुभ कर्मांचा नाश करितो. [तथाच प्रसन्नात्मा आत्मनि स्थित्वा अक्षय्यं सुखं अश्नुते-] व ज्यांचें चित्त प्रसन्न झालें आहे तो स्वरूपभूत अद्वितीय आनंदरूप ब्रह्मामध्यें निश्चल राहून, - 'तेंच मी' अशा निश्चयानें सर्व दृश्याचा परिहार करून - चिन्मात्ररूपानें अवस्थित होऊन स्वरूपभूत अक्षय्य सुख भोगतो.

प्रकाश:- 'ज्याप्रमाणें वाळलेल्या गवताची बारिक काडी पेटलेल्या अग्नींत टाकिली असतां हां हां म्हणतां जळून जाते, त्याप्रमाणें ह्या आत्मज्ञ पुरुषाचें सर्व पाप नष्ट होतें; ('तद्यथा ईषिकातूलमग्नौ प्रोतम्' ही श्रुति व 'उपपातकेषु सर्वेषु पातकेषु महत्सु च । प्रविश्य रजनीपादं ब्रह्मध्यानं समाचरेत् ॥' ही स्मृति-पहा.) अशा अर्थाच्या श्रुति व स्मृतिहि आहेत. त्यामुळें ज्याचें चित्त अति प्रसन्न झालें आहे आणि त्यामुळें ज्याचें आत्मानुसंधान अति दृढ झालें आहे, अशा पुरुषाचें पुण्यपापरूप सर्व कर्म नष्ट होतें असा सिद्धांत करितां येतो. पुढें ज्याचें चित्त तत्त्वज्ञानरूप अति शुद्ध परिणामाप्रत पोंचलें आहे, अशा ह्या आत्मज्ञ पुरुषास तो स्वरूपानंदांतच सर्वदा निमग्न राहत असल्यामुळें अक्षय्य सुख मिळतें. अक्षय्य म्हणजे क्षय होण्यास अशक्य. म्हणजे ज्याचा कधींहि क्षय होत नाहीं असें नित्य सुख होतें. ॥१४॥

-'प्रसन्नात्मात्मनि स्थित्वा' हीच गोष्ट दृष्टान्त देऊन स्पष्ट करितात -

समासक्तं यथा चित्तं जंतोर्विषयगोचरे ।
यद्येवं ब्रह्मणि स्यात्तत्को न मुच्येत बंधनात् ॥१५

अन्वयार्थ - [जंतो: चित्तं विषयगोचरे यथा समासक्तं भवति-] प्राण्याचें चित्त विषयमार्गामध्यें विषयरूप इंद्रियप्रचारभूमींत स्वभावत:च जसें अत्यंत आसक्त झालेलें असतें [एवं ब्रह्मणि यदि स्यात्-] तसेंच प्रत्यग्रूप परमात्मामध्यें जर तें आसक्त

होईल [तत् कः बंधनात् न मुच्येत-] तर बंधनापासून कोण मुक्त होणार नाहीं ? सर्व मुक्त होतील.

प्रकाश:- प्राणी विषयामध्यें किती निमग्न झालेला असतो हें प्रत्येकास ठाऊक असल्यामुळें त्याचा विस्तार करणें नलगे. पण तो जसा विषयांमध्यें अहोरात्र गढून गेलेला असतो तसाच जर ब्रह्मामध्यें गढून जाईल, तर त्यास मुक्त होण्यास मुळींच विलंब लागणार नाहीं. ॥१५॥

- आतां हाच सिद्धांत दृढ करण्यासाठीं मनाचे अवांतर भेद सांगतात --

मनो हि द्विविधं प्रोक्तं शुद्धं चाशुद्धमेव च ।
अशुद्धं कामसंपर्काच्छुद्धं कामविवर्जितम् ॥१६

अन्वयार्थ - [शुद्धं च अशुद्धं एव च इति मनः द्विविधं प्रोक्तं-] शुद्ध व अशुद्ध असें मन दोन प्रकारचें सांगितलें आहे. [हि तत् कामसंपर्कात् अशुद्धंच कर्मविवर्जितं शुद्धं भवति-] तें कामाशीं संबद्ध झाल्यामुळें अशुद्ध व कामरहित असलें कीं शुद्ध होतें.

प्रकाश:- मन हें काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादि दुष्ट वृत्तींनीं युक्त झालें कीं त्यास अशुद्ध म्हणतात व तें केवळ सात्विक भावांच्या योगानें युक्त झालें कीं त्यास शुद्ध म्हणतात. ॥१६॥

-तें द्विविध मनच क्रमानें संसार व मोक्ष यांचें निमित्त होतें, असें सांगतात -

मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ।
बंधाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम् ॥१७

अन्वयार्थ - [मनुष्याणां बंधमोक्षयोः मनः एव कारणं अस्ति-] मनुष्यांच्या बंधमोक्षाला मनच कारण आहे. [तत् विषयासक्तं बंधाय च निर्विषयं मुक्त्यै स्मृतम्-] तें विषयासक्त झालें असतां बंधाला व विषयरहित झालें असतां मुक्तीला कारण होतें, असें सांगितलें आहे.

प्रकाश:- मनुष्याचें मनच बंधास व मोक्षास कारण होतें. या वाक्यांत मनुष्याचें असें म्हणण्याचें कारण असें कीं- पुरुषार्थाविषयीं मनुष्याचाच अधिकार आहे. पशु, पक्षी, इत्यादि तिर्यक् योनींतील प्राण्यांस मनाचा निरोध करितां येत नसल्यामुळें त्यांचा अधिकार नाहीं. ज्याच मन विषयासक्त होतें त्यास बंध उत्पन्न होतो व ज्याचें मन, तत्त्वज्ञानाच्या योगानें विषय मिथ्या आहेत असें समजल्यामुळें विषयशून्य होतें त्यास मोक्ष मिळतो. अर्थात् मनुष्यास पशु इत्यादि अधोयोनींत घालविण्यास व देवादी उर्ध्वलोकीं घालविण्यास हें मनच समर्थ आहे. ॥१७॥

-याविषयीं श्रुतीचें प्रमाण देतात -

समाधिनिर्धूतमलस्य चेतसो निवेशितस्यात्मनि यत्सुखं भवेत् ।
न शक्यते वर्णयितुं गिरा तदा स्वयं तदंतः दंत-करणेन गृह्यते ॥१८

अन्वयार्थ -[आत्मनि निवेशितस्य समाधि-निर्धूतमलस्य चेतसः यत् सुखं भवेत्-] प्रत्यग्रूप आत्म्यामध्यें स्थिर केलेल्या व समाधीच्या योगानें म्ह० प्रत्यगात्मा व ब्रह्म यांच्या एकत्वविषयक वृत्तीची आवृत्ती केल्यानें ज्याचा रजस्तमोमल निःशेष धुवून गेला आहे अशा अन्तःकरणाला समाधींत जें सुख होतें; [तत् गिरा वर्णयितुं न शक्यते-] त्या अलौकिक सुखाचें वाणीनें वर्णन करवत नाहीं. [तदा तत् स्वयं अंतःकरणेन गृह्यते] तर त्या वेळीं तें स्वतः अंतःकरणाच्या योगानें ग्रहण केलें जातें.

प्रकाश:- अद्वैतब्रह्मस्वरूपामध्यें ज्यास स्थिर केलें आहे व ज्यामुळें ज्याचे राजस व तामस मल नष्ट झाले आहेत, अशा एकाग्र मनास जो आनंदानुभव होतो त्याचें वर्णन करितां येत नाहीं. कारण तो अतींद्रिय असल्यामुळें त्याचें केवळ अति शुद्ध मनानेंच ग्रहण होण्यासारखें आहे, म्हणजे तें लौकिक सुखाप्रमाणें

बोलतां येण्यासारखें नसून नुस्तें अनुभवाच्याच योग्य आहे. वस्तुत: पाहतां लौकिक सुखहि स्वसंवेद्यच आहे हें खरें; पण त्याच्याविषयीं 'तें असें असें आहे' इतके तरी सांगतां येते; पण याविषयीं तेंहि करितां येत नाहीं. ॥१८॥

-'पण ही समाधि दुर्लभ आहे' तेव्हां तिच्या योगानें ब्रह्मानंदाचा निश्चय कसा संभवतो ?' उत्तर --

यद्यप्यसौ चिरं कालं समाधिर्दुर्लभो नृणाम् ।
तथापि क्षणिको ब्रह्मानन्दं निश्चाययत्यसौ ॥१९

अन्वयार्थ - [यद्यपि असौ समाधि: नृणां चिरं कालं दुर्लभ:-] जरी ही समाधि मनुष्यांना दीर्घ काल प्राप्त होणें दुर्लभ आहे [तथापि असौ क्षणिक: ब्रह्मानंदं निश्चाययति-] तरी ती क्षणिक समाधिहि ब्रह्मानन्दाचा निश्चय करविते.

प्रकाश:- सर्ववृत्ति निरोधरूप समाधि सर्वच मनुष्यांस दुर्लभ आहे. त्यांतून ती दीर्घकाल राहणें हें तर त्याहूनहि कठीण. पण या समाधीचा एक क्षणभर जरी अनुभव आला, तरी तेवढ्यावरून ब्रह्मानन्दाचा निश्चय करितां येतो. ॥१९॥

-'अहोपण, आत्मदर्शनासाठीं श्रवणादि साधनांमध्यें प्रवृत्त झालेलेहि कित्येक आनंदनिश्चयशून्य व बहिर्मुखच असलेले आढळतात' अशी शंका घेऊन 'श्रद्धादिरहित पुरुषाची स्थिति जरी तशी असली तरी श्रद्धादिसंपन्न लोकांचा आनंदनिश्चय होतोच' असें सांगतात --

श्रद्धालुर्व्यसनी योऽत्र निश्चिनोत्येव सर्वथा ।
निश्चिते तु सकृत्तस्मिन् विश्वसित्यन्यदाप्ययम्
॥२०

अन्वयार्थ - [य: श्रद्धालु: व्यसनी स: अत्र सर्वथा निश्चिनोति एव-] जो श्रद्धालु व व्यसनी म्ह० कांहीं झालें तरी मी समाधि संपादन करीनच असा आग्रही असतो, तो या समाधीविषयी अवश्य निश्चय करितोच. [तस्मिन् सकृत् निश्चिते तु अयं अन्यदा अपि विश्वसिति-] व एकदा ब्रह्मानंदाचा क्षणिक समाधींत निश्चय झाला कीं मग हा - एकदा आनंदानुभव घेतलेला योगी दुसऱ्या वेळींहि 'आनंद आहे' असा विश्वास ठेवतो.

प्रकाश:- ज्या पदार्थावांचून मनुष्याचें जाग्रतींत एक क्षणभरहि चालत नाहीं त्या पदार्थाचें त्यास व्यसन लागलेलें आहे असें म्हणतात. ज्या श्रद्धालु पुरुषास समाधीचें व्यसन लागलेंले असतें, त्यास समाधीच्या वेळीं ब्रह्मानन्दाचा अवश्य अनुभव येतो; व क्षणभर का होईना, पण एकदा ब्रह्मानन्दाचा अनुभव आला कीं मुमुक्षु ब्रह्मानन्दाविषयीं अन्यकालींहि विश्वासयुक्त होतो. म्हणजे ज्याप्रमाणें एकाद्या मनुष्यास प्रखर दु:खाचा किंवा उत्तम सुखाचा एकदा अनुभव आला असतां तो तें यावज्जीव आठवितो, त्याप्रमाणेंच या ब्रह्मानन्दाचा ज्यास एकदा अनुभव आला आहे, तो त्यास पुन: केव्हांहि विसरत नाहीं. ॥२०॥

- आणि मग --

तादृक् पुमानुदासीनकालेप्यानन्दवासनाम् ।
उपेक्ष्य मुख्यमानन्दं भावयत्येव तत्पर: ॥२१

अन्वयार्थ - [तादृक् पुमान् उदासीनकाले अपि आनंदवासनां उपेक्ष्य-] तशा प्रकारचा - श्रद्धादिपुर:सर एकवार निश्चय केलेला पुरुष उदासीन कालींहि उपलब्ध होणाऱ्या आनंदवासनेची उपेक्षा करून [तत्पर: सन् मुख्यं आनंदं एव भावयति-] मुख्यानंदांत तत्पर होत्साता त्या मुख्य आनंदाचीच भावना करितो.

प्रकाश - जो पुरुष श्रद्धादियुक्त होऊन एकदा आनंदाचा निश्चय करितो तो उदासीन अवस्थेत अनुभवास येणाऱ्या आनंदाच्या वासनेची उपेक्षा करून मुख्य आनंदाची इच्छा करूं लागतो व त्या दृढ

इच्छेमुळें त्याची भावना सर्वदा ब्रह्मानंदास विसरत नाहीं. ॥२१॥

- याप्रमाणें व्यवहारकालीं निजानंदाची भावना करितो, याविषयीं पूर्वी ९ व्या प्रकरणांत दिलेलाच दृष्टान्त देऊन त्याची दार्ष्टान्तिकाचे ठिकाणीं योजना करितात --

परव्यसनिनी नारी व्यग्रापि गृहकर्मणि ।
तदेवास्वादयत्यन्त: परसङ्गरसायनम् ॥२२
एवं तत्त्वे परे शुद्धे धीरो विश्रान्तिमागत: ।
तदेवास्वादयत्यंतर्बहिर्व्यवहरन्नपि ॥२३

अन्वयार्थ - [यथा परव्यसनिनी नारी गृहकर्मणि व्यग्रा अपि-] ज्याप्रमाणें परपुरुषाचें व्यसन लागलेली स्त्री गृहकर्मामध्यें व्यग्र असतांहि [तत् परसंगरसायनं एव अंत: आस्वादयति-] त्या परपुरुषसंगरूप सुखाचाच मनांत स्वाद घेत असते, [एवं परे शुद्धे तत्त्वे विश्रांतिं आगत: धीर: बहि: व्यवहरन् अपि-] त्याप्रमाणें श्रेष्ठ व शुद्ध तत्त्वामध्यें विश्रांति पावलेला ज्ञानी बाहेर व्यवहार करीत असतांहि [अंत: तत् एव आस्वादयति-] मनांत त्याचाच स्वाद घेत असतो.

प्रकाश:- यांतील दृष्टांतभूत श्लोकार्चे व्याख्यान पूर्वी होऊन गेलें आहे. सारांश; व्यवहार व भावना यांचा परस्पर विरोध नसल्यामुळें दृष्टांतील स्त्रीप्रमाणें ब्रह्मनिष्ठ पुरुषहि सतत बह्मानंदाची भावना करूं शकतो. ॥२२॥२३॥

-'धीर-' शब्दाचा अर्थ -

धीरत्वमक्षप्राबल्येऽप्यानंदास्वादवाञ्छया ।
तिरस्कृत्याखिलाक्षाणि तच्चिंतायां प्रवर्तनम् ॥२४

अन्वयार्थ - [अक्षप्राबल्ये अपि आनंदास्वाद-वाञ्छया अखिलाक्षाणि तिरस्कृत्य तच्चिंतायां प्रवर्तनं धीरत्वम्-] इंद्रियें जरी प्रबल आहेत म्ह० तीं पुरुषाला विषयांकडे आकर्षण करण्यास जरी समर्थ आहेत तरी, आनंदानुभवाच्या इच्छेनें त्या सर्व इंद्रियांस तुच्छ करून आनंदाच्या अनुसंधानामध्येंच प्रवृत्त होणें, हीच धीरता होय.

प्रकाश:- इंद्रियें अति प्रबल आहेत त्यांचा निरोध होणें अति कठीण आहे, तीं ज्ञानी पुरुषासहि व्याकुळ करून सोडीत असतात, इत्यादि सर्व प्रकार जरी खरा आहे, तरी आत्मानंदाच्या इच्छेनें त्या सर्वांस तुच्छ मानून आनंदाविषयींच जो चिंतन करीत असतो, त्यास धीर म्हणावें. सारांश; व्यवहारांतील धीर (धीट) पुरुष या स्थळींहि धीरच असतो, असा कांहीं नियम नाहीं. ॥२४॥

- आतां, तेविसाव्या श्लोकांतील 'विश्रांति-' शब्दाचा विवक्षित अर्थ सदृष्टान्त सांगतात -

भारवाही शिरोभारं मुक्त्वास्ते विश्रमं गत: ।
संसारव्यापृतित्यागे तादृग्बुद्धिस्तु विश्रम: ॥२५

अन्वयार्थ - [यथा भारवाही शिरोभारं मुक्त्वा विश्रमं गत: सन् आस्ते-] ज्याप्रमाणें भारवाहक पुरुष श्रमाला कारण होणारा मस्तकावरील भार टाकून श्रमरहित होऊन राहतो [तथा संसारव्यापृतित्यागे सति तादृग्बुद्धि: तु विश्रम:-] त्याप्रमाणें संसारव्यापार सोडल्यावर 'मी श्रमरहित झालों आहें' अशा प्रकारची होणारी जी बुद्धि तिचाच 'विश्रम-' शब्दानें उल्लेख केला आहे.

प्रकाश:- डोक्यावरील बोजा उतरल्यावर जसें हलकें वाटतें, व व्यापार बंद झाल्यावर 'आतां मी सुखी झालों आहें' अशा प्रकारची जी बुद्धि उत्पन्न होत असते तिलाच विश्रांति असें या शास्त्रांत म्हणतात. ॥१२५॥

- तात्पर्य -

विश्रान्तिं परमां प्राप्तस्त्वौदासीन्ये यथा तथा ।
सुखदु:खदशायां च तदानन्दैकतत्पर: ॥२६

अन्वयार्थ - [परमां विश्रांतिं प्राप्त: औदासीन्ये यथा-] पूर्वोक्त परम-निरतिशय विश्रांतीस प्राप्त झालेला पुरुष आपल्या उदासीन अवस्थेंत जसा परमानंदानुभवांत तत्पर असतो, [तथा सुखदु:खदशायां च तदानंदैकतत्पर: भवति-] तसाच तो सुखदु:खांचीं निमित्तें झालीं असतांहि त्यांचें अनुसंधान सोडून निजानंदाचा अनुभव घेण्यांत तत्पर होतो.

प्रकाश:- अति उत्तम विश्रांतीस पोंचलेला पुरुष उदासीन अवस्थेंत जसा परमानन्दाचा स्वाद घेण्यांत तत्पर होऊन राहतो, तसाच सुखदु:खभोगसमयीं व पुण्यपापाचरणसमयींहि तो परमानन्दतत्पर होऊन राहतो. म्हणजे आत्मानन्दाच्या स्वादावांचून त्यास कांहीं एक नकोसें होतें. ॥२६॥

-'अहोपण, दु:ख प्रतिकूल असल्यामुळें त्याच्या अनुसंधानाची इच्छा जरी नसली तरी वैषयिक सुख अनुकूल असल्यामुळें तें पुरुषांना नेहमीं हवेंच असतें. तेव्हां सुखानुसंधानाची इच्छा कां होणार नाहीं ?' अशी शंका घेऊन 'तें सुख विषयसंपादनादिका' च्या द्वारा अतिशय बहिर्मुख करतें,त्यामुळें तें निजानंदा-नुसंधानाच्या विरोधी आहे. म्हणून विवेक्याला त्याची इच्छाहि होत नाहीं' असें दृष्टान्तपूर्वक सांगतात -

अग्निप्रवेशहेतौ धी: शृंगारे यादृशी तथा ।
धीरस्योदेति विषयेऽनुसंधानविरोधिनि ॥२७

अन्वयार्थ - [अग्निप्रवेशहेतौ शृंगारे यादृशी धी:-] सत्वर देहत्याग करावा अशी दृढ इच्छा झाली असतां त्या देहत्यागाला विलंब करणाऱ्या अलंकारादिकांविषयीं अग्नींत प्रवेश करणाऱ्या पुरुषाची जशी विरक्त बुद्धि होते [तथा अस्य धी: अनुसंधानविरोधिनि विषये उदेति-] त्याप्रमाणें वैराग्यादि साधनांनीं संपन्न असलेल्या या विवेक्याची बुद्धि ब्रह्मानुसंधानाच्या विरुद्ध असलेल्या विषयसुखाविषयींहि तशीच विरक्त होते.

प्रकाश:- ज्याचा अग्नीमध्यें प्रवेश करण्याविषयीं दृढ निश्चय झाला आहे असा कोणी पुरुष किंवा स्त्री अग्निप्रवेशास विलंब करणाऱ्या अलंकारादिकांविषयीं ज्याप्रमाणें विरक्त होते, त्याप्रमाणें ह्या मुमुक्षूची बुद्धि ब्रह्मानुसंधनाच्या आड येणाऱ्या विषयांविषयीं विरक्त होते; म्हणजे त्यास विषय शत्रूसारखे वाटतात, आणि त्यामुळें तो त्यांची इच्छा करित नाहीं. ॥२७॥

-'विवेक्याला विरोधी विषयाविषयीं सुखेच्छा न होवो, पण अनायासानें प्राप्त होणाऱ्या व त्यामुळेंच बहिर्मुखतेला कारण न होणाऱ्या विषयाची इच्छा त्याला कां होऊं नये ?' उत्तर -

अविरोधिसुखे बुद्धि: स्वानंदे च गमागमौ ।
कुर्वंत्यास्ते क्रमादेषा काकाक्षिवदितस्तत: ॥२८

अन्वयार्थ - [एषा बुद्धि: अविरोधि सुखे च स्वानंदे काकाक्षिवत् क्रमात् इतस्तत: गमागमौ कुर्वन्ती आस्ते-] विवेकी पुरुषाची बुद्धि निजानंदानुसंधानाच्या विरुद्ध नसलेल्या सुखामध्यें व आत्मानंदामध्यें, कावळ्याच्या डोळ्याप्रमाणें, क्रमानें इकडून तिकडे व तिकडून इकडे अशी फिरत राहते.

प्रकाश:- आत्मानंदाशीं ज्याचा विरोध नाहीं अशा इतर सुखांमध्यें व आत्मानंदामध्यें बुद्धि क्रमाक्रमानें जात येत असते. याविषयीं कावळ्याच्या डोळ्याच्या दृष्टांत आहे. त्याचें पुढील श्लोकांत स्पष्टीकरण होईल. ॥२८॥

-दृष्टान्ताचें विवरण-

एकैव दृष्टि: काकस्य वामदक्षिणनेत्रयो: ।
यात्यायात्येवमानन्दद्वये तत्त्वविदो मति: ॥२९

अन्वयार्थ - [यथा काकस्य एका एव दृष्टि: वामदक्षणनेत्रयो: याति च आयाति-] ज्याप्रमाणें कावळ्याची एकच दृष्टि चक्षुरिंद्रिय डाव्या व उजव्या नेत्रगोलकामध्यें जातें व येतें [एवं तत्त्वविद:

मति: आनंदद्वये याति च आयाति-] त्याप्रमाणें तत्त्ववेत्त्याची बुद्धि दोन्ही आनंदांमध्यें जाते व येते.

प्रकाश:- दृष्टी म्हणजे पाहण्याचें इंद्रिय. हें कावळ्यास एकच असतें. म्हणजे त्यास मनुष्याप्रमाणें एकाच कालीं दोन्हीं नेत्रांनीं पाहतां येत नाहीं. त्यामुळें त्याच्या नेत्रांतील इंद्रिय क्रमाक्रमानें दोन्हीं नेत्रांत फिरतें. तसाच या ज्ञानाच्या बुद्धीचा प्रकार समजावा. ॥२९॥

- आतां दार्ष्टान्तिकाचें विवरण करितात -

भुञ्जानो विषयानन्दं ब्रह्मानन्दं च तत्त्ववित् ।
द्विभाषाभिज्ञवद्विद्यादुभौ लौकिकवैदिकौ ॥३०

अन्वयार्थ - [तत्त्वविद् विषयान् भुंजान: विषयानन्दं ब्रह्मानन्दं च लौकिकवैदिकौ उभौ द्विभाषाभिज्ञवत् विद्यात्-] तत्त्ववेत्ता विषयांचा भोग घेणारा असा होत्साता विषयानंदाला व उपनिषद्वाक्यावरून अवगत होणाऱ्या ब्रह्मानंदाला, याप्रमाणें लौकिक व वैदिक अशा दोन्ही आनंदांना, दोन भाषा जाणणाऱ्या मनुष्याप्रमाणें जाणतो.

प्रकाश:- ब्रह्मानंदाशीं विरोध न करणारा असा विषयानंद व स्वत: ब्रह्मानन्द या दोहोंचा भोग घेणारा तत्त्वज्ञ पुरुष दोन्ही आनंदास यथार्थपणें जाणतो. याला दुभाष्याचा दृष्टांत; जसा दोन भाषा जाणणारा दोन्ही भाषेंत बोलणाऱ्यांचें भाषण जाणतो, त्याप्रमाणें हा प्रकार होतो, असें समजावें. ॥३०॥

-'अहोपण, दु:खानुभवदशेंत उद्वेग झाला असतां निजानंदानुभव कसा येणार ?' उत्तर --

दु:खप्राप्तौ न चोद्वेगो यथापूर्वं यतो द्विदृक् ।
गंगामग्नार्धकायस्य पुंस: शीतोष्णधीर्यथा ॥३१

अन्वयार्थ - [यत: द्विदृक् तत:-] ज्याअर्थीं हा विवेकी द्विदृष्टि म्ह० लौकिक-वैदिक व्यवहार जाणणारा असतो त्याअर्थीं, [गंगामग्नार्धकायस्य पुंस: यथा शीषोष्णधी:-] गंगेमध्यें ज्याचें अर्धें शरीर बुडालें आहे अशा पुरुषाला जशी शीत व उष्ण यांची प्रतीति येते [तथा दु:खप्राप्तौ यथापूर्वं उद्वेग: न भवति-] त्याप्रमाणें त्याला दु:खप्राप्ति झाली असतांहि, अज्ञान दशेंत असतांना जसा उद्वेग होत असे तसा होत नाहीं.

प्रकाश:- तत्त्ववेत्त्यास दोन्ही व्यवहारांचा अनुभव असतो; म्हणजे गंगेमध्यें उभ्या राहिलेल्या मनुष्यास जशी खालीं थंडी व वर उष्णता यांचा एकाच कालीं अनुभव येतो, त्याप्रमाणें तत्त्ववेत्त्यास लौकिक व वैदिक व्यवहारांचा अनुभव येतो. त्यामुळें जरी कदाचित् दु:खप्राप्ति झाली, तरी त्यास उद्वेग होत नाहीं. तो त्या दु:खास क्षणिक समजून तें सहन करितो. ॥३१॥

-तात्पर्य -

इत्थं जागरणे तत्त्वविदो ब्रह्मसुखं सदा ।
भाति तद्वासनाजन्ये स्वप्ने तद्भासते तथा ॥३२

अन्वयार्थ - [इत्थं तत्त्वविद: जागरणे ब्रह्मसुखं सदा भाति-] याप्रमाणें तत्त्ववेत्त्याला जागृतीमध्यें सर्वदा म्ह० सुखदु:खानुभवसमयीं व तूर्ष्णी अवस्थेंत ब्रह्मसुख भासतें. [तद्वासनाजन्ये स्वप्ने तत् तथा भासते-] जागृतींतील वासनेपासून स्वप्न उद्भवत असल्यामुळें स्वप्नांतहि तें ब्रह्मसुख जागरावस्थेप्रमाणेंच भासतें.

प्रकाश:- सदा- सुखदु:खांच्या अनुभवसमयीं व उदासीन अवस्थेमध्यें तत्त्ववेत्त्यास केवळ जाग्रतींतच ब्रह्मानन्दाचा अनुभव येतो असें नाहीं, तर स्वप्नामध्येंहि त्याचें भान होतें. ॥३२॥

-'अहोपण, स्वप्न जर आनंदानुभववासनाजन्य आहे तर त्यांत आनंदच भासेल 'दु:ख भासणार नाहीं !' उत्तर --

अविद्यावासनाप्यस्तीत्यतस्तद्वासनोत्थिते ।
स्वप्ने मूर्खवदेवैष सुखं दु:खंच वीक्षते ॥३३

अन्वयार्थ - [अविद्यावासना अपि: अस्तिच अत: तद्वासनोत्थिते स्वप्ने एष: मूर्खवत् एव सुखं

दु:खं वीक्षते] अविद्येची वासनाहि असते. यास्तव त्या वासनेपासून उत्पन्न झालेल्या स्वप्नांत हा मूर्खाप्रमाणें सुख व दु:ख पहातो.

प्रकाश:- स्वप्नावस्था केवळ आनंदाच्या वासनेमुळें होते असें नाहीं, तर अविद्यावासनेपासूनहि ती होते. त्यामुळें एकाद्या वेड्याप्रमाणें प्राणी सुखदु:ख पाहतो. ॥३३॥

-आतां प्रस्तुत प्रकरणाचा उपसंहार करितात -

ब्रह्मानन्दाभिधे ग्रंथे ब्रह्मानन्दप्रकाशकम्।
योगिप्रत्यक्षमध्याये प्रथमेऽस्मिन्नुदीरितम् ॥३४

अन्वयार्थ - [ब्रह्मानन्दाभिधे ग्रंथे अस्मिन् प्रथमे अध्याये ब्रह्मानन्दप्रकाशकं योगीप्रत्यक्षं उदीरितम्] ब्रह्मानन्दसंज्ञक ग्रंथांतील या प्रथमाध्यायांत ब्रह्मानन्दाचें प्रकाशन करणारें योगिप्रत्यक्ष सांगितलेलें आहे.

प्रकाश:- ह्या प्रकरणास योगानन्द ही संज्ञा आहे. पण तो ब्रह्मानन्दाचा एक भाग आहे. यांत सुषुप्तीमध्यें, औदासिन्यकालीं, समाधिसमयीं व सुखदु:खकालींहि स्वप्रकाश चिदानन्दाचें योग्यांच्या अनुभवरूप प्रत्यक्ष सांगितलें आहे. 'कैवल्यामध्यें गुरु, शास्त्र, बागा, गंगातीर इत्यादि विषय कोठून असणार व ते जर नाहींत तर त्यांत मौज ती कसची ?' या जीवपरैक्याविषयींच्या प्रतिबंधरूप प्रश्नाचें ह्या प्रकरणाच्या द्वारा सयुक्तिकपणें उत्तर दिलें आहे. ॥१३४॥

इति पञ्चदश्यां ब्रह्मानन्दे योगानन्द: ॥११॥